# डफरिन रुग्णालयाच्या नवजात शिशूंच्या अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरचा स्फोट


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार २५ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







## 3 नवजात बालकांचा होरपळून दुर्दैवी मृत्यू

**अमरावती /प्रतिनिधी :** येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या (डफरिन रुग्णालय) तिस-या मजल्यावरील नवजात शिशु अतिदक्षता विभागात सोमवारी ( ता. २४ ऑगस्ट ) रोजी पहाटे ३:३० वाजेच्या सुमारास व्हेंटिलेटरचा अचानक भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत वॉर्डमध्ये पसरलेल्या आगीत होरपळून आणि गुदमरून ३ निष्पाप नवजात बालकांचा अत्यंत वेदनादायी मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून सरकारी रुग्णालयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुर्घटनेच्या वेळी वॉर्डमध्ये एकूण ३९ नवजात बालके उपचार घेत होती. स्फोटानंतर वॉर्डात प्रचंड धूर आणि आगीचे साम्राज्य पसरले. तेथील डॉक्टर्स, परिचारिका आणि सुरक्षा रक्षकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालत ३६ बालकांना सुरक्षित बाहेर काढले. यातील ६ बालकांची प्रकृती गंभीर असून त्यांना तातडीने जिल्हा सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून अवघ्या वर्षभरापूर्वीच उभारण्यात आलेल्या या नवीन इमारतीमधील 'फायर अलार्म' आणि आपत्कालीन पाण्याचे फवारे निकामी असल्याचे समोर आल्याने प्रशासकीय हलगर्जीपणावर तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**उच्चस्तरीय चौकशी समिती गठित; ५ लाखांची मदत जाहीर**

घटनेचे गांभीर्य लक्षात घेउन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संपूर्ण प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत. वरिष्ठ अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची एक विशेष चौकशी समिती गठित करण्यात आली असून, ही समिती तांत्रिक त्रुटी आणि सुरक्षेतील त्रुटींचा शोध घेउन ७ दिवसांत अहवाल सादर करणार आहे. दोषी आढळणा-या अधिकारी आणि कर्मचा-यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे शासनाने स्पष्ट केले आहे. तसेच, राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मृतांच्या कुटुंबीयांना सरकारतर्फे ५ लाख रुपयांची तातडीची आर्थिक मदत जाहीर केली असून जखमी बालकांच्या संपूर्ण मोफत उपचाराचे निर्देश दिले आहेत.


## आरोग्यमंत्र्यांचा दौरा आणि घटनास्थळाची पाहणी

दुर्घटनेची माहिती मिळताच राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाशराव आबीटकर आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने अमरावतीत धाव घेतली. त्यांनी डफरिन रुग्णालयातील दुर्घटनाग्रस्त वॉर्डची पाहणी केली आणि सुपर स्पेशालिटी रुग्णालयात जाउन जखमी बालकांच्या प्रकृतीची विचारपूस केली. काँग्रेस नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनीही घटनास्थळाला भेट देउन संतप्त पालकांची भेट घेतली आणि प्रशासनाला धारेवर धरले.



# पहाटेच्या सुमारास शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग; धुराचे लोट





■ कर्मचा-यांच्या तत्परतेमुळे 36 बालकांचे प्राण वाचले; ■ 6 बालकांची प्रकृती गंभीर
■ कोट्यवधींच्या नव्या इमारतीत 'फायर अलार्म' निकामी ■ मुख्यमंत्र्यांकडून चौकशीचे आदेश

## डफरिनचा पूर्वेतिहास; इशा-यांकडे दुर्लक्ष अन् 'थातूरमातूर' ऑडिट!

अमरावतीचे डफरिन रुग्णालय व्यवस्थापकीय निष्काळजीपणा आणि अनियमिततेमुळे यापूर्वीही अनेकदा वादाच्या भोव-यात सापडले आहे. आज घडलेली भीषण दुर्घटना ही अचानक घडलेला अपघात नसून, प्रशासनाने भूतकाळातील अनेक इशा-यांकडे केलेल्या अक्षम्य दुर्लक्षाचाच हा परिणाम असल्याचे जुन्या प्रकरणावरून स्पष्ट होते. आगीच्या जुन्या घटनांमधून धडा शून्य घेतला आहे. रुग्णालयातील विद्युत पुरवठ्यामध्ये आणि उपकरणांमध्ये २०१७ आणि २०२२ मध्येही शॉर्ट सर्किट आणि आगीचे प्रकार घडले होते. स्थानिक लोकप्रतिनिधींनी यावर धोक्याचा इशारा दिला होता, मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत विंगने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले.

**कागदोपत्रीच ठरले 'फायर ऑडिट':** रुग्णालय प्रशासनाकडून दरवर्षी सुरक्षा ऑडिट आणि फायर ऑडिट वेळेवर केले जात असल्याचा दावा केला जात होता. मात्र, काल रात्री ऐन आपत्कालीन परिस्थितीत कोट्यवधींच्या इमारतीमधील फायर अलार्म यंत्रणा पूर्णपणे निकामी असल्याचे सिद्ध झाले. यावरून पूर्वी झालेली सुरक्षा ऑडीट्स केवळ कागदोपत्री आणि 'थातूरमातूर' होती, ही मोठी अनियमितता उघड झाली आहे.

**साहित्य खरेदीत निकृष्ट दर्जाचा संशय:** दुर्घटनाग्रस्त झालेला अत्याधुनिक 'NICU' वार्ड अवघ्या वर्षभरापूर्वीच सुरू करण्यात आला होता. इतक्या कमी कालावधीत नवीन व्हेंटिलेटर आणि उपकरणांचा स्फोट झाल्यामुळे, साहित्याच्या खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाली असून निकृष्ट दर्जाची उपकरणे खरेदी केली गेल्याचा दाट संशय व्यक्त होत आहे.

**अपु-या सुविधा आणि बेडची टंचाई:** काही महीनोंपूर्वीच, बेड्सच्या कमतरतेमुळे प्रसूतीसाठी आलेल्या एकाच बेडवर दोन-दोन महिला रुग्णांना झोपवून त्यांच्यावर उपचार केले जात असल्याचा क्लेशदायक प्रकार समोर आला होता. यावरून रुग्णालयाच्या ढिसाळ नियोजनावर राज्यभरातून टीका झाली होती.

### प्रतिक्रिया



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस:** 'अमरावतीमधील घटना अत्यंत दुर्दैवी आणि मन सुन्न करणारी आहे. मी मृत बालकांना श्रद्धांजली अर्पण करतो. नवजात बालकांच्या मृत्यूस कारणीभूत असणा-या आणि सुरक्षेत हलगर्जीपणा करणा-या कोणाचीही गय केली जाणार नाही.'



**आरोग्य मंत्री प्रकाशराव आबीटकर:** 'रुग्णालयातील कर्मचा-यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून ३६ बालकांना वाचवले, मात्र ३ निष्पापांचे प्राण गेले याचे अतीव दुःख आहे. राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांचे 'इलेक्ट्रिकल आणि फायर ऑडिट' करण्याचे निर्देश दिले आहेत.'



**खासदार सुप्रिया सुळे (NCP):** 'हा केवळ अपघात नसून प्रशासनाचा ढिसाळ कारभार आहे. २०२१ च्या भंडारा रुग्णालय दुर्घटनेनंतरही सरकारने कोणताच धडा घेतलेला नाही. यंत्रणेच्या या गंभीर त्रुटींची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे.'

### 'माझ्या सुदृढ बाळाला त्यांनी मारून टाकलं...'

'माझ्या घरात लग्नानंतर सात वर्षांनी पाळणा हलला होता. बाळ सुदृढ होतं, पण डाक्टरांनी काळजी म्हणून त्याला एका दिवसासाठी काचेत (NICU) ठेवण्यास सांगितलं. रात्री अचानक मोठा आवाज झाला, सगळीकडे धूर झाला. आम्ही ओरडत होतो, पण आम्हाला आत जाउ दिलं नाही. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे आज माझ्या सुदृढ बाळाचा बळी गेला आहे. या नराधमांना कधीच माफी मिळणार नाही...'

● **संतप्त व पीडित माता,** अमरावती.

### 'दोषींवर थेट सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणार!'

'डफरिन रुग्णालयातील ही घटना अत्यंत दुर्दैवी असून जिल्हा प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार उच्चस्तरीय चौकशी समिती तातडीने कामाला लागली आहे. रुग्णालयातील फायर अलार्म यंत्रणा बंद का होती आणि व्हेंटिलेटरची नियमित देखभाल का झाली नाही, याची सखोल चौकशी सुरू आहे. यामध्ये कोणत्याही स्तरावर निष्काळजीपणा आढळल्यास, संबंधित अधिकारी किंवा पुरवठादार कंपनीवर थेट सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला जाईल.'

● ***सौरभ कटियार,*** जिल्हाधिकारी, अमरावती.

## शेतकरी कर्जमाफीचा दुसरा हप्ता जारी

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुती सरकारने राज्यातील शेतक-यांना आर्थिक संकटातून सावरण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. या योजनेतील दुसरा हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत वितरीत करण्यात आला. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतून कर्जमाफीच्या दुस-या हप्त्याच्या निधीचे वितरण करण्यात आले आहे. दुस-या टप्प्यात ५०८६ कोटी रुपये वर्ग करत ६ लाखांहून अधिक शेतक-यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

महायुती सरकारनं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केल्यानंतर पहिल्या टप्प्यात ७ ऑगस्टला ५०२९ कोटी वितरीत करत ६ लाख २२ हजार २०७ शेतक-यांची कर्जमाफी करण्यात आली होती. आज दुस-या टप्प्यात ६ लाख ३६



हजार ३६ पात्र शेतक-यांना ५०८६ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे. राज्य सरकारकडून कर्जमाफी योजनेसाठी टप्प्या टप्प्याने निधी वितरीत केला जात आहे. या कर्जमाफीमध्ये साधारणपणे ३२ लाखांहून अधिक शेतक-यांचे कर्ज माफ केले जाणार आहे. तर, २३ लाखांहून अधिक शेतक-यांना प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ ५६ लाख शेतक-यांना होणं अपेक्षित आहे.

**आतापर्यंत किती शेतक-यांची कर्जमाफी?**

राज्य सरकाकडून आतापर्यंत दोन टप्प्यात १०११५ कोटी रुपयांच्या कर्जमुक्तीचा लाभ १२ लाख ५८ हजार २४३ शेतक-यांना देण्यात आला आहे. कर्जमाफीतील पात्र शेतक-यांना लाभ वितरणाची प्रक्रिया सुरू असून लाभार्थींची संख्या सातत्याने अद्ययावत होत असल्याची माहिती देण्यात आली आहे. योजनेची संपूर्ण प्रक्रिया अतिशय पारदर्शक असून मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत नियंत्रित केली जात आहे अशी माहिती देखील देण्यात आली आहे.

## नागपूरमध्ये क्लोरीन वायूची गळती

**नागपूर-**जवळच्या गोधणीमध्ये जलशुद्धीकरण प्रकल्पात क्लोरीन वायूची गळती झाली. यात ९०० किलो क्षमतेच्या सिलिंडरमधून गॅस पसरल्याने अनेकांना श्वास घेण्यास त्रास होउ लागला. त्यामुळे प्रकल्पातील कर्मचा-यांसह सुमारे ४० नागरिकांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यापैकी ४ ते ५ जणांची प्रकृती गंभीर असल्यानं त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरु आहेत. प्रकल्पाच्या जवळ असलेल्या रहिवाशांनाही मध्यरात्री गाढ झोपेत अचानक श्वास घेण्यास त्रास होउ लागला. त्यामुळे परीसरात भितीचं वातावरण निर्माण झालं. काही मुली आणि महिलांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं.गोधनी शहराला शुद्ध पाणी मिळावे या उद्देशाने महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरणाच्या वतीने हा प्लांट उभारण्यात आला होता.

## कुंभमेळ्याची 0.1 टक्के रक्कम दिली असती, तरी मराठी शाळा वाचल्या असत्या; न्यायमूर्ती पी. बी. वराळे यांची खंत

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांवर सरकारकडून हजारो कोटी रुपयांची उधळपट्टी केली जात असताना, दुसरीकडे निधीअभावी राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत, यावर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराळे

धुळे जिल्ह्यातील एका शाळेत स्मार्ट क्लासच्या उद्घाटन प्रसंगी न्यायमूर्ती वराळे बोलत होते. याच शाळेत त्यांनी शालेय शिक्षण घेतले होते. यावेळी त्यांनी शिक्षण व्यवस्थेची सद्यःस्थिती, मराठी भाषेचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांवर सविस्तर भाष्य केले.

न्यायमूर्ती वराळे म्हणाले, सरकार विविध विकासकामांसाठी आणि उपक्रमांसाठी भरघोस निधी दिल्याचे दावे करते. उपमुख्यमंत्र्यांनी कुंभमेळ्यासाठी ३२,००० कोटी रुपये तर मुख्यमंर्त्यांनी ३४,००० कोटी रुपये खर्च करणार असल्याचे सांगितले आहे. तसेच एका कारिडार प्रकल्पासाठी ११,००० कोटी रुपये मंजूर झाल्याचे मी वाचले. सरकार हजारो कोटी रुपये खर्च करत आहे, याला माझा कोणताही आक्षेप नाही. मात्र, या हजारो कोटींपैकी केवळ ०.१ टक्के म्हणजे सुमारे ३२ कोटी रुपये जरी सरकारने शिक्षणासाठी दिले असते, तरी राज्यभरात बंद पडलेल्या १०० ते १२५ मराठी माध्यमाच्या शाळा नक्कीच वाचवता आल्या असत्या.

वाढत्या विद्यार्थी संख्येच्या तुलनेत शिक्षणावरील तरतूद वाढवण्याऐवजी ती कमी केली जात असल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. केंद्राच्या पातळीवर शिक्षणासाठीचे बजेट पूर्वी ८ ते १२टक्क्यांच्या आसपास असायचे. विद्यार्थ्यांची वाढती संख्या पाहता यात वाढ होणे अपेक्षित होते, मात्र गेल्या अनेक वर्षांत हा आकडा १३ टक्क्यांपर्यंतही पोहोचू शकलेला नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

**आश्रमशाळेतील मुलींच्या मृत्यूवर हळहळ-**ग्रामीण भागातील शाळा आणि आश्रमशाळांमधील अपु-या मूलभूत सुविधांवर बोलताना न्यायमूर्ती वराळे यांनी एका अत्यंत दुर्दैवी घटनेचा संदर्भ दिला. ह्लएका निवासी आश्रमशाळेत योग्य सुविधा नसल्यामुळे विद्यार्थिनींना जमिनीवर झोपावे लागले. तिथे साप चावल्याने तीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि एका मुलीवर अद्याप रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असे सांगत त्यांनी प्रशासनाने मूलभूत सुविधांना प्राधान्य देण्याची गरज अधोरेखित केली.

**मराठी माध्यमातील शिक्षणाचा अभिमान-**यावेळी न्यायमूर्ती वराळे यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. १० वी पर्यंतचे शिक्षण महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेत झाल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले. प्रादेशिक भाषेतून शिक्षण घेतल्याने माझ्या करिअरमध्ये कधीही अडथळा आला नाही, उलट माझा दृष्टिकोन अधिक समृद्ध झाला. मराठी भाषेने मला इतरांकडे पाहण्याचा एक मोकळा आणि व्यापक दृष्टिकोन दिला. माझ्या भाषेने मला बंधुभावाची शिकवण दिली,ह्व असे सांगत त्यांनी संत ज्ञानेश्वर आणि कवी सुरेश भट यांच्या विचारांचा दाखला दिला.

## कॉकरोच जनता पार्टीचा 5 सप्टेंबर रोजी पुन्हा दिल्ली मार्च

नवी दिल्ली- 'काकरोच जनता पार्टी' (CJP) ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत निषेध मोर्चा काढणार आहे. केंद्र सरकारने २५ जुलै रोजी तरुणांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात अपयश आल्याचा आरोप पक्षाने केला आहे; याच आश्वसनांच्या आधारे जंतरमंतर येथील आधीचे आंदोलन मागे घेण्यात आले होते. हा मोर्चा इंडिया गेटपासून सुरू होउन नवी दिल्ली पोलीस मुख्यालयापर्यंत जाईल. NEET परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांचे कुटुंबीयही या मोर्चात सहभागी होणार आहेत. यापूर्वी, CJP ने २० जुलै रोजी जंतरमंतर ते संसद भवन असा मोर्चा आयोजित केला होता. CJP च्या कार्यकारिणीची 'व्हर्च्युअल' बैठक झाल्यानंतर सोमवारी हा निर्णय घेण्यात आला.



विद्यार्थ्यांनी दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन सरकारने दिले होते, परंतु तसे झाले नाही, असे पक्षाने म्हटले आहे. तसेच, आमच्या संयमाला आमची कमजोरी समजू नये, असेही त्यांनी नमूद केले. NEET परीक्षेचा पेपर फुटणे आणि परीक्षेत झालेल्या अनियमिततेचा निषेध करण्यासाठी CJP ने २० जून रोजी जंतरमंतर येथे आंदोलन सुरू केले होते. सरकारकडून मिळालेली आश्वासने आणि शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा यानंतर त्यांनी २५ जुलै रोजी हे आंदोलन मागे घेतले होते.

## न्यायालयासमोरच गोळीबार!

**चंद्रपूर-** राजुरा तालुका न्यायालयासमोरील परिसरात गोळीबाराची घटना घडल्यानं शहरात खळबळ उडाली. नारळपाणी विक्रीच्या दुकानाजवळ बसलेल्या एका तरुणावर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी धाड-धाड गोळ्या झाडल्या. विनोद उर्फ पापा जाधव असं गोळीबारात मृत पावलेल्या तरुणाचे नाव आहे. मोटारसायकलवरून आलेल्या दोघांनी समोरून गोळीबार केला. या हल्ल्यात जाधव गंभीर जखमी झाले. गोळीबारात डोक्यात आणि छातीत गोळ्या लागल्याने जाधव गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी . प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र त्यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर राजुरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. दरम्यान, या हत्येतील आरोपी करण मेकलवार (वय २२) आणि करण दीपक बावीसकर (वय २४) यांनी स्वत?हून राजुरा पोलीस ठाण्यात शरणागती पत्करली. पोलिसांनी हत्येत वापरलेले शस्त्र ताब्यात घेतले आहे. हा हल्ला कशासाठी केला गेला, याचे कारण अजून समोर आलेले नाही.

## FDA ची राज्यभर धडक कारवाई; मुंबई क्रिकेट क्लबसह ११ ठिकाणाचे परवाने निलंबित

**मुंबई/प्रतिनिधी :**तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात अन्न आणि औषध प्रशासनाकडून राज्यभर धडक कारवाई सुरूय. आज एफडीएच्या पथकाकडून राज्यातील एकूण ४५ हाटेल, रेस्टारंट आणि धाबा यांची तपासणी करण्यात आली. त्यातील ३३ आस्थापनांना सुधारणा नोटीस देण्यात आली. तर ११ आस्थापनांचे परवाने निलंबन करण्यात आली. विशेष म्हणजे मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या परमिट रूमचाही अन्न परवाना निलंबित करण्यात आलाय.




मुंबई क्रिकेट असोसिएशनचे परमिट रूम येथे FDA अधिका-यांनी तपासणी केली. या तपासणीत किचनमधील एका फ्रीजमध्ये बर्फ साचलेला आढळून आला. किचनच्या प्रवेशद्वाराजवळील फरशी अस्वच्छ आढळली. FSSAI परवाना प्रमुख ठिकाणी प्रदर्शित केलेला नव्हता. यासह खाद्यतेलाचा रंग, वास आणि इतर घटकांच्या आधारे करण्यात येणारी नियमित तपासणी केली जात नव्हती. कृषीजन्य कच्चा माल खराब अवस्थेत आढळला. कर्मचारी स्वच्छता आणि सॅनिटेशन व्यवस्थेचे पालन अपेक्षित निकषांनुसार करत नसल्याचे या पाहणीत निदर्शनास आले. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने त्यांचा परवाना निलंबित केलाय.

कुर्ला येथील संकल्प महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेवरही एफडीएनं कारवाई केलीय. अन्नसुरक्षा निकषांच्या पालनाबाबत गंभीर त्रुटी निदर्शनास आल्या. या तपासणीत अन्न तयार करण्याचा परिसर स्वच्छ व आरोग्यदायी स्थितीत नव्हता. परिसरात घाण, अन्नाचे अवशेष आणि अपुरी स्वच्छता आढळली. भिंती, छत व इतर भागांवर डाग, घाण, ग्रीस व झीज आढळून आली. आस्थापनेतील अंतर्गत पृष्ठभाग व फिटिंग अस्वच्छ व खराब अवस्थेत होत्या.

दादर येथील शिवाजी पार्कच्या Cafe Cadell येथेही अन्न औषध प्रशासनाच्या अधिका-यांनी पाहणी केली. किचनमध्ये अस्वच्छता, दरवाजे गुळगुळीत झालेले, किटकांचा प्रवेश रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना न करणे, कर्मचा-यांची हात धुण्याची सुविधा, स्वच्छतागृहे आणि इतर अपु-या सुविधा आढळून आल्या. शाकाहारी आणि मांसाहारी खाद्यपदार्थ योग्यप्रकारे वेगळे ठेवले जात नव्हते, हे तपासणीत निदर्शनास आल्यानंतर कॅफेचा परवाना निलंबित करण्यात आला




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## पान १ व १० वरून

### चिकनच्या भाजीमुळे झालेल्या वादात

रोहित भुसुम यांच्या फिर्यादीवरून कलम १०३(१) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपी राजेश फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

### जिल्हा स्त्री रुग्णालयातील

प्रत्यक्ष जबाबदार असलेल्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल.

ही समिती समस्येच्या खोलवर जाऊन कारणे शोधणार आहे. व्हेंटिलेटर, वीज यंत्रणेतील दोष, फायर ऑडिट, तसेच अन्य अनियमितता यांची सखोल तपासणी करेल. या दुर्दैवी घटनेतून यंत्रणेलाही शिकावे लागेल. ज्या त्रुट्या आढळून येतील त्या दुरुस्त करण्यासाठी शासन संपूर्ण प्रयत्न करेल. तसेच या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या नवजात बालकांच्या पालकांना शासनातर्फे पाच लाख रूपये आर्थिक मदत देण्यात येईल. तसेच जखमी बालकांवर उपचाराचा खर्च शासनाकडून करण्यात येईल. आजच्या घटनेने गांभीर्य लक्षात घेऊन शासकीय तसेच खासगी रुग्णालयातील फायर ऑडिट नियमानुसार व नियमीत होण्यासाठी मुंबई येथे मंत्रालयात संबंधित यंत्रणांच्या प्रमुखांशी चर्चा करण्यात येईल. तसेच आवश्यक सूचना सर्व रुग्णालयांना देण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान आरोग्य मंत्री आबिटकर यांनी डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाला भेट देऊन उपचार घेत असलेल्या दुर्घटनेतील नवजात बालकांच्या प्रकृतीची माहिती घेतली.

### कार डिवाइडरला धडकली, दाम्पत्याचा

संगीता यशवंत जयस्वाल (वय ५४) आणि कारचालक असे तिघे इनोव्हातून प्रवास करीत होते. अमरावती कडून मूर्तिजापूरच्या दिशेने जात असताना कमळगंगा नदीच्या पुलावर कारने डिव्हायडरला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता एवढी होती की, तिघेही गंभीर जखमी झाले.अपघाताची माहिती मिळताच पोलिसांसह मदत पथकाने घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णवाहिकेने मूर्तिजापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्या नंतर यशवंत जयस्वाल यांना मृत घोषित केले. गंभीर जखमी संगीता जयस्वाल यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, उपचारा दरम्यान त्यांची प्रकृती खालावली आणि त्यांचाही मृत्यू झाला. या दुर्घटनेत जयस्वाल दाम्पत्याचा मृत्यू झाल्याने नागपूर येथील त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अपघातातील चालक गंभीर जखमी असून, त्याला पुढील उपचारासाठी अकोला येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे. त्याच्यावर तिथे उपचार सुरू आहे.

### आरोग्यमंत्र्यांना भेटण्यापूर्वीच

कुटुंबियांना २५-२५ लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी,वेंटिलेटर मशीन पुरवठा करणारी कंपनी आणि ठेकेदारावर एफआयआर दाखल करावा, रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्था आणि वैद्यकीय उपकरणांच्या दर्जाची चौकशी करावी अशी मागणी करण्यात आली आहे. प्रहारचे कार्यकर्ते आरोग्यमंत्र्यांना निवेदन देण्यासाठी डफरीन रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच पोलिसांनी त्यांना रोखले. त्यांना मंत्र्यांशी चर्चा करण्यासाठी जाऊ दिले नाही. त्यानंतरही कार्यकर्ते पुढे जाण्याचा प्रयत्न करताच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले.ताब्यात घेण्यात आलेल्यांमध्ये बंटी रामटेके यांच्या सह गौरीश कोटकर, प्रशांत शिरभाते, चेतन भोसले, भीम ब्रिगेडचे राजेश वानखडे, क्रांती सेनेचे रितेश तेलमारे यांचा समावेश आहे. कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्याने प्रहारच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी दिसून आली.

### सौंदळी ग्रामपंचायतच्या जागेवर

अधिकृत परवानगी आहे का, याबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

घटनेची माहिती मिळताच दर्यापूर पोलिसांनी परिस्थितीच्या गांभीर्याची दखल घेत गावात मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि दोन गटांमध्ये संघर्ष होऊ नये, यासाठी पोलिसांकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. ग्रामपंचायत जागेच्या मालकीबाबत वाद नसला तरी त्या जागेचा वापर करण्याचा अधिकार कोणाला आहे, ध्वज उभारण्यासाठी परवानगी घेण्यात आली होती का आणि यापूर्वी लावण्यात आलेल्या फलकाबाबत ग्रामपंचायतीची भूमिका काय होती, हे स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे.सध्या गावात तणावपूर्ण शांतता असून प्रशासन व पोलिसांनी दोन्ही गटांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. या प्रकरणात ग्रामपंचायत प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते आणि पोलिसांकडून पुढील काय कारवाई केली जाते, याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### कंत्राटी सफाई कामगारांच्या

सफाई कामगार 'भीक मांगो आंदोलन' करण्याच्या तयारीत होते.या आंदोलनाची माहिती मिळताच अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीने या प्रकरणात लक्ष घातले. समितीचे जिल्हाध्यक्ष सचिन गावंडे, तालुकाध्यक्ष मनोहर मुरकुटे, शहराध्यक्ष फैमुद्दीन आणि सुंदरलाल तांबे यांनी थेट मुख्याधिकारी विजय लोहकरे आणि आरोग्य सभापती प्रवीण नेमाडे यांची भेट घेऊन प्रत्यक्ष निवेदन दिले आणि सविस्तर चर्चा केली.कामगारांची व्यथा आणि शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.या चर्चेला यश आले असून मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी तातडीने यावर तोडगा काढला. त्यांनी कंत्राटी कामगारांच्या दोन महिन्याच्या वेतनाच्या स्लिपवर तात्काळ सह्या करून त्यांचा प्रश्न मार्गी लावला.तसेच उर्वरित ३९ दिवसांच्या वेतनापोटी ठेकेदाराकडून आगाऊ चेक स्वरूपात आश्वासन म्हणून घेण्यात आला आहे. त्यामुळे कंत्राटी कामगारांच्या पगाराचा प्रश्न सध्या तरी मिटला आहे.या निर्णयामुळे सफाई कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण असून, आरोग्य विभागाकडून कळविण्यात आले आहे की, उद्यापासून शहरातील स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जाईल आणि स्वच्छता अभियान पुन्हा नियमितपणे राबविले जाईल.

### चार वर्षीय चिमुकलीच्या जबड्यात

डॉक्टरांचे आभार मानले. गंभीर परिस्थितीत दाखवलेली तत्परता, योग्य निर्णयक्षमता आणि तज्ज्ञांचे टीमवर्क यामुळे चिमुकलीवर यशस्वी उपचार शक्य झाले. दर्यापूरच्या वैद्यकीय क्षेत्रातील तत्परता, कौशल्य आणि टीमवर्कचे हे आणखी एक उल्लेखनीय उदाहरण ठरले आहे.

### डफरीनमध्ये ३ बालकांचा मृत्यू

जाऊन संबंधित जबाबदार अभियंत्याची उच्चस्तरीय चौकशी करून त्यास अटक करण्यात यावी,' अशी आक्रमक भूमिका प्रवीण हरमकर यांनी मांडली.याशिवाय, जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) येथे पावसाचे दीड फूट पाणी साचल्यामुळे रुग्णांची आणि त्यांच्या नातेवाईकांचे मोठे हाल होत असल्याच्या मुद्द्यावरही त्यांनी आरोग्य मंत्री व प्रशासनाचे लक्ष वेधले. रुग्णालयातील पाण्याचा निचरा करण्यासाठी आणि रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

शिवसेनेच्या या आक्रमक पवित्र्यानंतर लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या दोन्ही विषयांची गंभीर दखल घेतली असून, बालकांच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्यांवर चौकशीअंती कठोर कारवाई करण्याचे आणि इर्विन रुग्णालयातील पाण्याच्या समस्येवर त्वरित तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे. डफरीन रुग्णालयातील व्हेंटिलेटर व मशिनरीची देखभाल करणाऱ्या अभियंत्याची तात्काळ चौकशी करून अटक करण्यात यावी. संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय निष्पक्ष समितीमार्फत चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. मृत बालकांच्या कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत व न्याय मिळवून द्यावा. इर्विन रुग्णालयात साचणाऱ्या दीड फूट पाण्याच्या समस्येवर त्वरित कायमस्वरूपी उपाययोजना करावी,आदि मागण्या यावेळी करण्यात आल्या.

# जिममध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**मुंबई/प्रतिनिधी :** गुरु आणि शिष्याच्या नात्याला काळिमा फासणारी घटना मुंबईतून समोर आली आहे. द्रोणाचार्य पुरस्कार विजेत्या प्रशिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केले. मुंबईतल्या विलेपार्लेमध्ये ही संपातजनक घटना घडली. विलेपार्ले पूर्वेकडील एका ट्रेनिंग सेंटरमध्ये मल्लखांब प्रशिक्षक गणेश देव्रुखकरने (४८ वर्षे) संधी साधून १६ वर्षीय अल्पवयीन प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केले.या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली.

याप्रकरणी पीडित विद्यार्थिनीने महाविद्यालयीन शिक्षक आणि आई-वडिलांना हा प्रकार सांगितल्यानंतर ही घटना समोर आली. या घटनेनंतर त्यांनी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेउन आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी आरोपीविरोधात पोक्सो कायदा आणि भारतीय न्याय संहिताअंतर्गत गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे. अद्याप आरोपीला अटक करण्यात आली नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित मुलगी काही दिवसांपासून सरावासाठी जिममध्ये जात नव्हती. याचदरम्यान तिला आरोपीकडून हाय असा मेसेज आला. मुलीने आईला याबाबत माहिती देत मेसेज का केला?, अशी विचारणा केली असता आरोपीने तिला जिममध्ये बोलावल्याचो सांगितल्याचा आरोप आहे.

यानंतर मुलगी सकाळी ११ वाजता जिममध्ये गेली असता तिथे ती एकटीच असल्याचे समोर आले. आरोपीने तिला शूज आत ठेवण्यास सांगितले. ती शूज ठेवण्यासाठी गेल्यानंतर आरोपीने दरवाजा बंद करून तिच्याशी जबरदस्ती केली आणि लैंगिक अत्याचार केले. यानंतर पीडित मुलगी प्रचंड घाबरली. तिने कालेजमध्ये जाउन या घटनेची माहिती मैत्रिणीला दिली त्यानंतर ही संतापजनक घटना समोर आली. या घटनेनंतर आरोपीने याबाबत कोणालाही सांगू नको, असे मुलीला धमकावल्याच्या आरोपीवर आरोप आहे. मात्र घाबरलेल्या मुलीने कालेजमध्ये गेल्यानंतर आपल्या मैत्रिणीला घटनेची माहिती दिली. ती रडू लागल्यानंतर तिच्या मैत्रिणींनी तिला शिक्षकांना याबाबत सांगण्यास सांगितले.




त्यानंतर मुलीने ज्युनिअर कालेजच्या शिक्षिकेला आणि आपल्या पालकांना घटनेची माहिती दिली. पालकांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केल्यानंतर आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## भंडारा, महाप्रसादासाठी FDAची परवानगी बंधनकारक
### नियमांचं उल्लंघन केल्यास गुन्हा होईल दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :** भंडारा आणि महाप्रसाद कार्यक्रमांचं आयोजन करण्याचा विचार करत असाल तर थांबा. तुमच्याकडे कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी आहे का ? नसेल तर तुमच्यावर अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाई होउ शकते. कारण राज्यातील भंडारा आणि महाप्रसाद कार्यक्रमांसाठी अन्न व औषध प्रशासनाने नोंदणी बंधनकारक केली आहे.जर विनापरवाना असे कार्यक्रम आयोजित केल्यास संबंधित आयोजकांवर थेट कायदेशीर कारवाई होणार असून, गरज पडल्यास गुन्हाही दाखल केला जाईल. अन्नातून विषबाधा होण्यासारखे प्रकार टाळण्यासाठी आणि अन्न सुरक्षा तसेच स्वच्छता मानके राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.श्रावणापासून दिवाळीपर्यंत सण-समारंभांचा उत्सव सुरू असतो. या काळात कोल्हापूर जिल्ह्यात विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये महाप्रसाद आणि जेवणावळींचे आयोजन केले जाते. मात्र, अशा कार्यक्रमांसाठी अन्न व औषध प्रशासनाची परवानगी घेणे आता बंधनकारक असणार आहे. अन्नपदार्थ तयार करणा-या आयोजकांनी स्वच्छ व निर्जंतुक पाण्याचा वापर, स्वच्छ भांडी आणि स्वच्छतेच्या नियमांचे पालन करावे, तसेच मुदतबाह्य आणि नाशवंत पदार्थांचा




वापर टाळावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाने केलंय.


कोल्हापूर जिल्ह्यात नउ अन्नसुरक्षा अधिका-यांच्या माध्यमातून महाप्रसाद आणि जेवणावळींची तपासणी करण्यात येणार आहे. यावेळी अस्वच्छता किंवा अन्नसुरक्षा नियमांचा भंग आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्तउदय लोहकरे यांनी दिली आहे.

**काय आहे नवा नियम-**एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी महाप्रसाद आणि भंडारा आयोजनासाठी नव्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या सूचनांनुसार, कोणत्याही मोठ्या कार्यक्रमात अन्नवाटप करण्यापूर्वी आयोजकांना अधिकृत नोंदणी किंवा परवाना घेणे आवश्यक आहे. या नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कडक कारवाई केली जाणार आहे.

**नोंदणी प्रक्रिया सुलभ, शुल्क अवघे शंभर रुपये-**एफडीएने ही प्रक्रिया सुलभ केली आहे. ऑनलाइन पद्धतीने अवघ्या शंभर रुपयांमध्ये नोंदणी करून आवश्यक परवाना मिळवता येईल. दरम्यान सण-उत्सवांच्या काळात राज्यभरात अनेक ठिकाणी भंडारा आणि महाप्रसादाचे आयोजन केले जात असते. मोठ्या संख्येने भाविक या कार्यक्रमांना उपस्थित राहतात. त्यामुळे अन्नाच्या गुणवत्तेबाबत आणि स्वच्छतेबाबत जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने एफडीएने हा निर्णय घेतलाय.

## लागोपाठ 4 दिवस बँका बंद

**मुंबई/प्रतिनिधी :** तुम्ही बँकांते व्यवहार करत असाल तर ही माहिती तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. बँक कर्मचारी आणि अधिका-यांची संयुक्त संस्था युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स (UFBU) यांनी ११ सप्टेंबर रोजी देशव्यापी संपाची घोषणा केली आहे. त्यामुळे सरकारी बँकांच्या कामकाजावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असून, ग्राहकांना सलग चार दिवस बँकिंग सेवांमध्ये अडचणींचा सामना करावा लागू शकतो.




११ सप्टेंबरला शुक्रवार असल्यामुळे त्यानंतर शनिवार आणि रविवारची साप्ताहिक सुट्टी आहे. त्यातच १४ सप्टेंबरला काही राज्यांमध्ये गणेश चतुर्थीची सुट्टी असल्यामुळे काही भागांत बँका सलग चार दिवस बंद राहण्याची शक्यता आहे. मात्र, सुट्ट्यांमुळे होणारा परिणाम राज्यनिहाय वेगळा असू शकतो.

**पुढे तीन दिवसांचा संप-** UFBU ने सरकार आणि बँक व्यवस्थापनाने मागण्यांकडे लक्ष दिलं नाही तर २८ सप्टेंबरपासून तीन दिवसांचा सलग संप करण्याचा इशारा दिला आहे. विशेष म्हणजे ही वेळ सहामाही लेखा-जोख्याच्या दिवसांशी संबंधित असल्याने बँकिंग व्यवहारांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. मागण्या मान्य न झाल्यास २६ ऑक्टोबरपासून अनिश्चितकालीन संप करण्याचा इशाराही संघटनांनी दिला आहे.

**पाच दिवसांच्या बँकिंगचा निर्णय अजूनही रखडलेला-** UFBUच्या म्हणण्यांनुसार, भारतीय बँक संघाने (IBA) मार्च २०२४ मध्ये झालेल्या १२ व्या द्विवार्षिक करारांतर्गत आठवड्यात पाच दिवस बँकिंग करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली होती. सोमवार ते शुक्रवार कामकाज ठेवून दररोज कामाचे तास ४० मिनिटांनी वाढवण्याचा प्रस्ताव होता. मात्र सरकारची अंतिम मंजुरी अजून रखडलेली असल्याचा संघटनांचा दावा आहे.

# सोन्याने नवा ऊच्चांक गाठला! आठवड्याच्या पहिल्याच दिवशी मोठी वाढ

### 24 कॅरेटच्या 1 तोळा सोन्याच्या दरामध्ये 880 रुपयांनी वाढ झाली

**मुंबई/प्रतिनिधी :**सोन्याच्या दरात सतत चढ-उतार होताना पाहायला मिळत आहे. रोज सोनं नवा ऊच्चांक गाठत आहे. अशातच आज आठवड्याच्या पहिल्या दिवशी सोन्याच्या दरात पुन्हा मोठी वाढ झाली आहे. २४ कॅरेटच्या १ तोळा सोन्याच्या दरामध्ये ८८० रुपयांनी वाढ झाली आहे. आज चांदीच्या दरात कोणताही बदल झाला नाही त्यामुळे ग्राहकांना दिलासा मिळाला. पण सोन्याच्या दरात वाढ झाल्यामुळे ग्राहकांमध्ये नाराजी पाहायला मिळत आहे.

गुड रिटर्न्सने दिलेल्या माहितीनुसार, आज २४ कॅरेटच्या १ ग्रॅम सोन्याच्या दरामध्ये ८८ रुपयांनी वाढ झाली असून या सोन्याची किंमत १६,३९७ रुपये इतकी झाली आहे. २४ कॅरेटच्या १ तोळा सोन्याच्या दरामध्ये ८८० रुपयांनी वाढ झाली आहे. हे सोनं खरेदीसाठी तुम्हाला आज १,६३,९७० रुपये खर्च करावे लागतील. तर २४ कॅरेटच्या १० तोळा सोन्याच्या दरामध्ये ८८०० रुपयांची वाढ झाली आहे. हे सोनं खरेदी करण्यासाठी आज १६,३९,७०० रुपये मोजावे लागतील.

**Gold Prices: सोनं का महागतंय? सोनं ३ लाखांच्या पार जाणार?-**२२ कॅरेट सोन्याच्या दरात देखील आज चांगलीच वाढ झाली आहे. २२ कॅरेटच्या १ ग्रॅम सोन्याच्या दरात ८० रुपयांची वाढ झाली असून हे सोनं १५,०३० रुपयांना विकले जात आहे. २२ कॅरेटच्या १ तोळा सोन्याच्या दरामध्ये ८०० रुपयांची वाढ झाली असून हे सोनं खरेदीसाठी आज तुम्हाला १,५०,३०० रुपये खर्च करावे लागतील. तर २२ कॅरेटच्या १० तोळा सोन्याच्या दरामध्ये ८००० रुपयांची वाढ झाली असून हे सोनं खरेदीसाठी आज तुम्हाला १५,०३,००० रुपये खर्च करावे लागतील.



**सोने चांदीच्या दरात विक्रमी वाढ! १ तोळा सोने इतक्या रुपयांनी महागले; वाचा आजचे ताजे दर**

२४ आणि २२ कॅरेट सोन्यापाठोपाठ आज १८ कॅरेट सोन्याच्या दरात देखील मोठी वाढ झाली आहे. २२ कॅरेटच्या १ ग्रॅम सोन्याच्या दरामध्ये ६१ रुपयांची वाढ झाली असून हे सोनं खरेदीसाठी तुम्हाला १२,२९३ रुपये खर्च करावे लागतील. २२ कॅरेटच्या १ तोळा सोन्याच्या दरामध्ये ६१० रुपयांची वाढ झाली असून हे सोनं १,२२,९३० रुपयांना विकले जात आहे. २२ कॅरेटच्या १० तोळा सोन्याच्या दरामध्ये ६,१०० रुपयांची वाढ झाली असून हे सोनं १२,२९,३०० रुपयांना विकले जात आहे.

**सोन्याच्या दरात मोठी घसरण; वाचा २४K, २२K आणि १८K चे ताजे दर-** दरम्यान, आज चांदीच्या दरात कोणताही बदल झाला नाही. १ ग्रॅम चांदी आज २६० रुपयांना विकली जात आहे. १० ग्रॅम चांदीचे दर २,६०० रुपये इतके आहे. तर १ किलो चांदीचे दर २,६०,००० रुपये इतके झाले आहे. आज चांदीच्या दरात काहीच बदल न झाल्यामुळे चांदी खरेदी करण्याची चांगली संधी आहे.

## राहुल गांधींच्या कपड्यांवर जेनझी इफेक्ट?

**नवी दिल्ली :** राजकारण्यांचा पोषाख नेहमीच चर्चेचा विषय असतो. पांढरा शुभ्र सदरा हा राजकारण्यांचा ठरलेला पोषाख आहे. त्यावर काहीजण जॅकेट परिधान करून पोषाखाचा लूक बदलण्याचा प्रयत्न करतात. मात्र, गेल्या काही दिवसांपासून राजकारण्यांचा हा नेहमीचा अटायर बदलत चालला आहे. सार्वजनिक सभांमध्येही काही नेते मंडळी टी-शर्ट किंवा फ?र्मल्स घालून यायला लागले आहेत. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून राहुल गांधींच्या रंगीबेरंगी शर्टचीही चर्चा होत आहे.काँग्रेस नेते राहुल गांधी राजकारण्यांच्या पोशाखाच्या बाबतीत एक नवीन पायंडा पाडत आहेत. ५६ वर्षांचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २०२२ मधील त्यांच्या भारत जोडो यात्रे दरम्यान टी-शर्ट घालण्यास सुरुवात केली होती. मात्र, गेल्या काही दिवसांत ते घालत असलेले नवीन टी-शर्ट पूर्णपणे वेगळे आहेत. कन्याकुमारी ते काश्मीर दरम्यानच्या भारत जोडो यात्रेदरम्यान, गांधींनी पांढ-या टी-शर्टमध्ये पदयात्रा करत एक स्पोर्टी लूक कायम ठेवला होता. अगदी हिवाळ्याच्या दिवसांतही त्यांनी टी-शर्टच परिधान केला होता. त्यानंतर, पक्षाच्या कार्यक्रमांपासून राजकीय दौ-यांपर्यंत विविध कार्यक्रमांमध्ये ते



सातत्याने टी-शर्टमध्येच दिसले.

तसंच, पूर्वी केवळ कुर्ता-पायजमा घालणारे अनेक काँग्रेस नेतेही टी-शर्ट घालू लागले. अलाहाबादमधील विद्यार्थ्यांसोबतच्या संवादादरम्यान त्यांनी गुलाबी रंगाचा शर्ट घातला होता, ज्याची सोशल मीडियावर जोरदार चर्चा झाली. तर पुण्यात त्यांनी पिवळा शर्ट परिधान केला होता. पुण्याच्या कार्यक्रमात प्रामुख्याने विद्यार्थिनी आणि नोकरदार महिलांवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते, तिथे गांधींनी महिलांची सुरक्षा, स्वातंत्र्य आणि त्यांच्या हक्कांच्या मुद्यांवर संवाद साधला. काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी हे जेन झी तरुण आणि महिला या दोन्ही घटकांवर मोठ्या प्रमाणावर लक्ष केंद्रित करत आहेत.

गेल्या काही निवडणुकांमध्ये भाजपाने तरुण आणि महिला मतदारांना आकर्षित करण्यात यश मिळवलं आहे, कारण या दोन्ही घटकांचा निवडणुकीच्या निकालांवर मोठा प्रभाव पडतो. आता काँग्रेसनेही अशाच प्रकारची रणनीती अवलंबली आहे, मात्र त्यांची कार्यपद्धती वेगळी आहे. काँग्रेस आता जेन झी तरुण आणि महिला मतदारांवर विशेष भर देत आहे, जे आगामी निवडणुकांचे भवितव्य ठरवणार आहेत.

**छात्रों की गूंज कार्यक्रमात रंगीबेरंगी पोषाख-**आता पेपरफुटीच्या मुद्यांवरून थेट जेन झी तरुणांपर्यंत पोहोचण्यासाठी राहुल गांधी देशभरात छात्रों की गूंज कार्यक्रम राबवत आहेत. यासाठी त्यांनी रंगीबेरंगी शर्ट्सना पसंती दिली आहे. राहुल गांधींच्या या शर्ट लूकवरून इतर राजकारण्यांनी त्यांच्यावर वारंवार टीका केली आहे. आता तर त्यांनी रंगीबेरंगी शर्ट्स घालून आपल्या या शैलीचा अधिकच विस्तार केला आहे. कोटा येथे पेपरफुटीच्या मुद्द्यावर त्यांनी पहिल्या छात्रों की गूंज कार्यक्रमाची सुरुवात केली, तेव्हा त्यांनी निळा टी- शर्ट घातला होता. डेहराडूनमध्ये त्यांनी टी-शर्टऐवजी शर्ट घातला होता.

## मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार

**इंफाळ :** देशातील ईशान्येकडील महत्त्वाचे राज्य असलेल्या मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उफाळून आला आहे. सेनापती जिल्ह्यामध्ये सोमवारी दोन गटांमध्ये हिंसक चकमक उडाली. यावेळी अनेक घरे पेटवण्यात आली असून परिस्थिती नियंत्रणात आणताना झालेल्या गोळीबारात केंद्रीय राखीव पोलिस दलाचा (सीआरपीएफ) एक जवान गंभीर जखमी झाला आहे.पोलिस अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी पहाटे अडीचच्या सुमारास हिंसाचाराची सुरुवात झाली. कांगपोकपी जिल्ह्यातील ताफू कुकी गावात एका घराला आग लावण्यात आली. या घटनेचे तीव्र पडसाद सकाळच्या सुमारास सेनापती जिल्ह्यातही उमटले. नागा ताफू भागामध्ये अज्ञातांनी अनेक घरांना आग लावली. दरम्यान, सकाळी ९.२० च्या सुमारास ताफू नागा परिसरात दोन सशस्त्र गट आमनेसामने आले आणि त्यांच्यात जोरदार गोळीबार झाला. या चकमकीत सुरक्षा व्यवस्थेसाठी तैनात असलेला सीआरपीएफ जवान जखमी झाला.

## मोदी 1500 हून अधिक ठिकाणी तरुणांशी संवाद साधणार

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी देशभरातील १५०० हून अधिक ठिकाणी तरुण आणि खेळाडूंशी व्हर्च्युअल संवाद साधतील. हा कार्यक्रम २९ ऑगस्ट रोजी साजरा होणा-या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित करण्यात येत आहे.मोदींचे संबोधन क्रीडा मंत्रालयाच्या राष्ट्रव्यापी खेलो इंडिया संवाद-खेळाची बात, पीएमसोबत या कार्यक्रमाचा भाग असेल. हा कार्यक्रम राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या दोन दिवस आधी आयोजित केला जाईल. २९ ऑगस्ट रोजी हाकीचे दिग्गज खेळाडू ध्यानचंद यांची जयंती असते. याच दिवशी देशात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी मीडिया ब्रीफिंगमध्ये सांगितले की, पंतप्रधानांच्या स्वातंत्र्यदिनाच्या संदेशातील खेळ आणि युवा शक्तीशी संबंधित मुख्य अंश देखील दाखवले जातील. त्यानंतर पंतप्रधान देशभरातील तरुणांना व्हर्च्युअल संबोधित करतील. या उपक्रमांतर्गत देशभरातील १५०० हून अधिक ठिकाणी तरुण, खेळाडू आणि शैक्षणिक संस्था एकत्र येत आहेत, असे ते म्हणाले. आयआयटी, आयआयएम, एनआयटी, एम्स प्रमुख वैद्यकीय महाविद्यालये आणि विद्यापीठांसह अनेक मोठ्या शिक्षण संस्था या राष्ट्रव्यापी अभियानात सहभागी होत आहेत.

मांडविया यांच्या मते, हा कार्यक्रम खेळात रुची असलेल्या तरुणांमध्ये आणि देशाच्या धोरणकर्त्यांमध्ये थेट संवाद साधण्याचा एक मोठा प्रयत्न आहे. यामुळे तरुणांना त्यांचे विचार, अनुभव आणि सूचना सामायिक करण्याची संधी मिळेल. कार्यक्रमाची सुरुवात माय भारतच्या स्वयंसेवकांच्या स्वागताने होईल. यानंतर, गेल्या १२ वर्षांत भारताच्या क्रीडा प्रणालीत झालेल्या बदलांवर एक विशेष व्हीडीओ दाखवला जाईल. पंतप्रधानांच्या भाषणानंतर देशभरातील १५०० हून अधिक ठिकाणी प्रत्यक्ष कार्यक्रमांना सुरुवात होईल.

**दिल्लीत चार-पाच ठिकाणी कार्यक्रम-** राष्ट्रीय राजधानी दिल्लीत हे आयोजन चार-पाच ठिकाणी केले जाईल.




यात आयआयटी दिल्लीचाही समावेश आहे, जिथे मांडविया कार्यक्रमात उपस्थित राहतील. मांडविया म्हणाले, मी २७ ऑगस्ट रोजी आयआयटी दिल्ली येथे होणा-या कार्यक्रमात उपस्थित राहीन. भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पीटी उषा यांच्यासह भारताचे सध्याचे आणि माजी खेळाडू तसेच आंतरराष्ट्रीय पदक विजेतेही युवकांशी संवाद साधतील. या खेळाडूंमध्ये मनिका बत्रा, दीपा कर्माकर, सायना नेहवाल, गगन नारंग, श्रीजेश, मेरी कोम, बायचुंग भुतिया, पुलेला गोपीचंद, अंजू बाबी जॉर्ज, कर्णम मल्लेश्वरी आणि मीराबाई चानू यांचा समावेश आहे. काही क्रिकेटपटूही युवकांशी संवाद साधतील.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ मंगळवार, २५ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# व्यावसायिक संकुलधारकांची मनमानी ; नगर परिषद प्रशासनाचे अभय ?

## सार्वजनिक रस्त्यावर घाणीचे साम्राज्य ; अतिक्रमणामुळे वाहतुकीचा खोळंबा



■ प्रतिनिधी | कारंजा ■

झाशी राणी चौक बायपास, मानोरा रोड परिसरात सार्वजनिक रस्ता व सर्व्हिस रोडच्या जागेत करण्यात आलेल्या कथित अतिक्रमणामुळे नागरिक व वाहनधारकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सौरभ कॉम्प्लेक्सलगत मुख्य रस्त्याच्या कडेला तसेच सर्व्हिस रोडच्या जागेत टिनपत्राचे कंपाऊंड उभारण्यात आल्याने नागरिकांच्या ये-जा करण्याची जागा अरुंद झाली असून, वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

दिनांक १९ ऑगस्ट २०२६ रोजी नगर परिषद कर्मचाऱ्यांनी मौजे काळी कारंजा येथील सर्व्हे नं. १९२/१ मधील भूखंड क्र. १ येथे प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले होते. सदर ठिकाणी बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर मुख्य रस्त्यावर ठेवण्यात आलेले बांधकाम साहित्य तीन दिवसांच्या आत हटविण्याची सूचना संबंधितांना करण्यात आली होती. मात्र, स्थळ निरीक्षणाच्या वेळी मुख्य रस्त्यालगत असलेले टिनपत्राचे कंपाऊंड, सर्व्हिस रोडच्या जागेतील अडथळे आणि नागरिकांच्या वाहतुकीवर होणारा परिणाम प्रशासनाच्या निदर्शनास आला नाही का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

सदर परिसरात टिनपत्रे लावून सर्व्हिस रोडचा प्रवेश अरुंद अथवा बंद करण्याचा प्रकार होत असल्याने पादचारी, स्थानिक रहिवासी तसेच वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यातच रस्त्याच्या कडेला अस्ताव्यस्तपणे वाहने उभी केली जात असल्याने वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण होत असल्याचे चित्र आहे. परिणामी वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनालाही हस्तक्षेप करावा लागत असल्याने पोलिसांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### झाशी राणी चौक परिसरात कचऱ्याचे साम्राज्य

अतिक्रमणाच्या समस्येसोबतच झाशी राणी चौक परिसरात काही व्यावसायिक प्रतिष्ठाने व इतरांकडून उघड्यावर मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असल्याने परिसराला अक्षरशः कचरा डेपोचे स्वरूप प्राप्त झाले आहे. कचऱ्यामुळे दुर्गंधी निर्माण झाली असून पावसाळ्यात साथीचे आजार पसरण्याची शक्यता निर्माण झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

नगर परिषद प्रशासन व आरोग्य विभागाने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन परिसराची स्वच्छता करावी, तसेच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

दिनांक १९ ऑगस्ट रोजी करण्यात आलेल्या स्थळ निरीक्षणानंतरही प्रत्यक्ष परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झाली नसल्यास संबंधित प्रकरणाची पुनर्तपासणी करण्याची गरज आहे. स्थळ निरीक्षणादरम्यान नागरिकांना होणारा त्रास प्रशासनाच्या निदर्शनास आला नाही का किंवा त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

अतिक्रमण तात्काळ हटविण्याची मागणी

सार्वजनिक रस्ता व सर्व्हिस रोड नागरिकांच्या सुरक्षित व सुरळीत वाहतुकीसाठी मोकळा असणे आवश्यक आहे. त्यामुळे मुख्य रस्त्यालगत व सर्व्हिस रोडच्या जागेत उभारण्यात आलेले अनधिकृत टिनपत्राचे कंपाऊंड, बांधकाम साहित्य व इतर अडथळे तात्काळ हटवावेत. तसेच सर्व्हिस रोड पूर्णपणे नागरिक व वाहनधारकांसाठी खुला करावा, रस्त्याच्या कडेला वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर कारवाई करावी आणि परिसरातील कचरा तातडीने हटवून नियमित स्वच्छता व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### आंदोलनाचा इशारा

प्रशासनाने या गंभीर समस्यांकडे तातडीने लक्ष देऊन नियमानुसार कारवाई न केल्यास नागरिकांच्या हितासाठी नवनिर्माण फाऊंडेशनच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा अध्यक्ष अनुप ठाकरे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनाची प्रत मा. जिल्हाधिकारी, वाशिम यांनाही देण्यात आली असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा, सार्वजनिक रस्त्याचा आणि वाहतुकीच्या सुरळीत व्यवस्थेचा विचार करून संबंधित अतिक्रमण व अस्वच्छतेवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# जिल्हा परिषद शाळा बचावासाठी मंगरूळपीरमध्ये सर्वपक्षीय बैठक संपन्न

## शाळा बंद होऊ नयेत यासाठी विविध विषयांवर चर्चा ; सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन



■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्वसामान्य व गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रमुख आधार असलेल्या जिल्हा परिषद शाळा कायम सुरू राहाव्यात आणि कोणत्याही परिस्थितीत त्या बंद होऊ नयेत, यासाठी 'जिल्हा परिषद शाळा बचाव अभियान' राबविण्याचा निर्धार करण्यात आला आहे. या अभियानाच्या नियोजनासाठी रविवार, २३ ऑगस्ट २०२६ रोजी जुन्या पंचायत समिती सभागृहात सर्वपक्षीय बैठक संपन्न झाली. बैठकीमध्ये तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांसमोरील विविध अडचणी, विद्यार्थ्यांची संख्या, शिक्षकांची उपलब्धता, शाळांमधील आवश्यक भौतिक सुविधा तसेच शाळा टिकविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण या शाळांवर अवलंबून असून, शाळा बंद झाल्यास गोरगरीब पालकांवर खासगी शिक्षणाचा अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे, आवश्यक शिक्षक उपलब्ध करून देणे, मूलभूत सुविधा निर्माण करणे तसेच शासनस्तरावर विविध मागण्या मांडण्यासाठी पुढील काळात व्यापक अभियान राबविण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. गावागावातून पालक, ग्रामपंचायत पदाधिकारी, शिक्षक, ग्रामशिक्षण समितीचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणप्रेमी युवक आणि नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. हे अभियान कोणत्याही पक्षभेद, व्यक्तिभेद अथवा राजकीय मतभेद न ठेवता सर्वसमावेशक पद्धतीने राबविण्याची भूमिका यावेळी घेण्यात आली. 'पक्षभेद विसरूया, गावची शाळा वाचवूया' या भावनेने सर्वांनी एकत्र येऊन जिल्हा परिषद शाळांना बळ देण्याची गरज व्यक्त करण्यात आली. व यासाठी लवकरच शाळा बचाव समीती स्थापन करुन प्रत्येक गावात विषेश मोहीम राबवन्याचाही संकल्प करन्यात आला.

## सामाजिक उत्तरदायित्वातून शासकीय आरोग्य सेवेला बळ

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथील दंत रोगशास्त्र विभागातील रुग्णसेवा अधिक सक्षम व प्रभावी करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

# धनज बु. येथील मुख्य रस्ता खड्ड्यांत

## वाहतूक आणि विद्यार्थ्यांची कोंडी



■ प्रतिनिधी | कारंजा ■

धनज बु. येथील बसस्थानक परिसरातील मुख्य रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचल्याने नागरिकांसह वाहनचालक आणि शाळकरी विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावरील पाणी व खड्ड्यांमुळे वाहतुकीची कोंडी होत असून, दळणवळणावरही परिणाम होत आहे.

मुख्य रस्त्याच्या कामाला अद्याप सुरुवात झालेली नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करताना तसेच नागरिकांना दैनंदिन कामांसाठी या रस्त्याचा वापर करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

त्यामुळे धनज बु. येथील मुख्य रस्त्याचे नवीन डांबरीकरणाचे काम तातडीने सुरू करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. स्थानिक आमदार सईताई डहाके यांच्या प्रयत्नातून या रस्त्याचे काम लवकरात लवकर मार्गी लागावे, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते विशाल अघमे यांनी संबंधित प्रशासन व लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी केली आहे.

# विदर्भ चेंबरच्या एमएसएमई प्रशिक्षण शिबिरास उद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, अकोला यांच्या वतीने टिळक मार्गावरील चेंबरच्या सभागृहात बिझनेस ट्रान्सफॉर्मेशन फोरम अंतर्गत विशेष एमएसएमई प्रशिक्षण शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाले.यास उद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.हा व्यवसाय विस्तार, डिजिटल परिवर्तन व व्यावहारिक प्रशिक्षणाबाबत वाढत असलेल्या रुचीचे द्योतक ठरला. विदर्भ चेंबरचे अध्यक्ष नीरव वोरा यांच्या अध्यक्षतेत व चेंबरचे कनिष्ठ उपाध्यक्ष किशोर बाछूका, कोषाध्यक्ष श्रीकांत गोयनका ,सहसचिव संतोष छाजेड आदींच्या उपस्थितीत आयोजित या शिबिराचा प्रारंभ प्रमुख वक्त्या मुंबई येथील पौर्णिमा शिरिषकर व नासिक येथील विवेक शिंदे यांच्या स्वागताने करण्यात आला. अध्यक्ष नीरव वोरा यांनी प्रास्ताविकात उपक्रमाची माहिती दिली. व्यावसायिक वातावरणात केवळ चांगला व्यवसाय करणे पुरेसे नसून, नवीन तंत्रज्ञान, माहिती आणि विचारसरणीचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

# तूर व सोयाबीन पिकांतील कीड - रोग व्यवस्थापनावर प्रशिक्षण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी विज्ञान केंद्र व कृषी विभाग, मालेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे मुंगळा येथे दि. २१ ऑगस्ट रोजी 'स्वच्छता ही सेवा तसेच तूर व सोयाबीन पिकांतील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन' या विषयावर एकदिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.



यावेळी कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने डॉ. डी. एन. इंगोले यांनी उपस्थित शेतकऱ्यांना तूर व सोयाबीन पिकांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख किडी व रोगांची शास्त्रीय ओळख, त्यांची लक्षणे, प्रादुर्भावाची कारणे तसेच एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) व एकात्मिक रोग व्यवस्थापन या तंत्रांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कीड व रोगांचे नियमित निरीक्षण, आर्थिक नुकसान पातळीच्या (ETL) आधारे योग्य वेळी नियंत्रण उपाययोजनांचा अवलंब, जैविक व यांत्रिक पद्धतींचा वापर तसेच रासायनिक कीटकनाशकांचा गरजेनुसार व शिफारशीनुसार वापर करण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. तसेच 'स्वच्छता ही सेवा' अभियानाच्या अनुषंगाने परिसर स्वच्छता, कृषी अवशेषांचे योग्य व्यवस्थापन, स्वच्छ व निरोगी कृषी परिसर निर्मिती आणि स्वच्छतेचे कृषी उत्पादन व सार्वजनिक आरोग्याशी असलेले महत्त्व याबाबतही शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमास प्रगतशील शेतकरी प्रकाशराव राऊत व श्री. अशोक राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. कृषी विभागाच्या वतीने सहाय्यक कृषी अधिकारी रुस्तम सोनवणे यांनी कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना, अनुदान योजना व शेतकरी कल्याणकारी उपक्रमांची माहिती देऊन पात्र शेतकऱ्यांनी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या प्रशिक्षणामुळे शेतकऱ्यांना तूर व सोयाबीन पिकांमध्ये शास्त्रीय, पर्यावरणपूरक व आर्थिकदृष्ट्या कार्यक्षम कीड-रोग व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी उपयुक्त तांत्रिक मार्गदर्शन मिळाले.

# स्वच्छता उपक्रमातून 'स्वच्छ शाळा, सुंदर शाळा' चा संदेश



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद वाशिम यांच्या वतीने 'स्वच्छ गाव – सुरक्षित पर्यावरण' या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या १० दिवसीय एदर्मेत शृं छ्ं र्ष्स्ड्डिह अंतर्गत कामरगाव येथील पी.एम. श्री. जिल्हा परिषद विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात विविध स्वच्छता व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. या अभियानाला विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक गजानन खुळे, प्राथमिक शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे आणि कारंजा पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी श्रीकांत माने यांच्या मार्गदर्शनाखाली अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ची प्रभावी अंमलबजावणी, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, प्लास्टिकचा वापर कमी करणे, ओला व सुका कचरा स्वतंत्र करणे, जुन्या कचऱ्याच्या ढिगांची विल्हेवाट आणि सुरक्षित पर्यावरणाबाबत जनजागृती हा अभियानाचा मुख्य उद्देश होता.अभियानातील दररोजचा संदेश शाळेतील सर्व वर्गांच्या ग्रुपवर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. त्यानुसार विद्यार्थ्यांनी संबंधित उपक्रम प्रत्यक्ष राबवून स्वच्छतेचा संदेश दिला. 'प्रत्येक घरातून कचऱ्याचे चार प्रकारात वर्गीकरण', 'उघड्यावर कचरा टाकू नका', 'झाकलेल्या घंटागाडीचा वापर करा', 'ओल्या कचऱ्यापासून खत तयार करा', 'प्लास्टिकमुक्त गावाची शपथ', 'मोठ्या प्रमाणातील कचऱ्याची जबाबदारी', 'शाळा व सार्वजनिक संस्थांची भूमिका' तसेच 'नियमांचे पालन' या विषयांवर विविध उपक्रम घेण्यात आले.

# प्रा.डॉ. प्रसेनजित चिखलीकर यांना महाराष्ट्र समाज भूषण पुरस्कार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

युवा कर्तुत्व फाउंडेशन, महाराष्ट्र व मानव चेतना जनविकास बहुउद्देशीय सेवा संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने लक्षवेध कर्तृत्व गौरव संमेलन, अमरावती २०२६ तर्फे दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी श्री. रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, वाशिम येथील प्रा.डॉ. प्रसेनजित चिखलीकर यांना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व लोकाभिमुख कार्याची दखल घेऊन त्यांना 'महाराष्ट्र समाज भूषण पुरस्कार ' देण्यात आला. डॉ. रवींद्र कोल्हे (पद्मश्री, भारत सरकार, ज्येष्ठ सुप्रसिद्ध समाजसेवक मेळघाट) व ईशा भिसे (अभिनेत्री) यांच्या शुभहस्ते प्रा.डॉ. प्रसेनजित चिखलीकर यांना शॉल, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यापूर्वी सुद्धा त्यांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

# विद्याभारती शाळेच्या स्काऊट - गाईड पथकाद्वारे श्रावण मासानिमित्त सेवा प्रकल्प

■ प्रतिनिधी | वाशिम ■



श्रावण मासानिमित्त विद्याभारती प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या स्काऊट-गाईड पथकाच्या वतीने सिव्हिल लाईन वाशिम येथील काशी विश्वेश्वर मंदिर येथे सेवाभावी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, सामाजिक बांधिलकी, स्वच्छतेची जाणीव आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने हा सेवा प्रकल्प राबविण्यात आला.

संस्थेचे आधारस्तंभ तथा अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे सर यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उत्साहात पार पडला.

स्काऊट-गाईड पथकातील विद्यार्थ्यांनी मंदिर परिसराची स्वच्छता करून परिसर स्वच्छ व सुंदर केला. मंदिर परिसरातील कचरा संकलित करून स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. तसेच मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांना विद्यार्थ्यांच्या हस्ते प्रसादाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून इयत्ता ५ वी ते ८वीतील विद्यार्थ्यांनी 'सेवा हीच साधना' या भावनेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे, समाजासाठी योगदान देणे आणि गरजूंच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहणे, यांसारखी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक नितेश मिटकरी, पर्यवेक्षक विजय गोटे, कार्यप्रमुख मयूर वाडेकर, कीर्ती कुलकर्णी तसेच शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते. त्यांच्या सहकार्यामुळे सेवा प्रकल्प यशस्वीपणे पार पडला.

स्काऊट-गाईड पथकातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत मंदिर परिसराची स्वच्छता व प्रसाद वाटपाचे कार्य शिस्तबद्ध पद्धतीने केले. विद्यार्थ्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे उपस्थित भाविक व नागरिकांनी कौतुक केले.

# आजपासून जिल्ह्यात 'पथदर्शी प्रकल्पाची सुरुवात' ; मोबाईल ॲपद्वारे खत बुकिंग

■ प्रतिनिधी | वाशिम ■

खत विक्री आराखड्यानुसार आता मोबाईल ॲपद्वारे खताची नोंदणी व खरेदी करता येणार आहे. खत वितरण प्रणालीच्या 'फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल' (एफएफएफएस) या पथदर्शी प्रकल्पाच्या अंमलबजावणी होत असून २५ ऑगस्ट २०२६ पासून जिल्ह्यात प्रत्यक्ष या प्रकल्पाची सुरुवात होणार आहे.

एफएफएफएस या पथदर्शी प्रकल्पाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व तहसीलदार, गट विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व सहाय्यक निबंधक यांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या आहेत. तालुक्यातील सर्व कृषी सहाय्यक, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), ग्रामपंचायत अधिकारी, कृषी मित्र, कृषी सखी, कृषी तंत्र व्यवस्थापक (एटीएम) व तालुका तंत्र व्यवस्थापक (बीटीएम) यांचे विशेष प्रशिक्षण आयोजित करावे. या प्रशिक्षणात प्रणालीची संपूर्ण कार्यपद्धती आणि उद्दिष्टे समजावून सांगावीत, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

प्रत्येक गावासाठी एका अधिकारी किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक करून गावपातळीवर शेतकरी, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पंचायत समिती सदस्य व लोकप्रतिनिधी यांना या प्रकल्पाची माहिती देऊन व्यापक जनजागृती करावी, असेही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी सांगितले आहे.

शेतकरी ओळख क्रमांक व खत वितरण प्रणालीचे एकत्रीकरण या पथदर्शी प्रकल्पामध्ये ॲग्री स्टॅकचा शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) व खत वितरणाची एकात्मिक खत व्यवस्थापन प्रणाली (आयएफएमएस) यांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे.

खत वितरणासाठी शेतकऱ्यांसाठी 'फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल' अर्थात 'खत विक्रीसाठी चौकट' हे ॲप तयार करण्यात आले असून, या ॲपद्वारे शेतकऱ्यांना अनुदानित खताची बुकिंग करता येणार आहे. हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. या ॲपच्या वापरामुळे खत दुकानांमध्ये खत उपलब्ध आहे किंवा नाही, याची माहिती शेतकऱ्यांना घरबसल्या मिळणार आहे. त्यामुळे खत खरेदीसाठी रांगेत उभे राहून प्रतीक्षा करण्याचा शेतकऱ्यांचा वेळ वाचणार आहे.

शेतकऱ्याने ॲपद्वारे आपल्या पसंतीच्या कृषी सेवा केंद्राकडे खत बुक केल्यानंतर ॲपमध्ये द्रुत प्रतिसाद संकेत (क्यूआर संकेत) निर्माण होईल. बुक केलेले खत तीन दिवस शेतकऱ्यांच्या नावे संबंधित कृषी सेवा केंद्रावर राखीव राहील. या तीन दिवसांच्या कालावधीत शेतकरी आपल्या सवडीने संबंधित केंद्रावर जाऊन क्यूआर संकेत स्कॅन करून खताची उचल करू शकतो. शेतकऱ्याने खरेदी केलेल्या प्रत्येक अनुदानित खताच्या गोणीची नोंद या प्रणालीमध्ये राहणार आहे. त्यामुळे अनुदानित खतांचे समन्यायी वाटप होण्यास मदत होईल तसेच खताच्या गैरवापरास प्रतिबंध घालता येणार आहे.

**खत खरेदीसाठी ॲपची कार्यपद्धती**

**१. प्रवेश करा :** मोबाईलमध्ये ॲप उघडावे. राज्याची निवड करून ॲग्री स्टॅकचा शेतकरी ओळख क्रमांक किंवा आधार क्रमांक प्रविष्ट करावा. त्यानंतर भ्रमणध्वनीवर प्राप्त झालेला एकवेळचा संकेतांक टाकून पडताळणी पूर्ण करावी.

**२. जमिनीची नोंदणी करा :** जमीन स्वतःची, भाडेकरू अथवा संयुक्त मालकीची असल्यास त्यानुसार योग्य पर्याय निवडावा. जिल्हा, तालुका, गाव व गट क्रमांक भरून 'जमिनीची माहिती मिळवा' या पर्यायावर क्लिक करावे. त्यानंतर जमिनीची माहिती प्राप्त होईल.

**३. पीक निवडा :** हंगाम निवडून लागवड केलेले पीक निवडावे. निवडलेल्या पिकानुसार खताची शिफारस उपलब्ध होईल.

**४. खतासाठी अर्ज करा :** शासनाच्या सामान्य खत शिफारस (जीएफआर) नुसार शिफारस केलेली खतांची यादी व प्रमाण दिसेल. त्यातून आवश्यकतेनुसार खत निवडावे.

**५. खताचे प्रमाण निश्चित करा :** आवश्यक गोण्यांची संख्या निवडावी. एका अर्जामध्ये एकापेक्षा अधिक प्रकारची खते निवडता येतील.

**६. विक्रेता निवडा :** जवळील उपलब्ध खत विक्रेत्यांची यादी दिसेल.

'शेतकऱ्यांना खतासाठी रांगेत उभे राहण्याची गरज भासू नये, उपलब्ध खतसाठ्याची माहिती घरबसल्या मिळावी आणि गरजेपुरते अनुदानित खत पारदर्शकपणे उपलब्ध व्हावे, हा या पथदर्शी प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यंत्रणेने शेतकऱ्यांना ॲपच्या वापराबाबत योग्य मार्गदर्शन करून या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ मिळवून द्यावा.

**योगेश कुंभेजकर,**
जिल्हाधिकारी, वाशिम.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २६८ ■ मंगळवार २५ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# एकाच दिवशी ठाणेदारांसह पीएसआयची तडकाफडकी बदली

**देवळी पोलिस ठाण्यात खळबळ**

### कापडे सायबर क्राईममध्ये, गजभिये मुख्यालयात; लाचखोर कर्मचारी प्रकरणानंतर चर्चांना उधाण

**देवळी जनमाध्यम**

देवळी पोलिस ठाण्यात एकाच दिवशी ठाणेदार आणि पोलिस उपनिरीक्षकांची तडकाफडकी बदली झाल्याने पोलिस विभागात मोठी खळबळ उडाली आहे. ठाणेदार संदीप कापडे यांची वर्धा येथील सायबर क्राईम शाखेत, तर पोलिस उपनिरीक्षक अश्विन गजभिये यांची वर्धा पोलिस मुख्यालयात बदली करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, कापडे यांनी अवघ्या चार महिन्यांपूर्वीच देवळी पोलिस ठाण्याची सूत्रे स्वीकारली होती.

इतक्या कमी कालावधीत ठाणेदारांची अचानक बदली झाल्याने देवळी शहरात चर्चांना उधाण आले आहे. त्यांच्या जागी पुलगावचे ठाणेदार मदनकर यांच्याकडे देवळी पोलिस ठाण्याचा तात्पुरता कार्यभार सोपविण्यात आल्याची माहिती आहे.

दरम्यान, पीएसआय अश्विन गजभिये यांचीही ठाणेदारांसोबतच बदली करण्यात आली आहे. त्यामुळे या दोन्ही बदल्यांकडे पोलिस विभागात विशेष गांभीर्याने पाहिले जात आहे.



विशेष म्हणजे, २० ऑगस्ट रोजी लाच स्वीकारताना पकडण्यात आलेला पोलिस कर्मचारी विकास देवतळे हा पीएसआय अश्विन गजभिये यांच्याकडे रायटर म्हणून कार्यरत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही अधिकाऱ्यांच्या अचानक बदल्यांमुळे चर्चांना आणखी जोर आला आहे. मात्र, लाचखोरीच्या प्रकरणाचा आणि या बदल्यांचा परस्पर संबंध आहे, असे अधिकृतपणे स्पष्ट झालेले नाही.

ठाणेदार कापडे आणि पीएसआय गजभिये यांच्या बदलीमागील नेमके कारण काय, याबाबत पोलिस प्रशासनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे अचानक झालेल्या या प्रशासकीय फेरबदलामागे नेमके काय कारण आहे, याकडे देवळीकरांसह पोलिस विभागाचे लक्ष लागले आहे.

एकाच दिवशी पोलिस ठाण्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांसह पीएसआयची बदली झाल्याने देवळी पोलिस ठाण्यातील या घडामोडीची जोरदार चर्चा सुरू झाली असून, आगामी काळात प्रशासनाकडून याबाबत अधिकृत स्पष्टीकरण मिळते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

क्षणभराचा खेळ अन् आयुष्यभराचे दुःख

# कावड अंगावर पडून चिमुकल्या अधिराजचा मृत्यू

### श्रावणातील भक्तीला काळीज पिळवटून टाकणारे गालबोट



**पुलगाव जनमाध्यम** : श्रावण महिना सुरू झाला की सर्वत्र धार्मिक उत्सवांना उधाण येते. शिवभक्तांच्या कावड यात्रा, भजन, अभिषेक आणि विविध धार्मिक कार्यक्रमांनी वातावरण भक्तिमय होते. मात्र, याच भक्तिमय वातावरणाला पुलगावात सोमवारी काळीज पिळवटून टाकणाऱ्या दुर्घटनेने गालबोट लागले. नदीफैल परिसरात आयोजित शिवशंकर कावड यात्रेपूर्वी वजनदार कावड अचानक कोसळल्याने तिच्या खाली दबून अवघ्या सहा वर्षीय अधिराज रवी पाटील या चिमुकल्याचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण पुलगाव शहरासह नदीफैल परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

शिवशंकर कावड यात्रा समितीच्या वतीने सोमवारी कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यात्रेसाठी भाविकांची लगबग सुरू होती. कावड सजवून ती स्टॅण्डवर ठेवण्यात आली होती. दरम्यान, अधिराज कावडीजवळ खेळत होता. याचवेळी कावडीला लागलेल्या पाईपला त्याचा अचानक धक्का लागला. वजनदार कावडचा तोल गेल्याने ती क्षणार्धात खाली कोसळली आणि थेट अधिराजच्या अंगावर पडली.

कावडीचा वजनदार भाग त्याच्या डोक्यावर आदळल्याने अधिराज गंभीर जखमी झाला. उपस्थितांनी प्रसंगावधान राखत त्याला तातडीने बाहेर काढले आणि उपचारासाठी पुलगाव ग्रामीण रुग्णालयात नेले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर अधिराजला मृत घोषित केले. चिमुकल्याच्या मृत्यूची बातमी समजताच कुटुंबीयांनी एकच आक्रोश केला. परिसरातील नागरिकांनाही या घटनेने मोठा धक्का बसला.

**उत्सवाच्या गोंगाटात सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर-** कावड यात्रा उत्सवी स्वरूपात आयोजित करण्यात आली होती. डीजेच्या गोंगाटात भक्तीचा जल्लोष सुरू असताना ही दुर्घटना घडली. त्यामुळे दुर्घटना घडल्यानंतर ती बाब तातडीने लक्षात आली का, सुरक्षिततेच्या दृष्टीने पुरेशा उपाययोजना करण्यात आल्या होत्या का, कावड ठेवण्यासाठी स्टॅण्ड सुरक्षित होता का, याबाबत आता प्रश्न उपस्थित होत आहेत. पोलिसांकडून या सर्व बाबींची चौकशी होणे अपेक्षित आहे.

**एकुलता एक मुलगा हिरावला -** अधिराज हा पाटील कुटुंबातील एकुलता एक मुलगा असल्याची माहिती समोर आली आहे. अनेक वर्षांपासून कुटुंबीय या धार्मिक उत्सवात सहभागी होत असल्याचे सांगितले जाते. उत्सवाच्या आनंदासाठी घराबाहेर पडलेल्या कुटुंबावर काही क्षणांतच दुःखाचा डोंगर कोसळला. चिमुकल्याच्या मृत्यूने आई-वडिलांसह नातेवाईकांवर दुःखाचा आघात झाला आहे.

**पोलिसांकडून चौकशी सुरू**

घटनेची नोंद पुलगाव पोलिसांनी घेतली आहे. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी या प्रकरणी अद्याप तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे सांगितले. मृत बालकाच्या कुटुंबीय आणि नातेवाईकांशी पुलगाव पोलीस संपर्कात असून, घटनेचा अधिक तपास करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

भाजप जिल्हाध्यक्ष संजय गाते यांनीही घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. हा अत्यंत दुर्दैवी प्रकार असून, सामान्य कुटुंबातील एकुलता एक मुलगा गमावल्याने कुटुंबीयांच्या दुःखाला सीमा नसल्याचे त्यांनी सांगितले.

**भक्तीच्या उत्सवात सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची**

कावड यात्रा ही श्रद्धेची परंपरा आहे. मात्र, अशा धार्मिक कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे गरजेचे आहे. विशेषतः वजनदार कावड, सजावट, विद्युत साहित्य, डीजे आणि लहान मुलांची उपस्थिती लक्षात घेऊन आयोजकांनी खबरदारी घेणे आवश्यक आहे. पुलगावातील दुर्घटनेने धार्मिक उत्सवांच्या आयोजनात सुरक्षा व्यवस्थेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे.

श्रावणातील भक्तीचा जल्लोष सुरू असतानाच एका चिमुकल्याचा जीव गेला. अधिराजच्या मृत्यूने पाटील कुटुंबाचा आधार हिरावला आणि उत्सवाच्या आनंदावर कायमचे दुःखाचे सावट पसरले.

---

# महामार्गाच्या कडेला गंभीर महिलेचा मृत्यू

### जखमी अवस्थेत आढळलेल्या अनोळखी महिलेची ओळख अद्यापही गुलदस्त्यात



सेलु जनमाध्यम: नागपूर-वर्धा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील हळदगाव टोलनाक्याजवळ एका ढाब्याच्या परिसरात रस्त्याच्या कडेला जखमी अवस्थेत आढळलेल्या अनोळखी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. २३ ऑगस्टच्या मध्यरात्री ते २४ ऑगस्टच्या पहाटेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

महामार्गाच्या कडेला एक महिला गंभीर अवस्थेत पडून असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच सेलू पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाच्या महिलेला तातडीने रुग्णवाहिकेतून ग्रामीण रुग्णालय, सेलू येथे दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर तिला मृत घोषित केले. मृत महिलेने पिवळ्या व लालसर रंगाची साडी आणि फिकट गुलाबी रंगाचा ब्लाउज परिधान केला होता. तिच्या गळयात पांढऱ्या प्लास्टिकच्या मण्यांची माळ होती. तिच्याजवळ असलेल्या पिशवीची पोलिसांनी तपासणी केली. मात्र, ओळख पटविणारे कोणतेही कागदपत्र किंवा अन्य माहिती मिळाली नाही. त्यामुळे मृत महिलेची ओळख पटविणे पोलिसांसमोर मोठे आव्हान ठरले आहे. ही महिला महामार्गाच्या कडेला जखमी अवस्थेत कशी पोहोचली, तिला कोणत्या वाहनाची धडक बसली का, की या घटनेमागे अन्य काही कारण आहे, याबाबत विविध प्रश्न उपस्थित होत आहेत. पोलिसांकडून सर्व शक्यता तपासल्या जात असून परिसरातील माहिती आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे.सेलू पोलिसांनी घटनेची नोंद करून मृत महिलेची ओळखा पटविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. या महिलेबाबत कोणाला माहिती असल्यास त्यांनी सेलू पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# एटीएम कार्ड बदलून फसवणूक करणाऱ्याच्या मुसक्या आवळल्या

### ५.१७ लाखांचा मुद्देमाल जप्त; आंतरराज्यीय टोळीचा एक गजाआड, साथीदाराचा शोध सुरू

**वर्धा जनमाध्यम :** एटीएममध्ये नागरिकांना बोलण्यात गुंतवायचे, नजर चुकवत त्यांचे एटीएम कार्ड लांबवायचे आणि त्याच कार्डच्या आधारे खात्यातील रक्कम हडपायची. अशा पद्धतीने नागरिकांना गंडा घालणाऱ्या आंतरराज्यीय टोळीच्या एका आरोपीच्या सेलू पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. अजहरुद्दीन ताहिर हुसैन (३६), रा. टोंका, ता. हथीन, जि. पलवल, हरियाणा याला नागपूर येथून ताब्यात घेण्यात आले. आरोपीकडून विविध बँकांचे एटीएम कार्ड, गुन्ह्यात वापरलेली पांढऱ्या रंगाची कार, मोबाईल आणि रोख रकमेसह तब्बल ५ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. टोळीतील दुसरा साथीदार अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे. सुकळी (स्टे.) येथील लीलाधर वसंत नागपुरकर (४३) हे सेलूतील मेडिकल चौकातील एसबीआयच्या एटीएममधून पैसे काढत असताना दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना बोलण्यात गुंतविले. याच संधीचा फायदा घेत एका आरोपीने नजर चुकवून नागपुरकर यांचे एटीएम कार्ड बदलले आणि दोघेही कारमधून पसार झाले.



घरी गेल्यानंतर नागपुरकर यांनी फोन-पेवरून खात्यातील शिल्लक तपासली असता खात्यातून रक्कम कमी झाल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तातडीने सेलू पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी बँकेचे स्टेटमेंट तपासले असता बदललेल्या कार्डचा वापर करून घोराड येथील एटीएममधून पिनच्या साहाय्याने १६ हजार रुपये काढल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवित एटीएममधील सीसीटीव्ही फुटेज तपासले. संशयितांचे चेहरे आणि हालचाली टिपल्यानंतर माहितीदारांचे जाळे सक्रिय करण्यात आले. दरम्यान, २३ ऑगस्ट रोजी सीसीटीव्ही फुटेजमधील संशयिताशी साधर्म्य असलेली व्यक्ती नागपूरच्या हुडकेश्वर नाका परिसरात पांढऱ्या कारमधून फिरत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच सेलू पोलिसांचे पथक नागपूरकडे रवाना झाले. सापळा रचून अजहरुद्दीन ताहिर हुसैन याला ताब्यात घेण्यात आले. झडतीदरम्यान त्याच्याकडून विविध बँकांचे एटीएम कार्ड, कार, मोबाईल फोन आणि फसवणुकीतील रक्कम असा ५.१७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या कारवाईमुळे एटीएम कार्ड अदलाबदल करून नागरिकांना लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला असून, फरार साथीदाराचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची दिशा अधिक तीव्र केली आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली सेलूचे ठाणेदार पंकज वाघोडे, मनोहर मुडे, अखिलेश गव्हाणे, सचिन वाटखेडे, विनायक गोडे आणि ओमप्रकाश तल्लारी यांच्या पथकाने केली.

---

# दुकाणफोड' टोळी अखेर पोलिसांच्या जाळयात ; सहा जण ताब्यात

### स्वातंत्र्यदिनी शहरात धुमाकूळ घालणाऱ्या चोरट्यांकडून १८ हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम ;** स्वातंत्र्यदिनी वर्धा शहरातील व्यावसायिक प्रतिष्ठानांना लक्ष्य करून दुकानफोडीचा सपाटा लावणाऱ्या सहा सदस्यीय चोरट्यांच्या टोळीचा रामनगर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या टोळीत दोन अल्पवयीनांचा समावेश असून, चौघा प्रौढ आरोपींनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपींकडून रामनगर पोलिसांनी १८ हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

प्रकाश किशनचंद माखिजानी, रा. पोदार बागीचा, वर्धा यांच्या तक्रारीवरून रामनगर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. चोरट्यांनी कठाणे ले-आऊट, न्यू स्टेट बँक कॉलनी आणि लहरीनगर परिसरातील व्यावसायिक प्रतिष्ठानांना लक्ष्य केले होते. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सुरक्षेचा फायदा घेत चोरट्यांनी दुकानांचे शटर फोडून चोरी केल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेनंतर शहर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवित गोपनीय माहितीच्या आधारे भूषण अशोक ठाकरे, गौरव सुरेश खडसे, अमन किसनदेव सहानी, क्रिश रामचरीत जैस्वाल आणि त्यांच्या दोन अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेतले.

अल्पवयीन आरोपींची बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली, तर उर्वरित चौघांना यापूर्वी शहर पोलिसांनी पोलिस कोठडीत घेतले होते. पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर न्यायालयाने आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानंतर रामनगर पोलिसांनी या आरोपींचा ताबा मागितला. न्यायालयाने मागणी मंजूर केल्यानंतर आरोपी रामनगर पोलिसांच्या ताब्यात आले.

तपासादरम्यान आरोपींकडून १८ हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या टोळीने आणखी कुठल्या दुकानांना लक्ष्य केले होते का, चोरीचा मुद्देमाल कुठे लपविण्यात आला होता आणि या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

ही कारवाई रामनगर पोलिस ठाण्याच्या ठाणेदार पोर्णिमा राखोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राजेश साहू, प्रशांत साहू, भूषण दांडेकर आणि सूरज राठोड यांनी केली.

---

# आकृतिबंधाच्या नावाखाली कृषी यंत्रणा कमकुवत करू नका, अधिकारी-कर्मचाऱ्यांचा एल्गार

### प्रस्तावित आकृतिबंध रद्द करण्याची मागणी; कृषी सेवा महासंघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**वर्धा जनमाध्यम :** कृषी विभागाच्या प्रस्तावित आकृतिबंधाविरोधात महाराष्ट्र राज्य कृषीसेवा महासंघाच्या नेतृत्वाखाली कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. प्रस्तावित आकृतिबंधामुळे कृषी विभागाची क्षेत्रीय यंत्रणा कमकुवत होऊन त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या सेवांवर होणार असल्याचा आरोप करीत हा आकृतिबंध तत्काळ रद्द करून शेतकरीकेंद्री, सक्षम आणि कार्यक्षम आकृतिबंध लागू करण्याची मागणी करण्यात आली.

या मागणीसाठी कृषी सेवा महासंघ वर्धाच्या पदाधिकारी व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. शासनाने प्रस्तावित आकृतिबंधाचा पुनर्विचार करून शेतकऱ्यांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवून निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

प्रस्तावित आकृतिबंधाच्या विरोधात यापूर्वी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी तसेच विविध कृषी अधिकारी-कर्मचारी संघटनांनी शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. मात्र, मागण्यांवर अद्याप ठोस निर्णय न झाल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे महासंघाने स्पष्ट केले.

शेतकऱ्यांच्या दारापर्यंत कृषी यंत्रणा पोहोचली पाहिजे, अशी भूमिका महासंघाने मांडली. नवीन आकृतिबंध तयार करताना अनुभवी अधिकारी-कर्मचारी, सेवानिवृत्त अधिकारी, संघटनांचे प्रतिनिधी आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेली तज्ज्ञ समिती गठित करण्याची मागणीही करण्यात आली.

जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी अरविंद उखळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रशेखर चवणे, रामु धनविजे, प्रशांत भोयर, राहुल देशमुख, विशाल गिरी, राम बावकर, सुनिता मुरार, मोहीन शेख, नितेश कोठेकर, आतम पोकळे यांच्यासह अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आंदोलनात सहभाग घेतला. मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा महासंघाने दिला आहे.

---

# महिला बचत गटांच्या पैशांवर डल्ला?

### ४८ लाखांच्या निधीत लाखोंची उलाढाल ; अध्यक्ष-सचिवांकडून २० ते २२ लाखांची उचल? पाच सदस्यीय चौकशी समिती गठीत

**वर्धा जनमाध्यम-** वर्धा नगरपालिकेच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या महिला बचत गटांच्या निधीमध्ये लाखो रुपयांचा कथित गैरव्यवहार झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी शासनाकडून आलेल्या निधीपैकी तब्बल २० ते २२ लाख रुपये अध्यक्ष आणि सचिवांनी उचलल्याचा आरोप असून, उचललेली रक्कम अद्याप जमा करण्यात आलेली नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणाने नगरपालिकेच्या वर्तुळात खळबळ उडाली असून, संघाची कार्यकारिणीच बरखास्त करून नव्याने कार्यकारिणी गठीत करण्याची मागणी करण्यात आली आहे.



नगरपालिकेच्या माध्यमातून शहरात जवळपास ५५० महिला बचत गट कार्यरत आहेत. या बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाकडून ४८ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. मात्र हा निधी संबंधित महिला बचत गटांपर्यंत पोहोचण्याऐवजी संघाच्या पातळीवरच लाखो रुपयांची उचल झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे अध्यक्ष आणि सचिवांनी चेकद्वारे २० ते २२ लाख रुपयांची रक्कम उचलल्याचा आरोप असून, संबंधित रक्कम अद्याप संघात जमा झालेली नसल्याचे सभेत निदर्शनास आणून देण्यात आले. त्यामुळे महिला बचत गटांच्या हक्काच्या पैशांचा नेमका वापर कुठे झाला, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या प्रकरणात नगरपालिकेतील काही महिला कर्मचाऱ्यांची संघाच्या पदाधिकाऱ्यांशी कथित जवळीक असल्याची चर्चाही समोर आली आहे. निधीची उचल करण्यात आली त्या वेळी संबंधित महिला कर्मचारी सुट्टीवर असल्याचे सांगण्यात आले. तसेच अध्यक्ष आणि सचिव यांनीच चेकद्वारे पैसे उचलल्याचे महिला कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आल्याची माहिती सभेत समोर आली. त्यामुळे या संपूर्ण व्यवहारात नेमकी कोणाची भूमिका होती, याचीही चौकशी होण्याची मागणी जोर धरत आहे.

**सभापतींनी उघडला मुद्दा**

हा गंभीर प्रकार समोर येताच नगरपालिकेच्या मासिक सभेत सभापती स्नेहा आकरे यांनी आक्रमकपणे प्रश्न उपस्थित केला. महिला बचत गटांच्या निधीचा हिशेब पारदर्शकपणे समोर आणण्याची मागणी करत त्यांनी प्रकरणाच्या चौकशीसाठी पाच सदस्यीय समिती गठीत करण्याचा मुद्दा मांडला.

यानुसार आता पाच जणांची चौकशी समिती गठीत करण्यात आली असून, समिती संपूर्ण आर्थिक व्यवहार, चेक, बँक खाते, निधीची उचल आणि संबंधित कागदपत्रांची तपासणी करणार आहे. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कारवाईची दिशा निश्चित होण्याची शक्यता आहे.

कार्यकारिणी बरखास्त करा

महिला बचत गटांच्या निधीबाबतच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याने विद्यमान संघाची कार्यकारिणी बरखास्त करून नवीन कार्यकारिणी गठीत करावी, अशी मागणी सभापती स्नेहा आकरे यांनी केली आहे. महिलांच्या नावावर आलेला निधी काही पदाधिकाऱ्यांच्या ताब्यात राहणार असेल तर बचत गटांचा उद्देशच काय, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

---


## जाहीर नोटीस

माझे पक्षकार सौ. सुषमा विशाल नगराळे, मु. नेरी पुनर्वसन हे मौजा-सालोड (हिरापूर) तर्फ जिल्हा वर्धा ग्राम पंचायत सालोड, मौजा क्रमांक १३७ प ह क्र. १७ शेत क्रमांक ३६३/१ प्लॉट क्रमांक १७, ज्याचे क्षेत्रफळ १५०.०० चौ. मीटर त्याचे चतुःसीमा येणे प्रमाणे पूर्वेस-प्लॉट क्रमांक १८, पश्चिमेस प्लॉट क्रमांक १६, उत्तरेस प्लॉट क्रमांक ४४ दक्षिणेस झे. ले. आऊट रोड चे मालक आहेत.

माझ्या पक्षकाराने दिनांक ११/१२/२०२६ दस्त क्रमांक ७०२२/२००६ श्री. सुनील महादेव आकुलकर अन्वये दिनांक २१-०६-२०१३ रोजी दस्त क्रमांक ५३६५/२०१३ अन्वये सौ. रंजना सतीशकुमार गांधी व सुनील महादेव आकुलकर दिनांक २०/०३/२०१३ दस्त क्रमांक २६३४/२०१३ रोजी झालेली असून विक्रीच्या वेळेस श्री. श्रीराम महादेव पेटकर यांनी प्लॉटचे सर्व मूळ कागदपत्रे व मूळ लिंक स्वतः घेतले असून श्री. श्रीराम महादेव पेटकर यांनी प्रीती विलास भगत सौ. प्रीती आशुतोष बागडे यांच्या कडे दिले असता त्यानंतर प्रीती विलास भगत /सौ. प्रीती आशुतोष बागडे यांच्या हातून हरविलेले आहे.

माझ्या पक्षकाराने सदर प्लॉट घेण्याचा सौदा सौ. प्रीती आशुतोष बागडे यांच्यासोबत केलेला आहे व त्यांनी कर्जाकरितां ळ्ँ ्ख ला केस केलेली आहे. व बांधकाम परवानगी करिता या नोटीसा द्वारे आपण सर्व जनतेस सूचित करण्यात येते की कोणालाही वरील हरवलेली मूळ विक्री पत्र मिळाल्यास ते त्यांनी नोटीस प्रकाशित झाल्यापासून सात दिवसात खालील पत्यावर संपर्क साधावा. त्यानंतर कोणताही आक्षेप व उजर गृहीत धरण्यात येणार नाही.

दिनांक :- २४/०८/२०२६

ठिकाण :- वर्धा,

**ॲड. संजय दिनकर बोरकर**
**जुना बार रूम जिल्हा सत्र न्यायालय वर्धा,**
**मो. क्र. ८२०८८५१७१३**

e paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## आमचे बाळ आम्हाला परत द्या

# जिल्हा स्त्री रुग्णालयात पालकांचा आक्रोश





**अमरावती:** जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवीन इमारतीतील नवजात शिशू अतिदक्षता विभागात (एसएनसीयू) सोमवारी पहाटे साडेतीन वाजता व्हेंटिलेटर स्पोट होउन लागलेल्या भीषण आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात मृत बालकांच्या नातेवाईकांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता. आमचे बाळ आम्हाला परत द्या असा हंबरडा फोडत नातेवाईकांनी रुग्णालय परिसर दणाणून सोडला. एसएनसीयूमधून बाहेर काढलेल्या सात बालकांना उपचारासाठी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यापैकी तिघांचा मृत्यू झाला. दोन गंभीर बालकांना पुढील उपचारासाठी पीडीएमसी रुग्णालयात रेफर करण्यात आले असून, मिसबा तबस्सुम यांच्या भाजलेल्या बाळावर विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, मृत बालकांना शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्याची प्रक्रिया सुरू होताच नातेवाईकांनी त्याला तीव्र विरोध केला. आमचे बाळ आम्हाला परत द्या, बाळाला पोस्टमार्टमसाठी घेउन जाउ नका, अशी आर्त विनवणी करीत त्यांनी हंबरडा फोडला. परिस्थिती तणावपूर्ण झाल्याने विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. अखेर पोलिसांच्या बंदोबस्तात मृत बालकांना जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. या दुर्घटनेने रुग्णालयातील नवजात बालकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आणला आहे. कमी वजनाच्या आणि गंभीर अवस्थेतील बालकांवर उपचार सुरू असलेल्या एसएनसीयूमध्ये आग लागल्यानंतर तीन बालकांचा मृत्यू झाल्याने रुग्णालयाच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आगीचे नेमके कारण आणि सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी तपासणीनंतर स्पष्ट होणार आहेत. आग लागली तेव्हा फायर अलार्म वाजले नसल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

## ‘हे 56 टक्के कमिशनचे सरकार’ यशोमती ठाकूर यांचा आरोप

**अमरावती:** येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात बालक अतिदक्षता विभागात आग लागून तीन बालकांचा मृत्यू



झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी पहाटे घडली. या प्रकरणी विविध स्तरातून प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. माजी मंत्री आणि काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांनी सोमवारी सकाळी रुग्णालयाला भेट देउन प्रत्यक्ष रुग्णालयाची पाहणी केली. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी बोलताना सरकारवर जोरदार टीका केली.

**घटनेचे कारण आणि निष्काळजीपणा-** यशोमती ठाकूर म्हणाल्या, या दुर्घटनेला सरकारच जबाबदार आहे. हे सरकार म्हणजे ५६ टक्के कमिशनचे सरकार आहे. जिल्हा स्त्री रुग्णालयात सामान्य आणि गरीब कुटुंबातील महिला, मुले उपचारासाठी येतात. या ठिकाणी व्हेंटिलेटरमध्ये स्फोट झाल्याने आग लागल्याचे सांगितले जात आहे. व्हेंटिलेटरमध्ये बिघाड होता का, इलेक्ट्रिकल कनेक्शनमध्ये समस्या होती का, याचा सखोल शोध घ्यायला हवा. सदोष व्हेंटिलेटर पुरवले गेले का, त्याचा पुरवठादार कोण आहे, हे सर्व बाहेर आले पाहिजे. दोषींवर कडक कारवाई व्हायला हवी.

**पुर्वेतिहास आणि इमारतीचे काम**

यशोमती ठाकूर म्हणाल्या, अशा प्रकारची घटना पहिल्यांदाच घडलेली नाही. महाविकास आघाडीचे सरकार असताना आणि मी स्वत: पालकमंत्री असताना या नवीन इमारतीला मंजुरी मिळाली होती. मात्र, सध्याचे लोक फक्त उद्घाटनासाठीच घाईगडबड करतात, असा टोला त्यांनी लगावला.

## काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांची घटनास्थळी भेट; व्हेंटिलेटर स्फोटाची सखोल चौकशी करण्याची मागणी

### खा.बळवंत वानखडेंची टीका

**अमरावती:** काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे म्हणाले,



ही घटना अत्यंत दु:खद आहे. सरकार आणि प्रशासनासाठी ही शरमेची बाब आहे. यापुर्वीही जिल्हा स्त्री रुग्णालयात आगीची घटना घडली आहे. पण, त्यातून धडा घेण्याची गरज असताना उपाययोजना केल्या जात नाही, हा बेजबाबदारपणा आहे. रुग्णालयाचे फायर ऑडिट झाले होते का, ही दुर्घटना कशामुळे घडली, याची सखोल चौकशी झाली पाहिजे असे ते म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांना टोला

इन्फ्रा मॅन म्हणवून घेणा-यांनी रुग्णालयातील पायाभूत सुविधांकडे आणि गरिबांच्या समस्यांकडे लक्ष दिले पाहिजे, असा टोला यशोमती ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव न घेता लगावला. रुग्णालयांमध्ये डॉक्टर पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसणे, जेवणाची योग्य सोय नसणे असे अनेक प्रश्न आहेत. राज्यात आदिवासी आश्रमशाळांची दूरवस्था आहे. विद्यार्थ्यांचे मृत्यू होत आहेत. त्याकडे सरकारचे लक्ष नाही, हे सरकार केवळ कमिशन घेण्यात व्यस्त आहे, असा आरोप यशोमती ठाकूर यांनी केला.

## आगीत तीन बालकांच्या मृत्यूची घटना वेदनादायी,

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले दुःख

**अमरावती:** येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात बालक अतिदक्षता विभागात सोमवारी पहाटे लागेल्या आगीत तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. इतर दोन बालकांवर डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेबद्दल उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दु:ख व्यक्त केले आहे.



**कुटुंबीयांना दुःख सहन करण्याचे बळ मिळो-** अमरावतीतील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवजात शिशू अतिदक्षता विभागात (एसएनसीयू) पहाटेच्या सुमारास लागलेल्या आगीत नवजात बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना अत्यंत वेदनादायी आहे. या दुर्घटनेत आपल्या निष्पाप बालकांना गमावलेल्या कुटुंबीयांच्या दुःखात मी सहभागी आहे. या दुःखद प्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे बळ मिळो. जखमी बालकांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, हीच प्रार्थना, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केली आहे.



**माझे मन हेलावून गेले आहे-** दगावलेल्या नवजात बालकांना अतिशय व्यथित अंत:करणाने श्रद्धांजली व्यक्त करतो. त्यांच्या पालकांना हे दुःख सहन करण्याची ताकद ईश्वर देवो, असे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. या घटनेच्या संपूर्ण चौकशीचे आदेश मी दिले आहेत. जे जखमी झाले त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांना सर्व प्रकारची वैद्यकीय सहायता दिली जात आहे. मृत बालकांच्या नातेवाईकांच्या पाठीशी सरकार उभे असून, सरकार व प्रशासन संपूर्ण मदत करत असल्याचे बावनकुळे म्हणाले.मी जिल्हा प्रशासनाच्या सतत संपर्कात असून, आवश्यक त्या सर्व सूचना दिल्या आहेत. प्रशासन पूर्णपणे लक्ष ठेवून आहे. अधिका-यांशी याबाबत चर्चा केली. जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवीन इमारतीतील नवजात शिशू अतिदक्षता विभागात (एसएनसीयू) सोमवारी पहाटे चार वाजता लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. काही बालकांना पुढील उपचारांसाठी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. त्यांपैकी चार बालकांवर उपचार सुरू असून, एक गंभीर आहे, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

**आगीचे नेमके कारण स्पष्ट नाही-** आग लागताच रुग्णालयातील कर्मचा-यांनी धावपळ करीत इतर बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. आगीचे नेमके कारण अजून समजू शकलेले नाही. एसएनसीयूमध्ये कमी दिवसांचे, कमी वजनाचे आणि गंभीर अवस्थेतील नवजात बालकांवर उपचार सुरू असतात. मी जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून या घटनेचे तीव्र दुःख व्यक्तकरतो, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

## आ.रवी राणांचा डॉक्टर-कर्मचा-यांवर गंभीर आरोप

**अमरावती /प्रतिनिधी :** अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात नवजात शिशु कक्षाला लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सोमवारी पहाटे साडेतीन वाजता नवजात शिशू कक्षात (SNCU) व्हेंटिलेटरचा स्फोट होउन ही आग लागली. ही आग वेगाने पसरली. यानंतर रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचा-यांनी शिशू कक्षात असलेल्या बालकांना बाहेर काढले. ही घटना घडली तेव्हा या कक्षात ९ बालके होती. मात्र, तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. उर्वरित बालकांसह संपूर्ण नवजात शिशू कक्षातील इतर बालकांना जवळच असलेल्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या घटनेनंतर बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष



आमदार रवी राणा यांनी रुग्णालय प्रशासनावर सडकून टीका केली.

मी सकाळी साडेतीन वाजल्यापासून डाक्टर आणि इतर लोकांच्या संपर्कात आहे. या आधी तीन वर्षांपूर्वी अशीच आग लागली होती. तेव्हा जुन्या बिल्डिंगमधून नव्या इमारतीत शिफट केलं, तिथे व्यवस्था करुन दिल्या. आज पुन्हा तशीच दुर्घटना झाली. हा रुग्णालयातील कर्मचारी, डाक्टर आणि व्यवस्थेचा बेफिकीरपणा असल्याचा गंभीर आरोप आमदार रवी राणा यांनी केला. नवजात बालकांचा अशाप्रकारे मृत्यू होणे दुर्दैवी घटना, याची चौकशी होईल, ज्या ज्या लोकांना जबाबदारीने दिली होती, त्यांनी ती सांभाळायला पाहिजे होती. जेव्हा आग लागली होती पूर्वी तेव्हा मी आणि मुख्यमंत्र्यांनी नवीन इमारतीत सगळ्या व्यवस्था दिल्या, त्रुटी दूर केल्या. जे जे डाक्टर, नर्स यासाठी जबाबदार आहेत, यांच्यावर कारवाई केली जाईल. आरोग्यमंत्र्यांनी याकडे लक्ष दिलं पाहिजे. फायर ऑडिट झालं नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. फायरब्रिगेडची गाडीही लेट पोहोचली, त्यावरही मी स्वतः कारवाई करणार असल्याचे रवी राणा यांनी सांगितले.

## २८ ऑगस्टच्या आत निर्णय घ्या, आता सुटी नाही

**बीड /प्रतिनिधी-** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी येत्या २९ ऑगस्टपासून सुरू होणा-या निर्णायक आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला थेट आणि निर्वाणीचा इशारा दिला आहे. आता मराठा समाजाला गोड बोलून फसवण्याचे दिवस संपले आहेत.



मनोज जरांगे पाटील यांनी सरकारच्या वारंवार शिष्टमंडळे पाठवण्याच्या धोरणावर तीव्र नाराजी व्यक्तकेली: सरकारचे शिष्टमंडळ आल्यावर काय बोलते ते पाहू. मात्र, मराठा समाजाला आणखी किती दिवस वेड्यात काढणार आहात, याची सरकारला लाज वाटली पाहिजे. प्रत्येक वेळी फक्त चर्चेला यायचे आणि वेळ मागायचा, हे आता चालणार नाही. गेल्या ३ वर्षांत जी जी सरकारे आली, त्यांच्या प्रत्येक शब्दाचा आम्ही सन्मान ठेवला. मात्र, आता हा अन्याय सहन केला जाणार नाही. सरकारचे शिष्टमंडळ केवळ वेळकाढूपणा करण्यासाठी चर्चा करत आहे.

**नोंदी आणि गॅझेटची अंमलबजावणी करावीच लागेल**

ज्या मराठ्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्यांचे दाखले आणि हक्क सरकारला द्यावेच लागतील. हे सरकार आता अडवू शकत नाही. तसेच यासंदर्भातील गॅझेट लागू करावेच लागेल, हे आता सरकारच्याही लक्षात आले आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सरकारने २८ऑगस्टपर्यंत निर्णय घेतला नाही, तर २९ ऑगस्टपासून नियोजित आंदोलन कोणत्याही परिस्थितीत मागे घेतले जाणार नाही, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

**छगन भुजबळांवरही जरांगेंचा निशाणा**

दरम्यान, जरांगे यांनी राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्यावरही जोरदार टीका केली. मराठा समाजाच्या सापडलेल्या नोंदींचा आधार आणि त्यामागील घटनात्मक तरतुदी भुजबळ यांच्या लक्षात आल्याचा दावा त्यांनी केला. मराठा समाजाला विरोध करत राहिल्यास त्याचे राजकीय नुकसान होउ शकते, अशी जाणीव भुजबळांना झाल्याचेही जरांगे म्हणाले. मराठ्यांना विरोध करून आपला काही फायदा नाही, अन्यथा अस्तित्व उद्ध्वस्त होईल, असा दावा त्यांनी केला.

**भुजबळ म्हणाले होते, सरकार चर्चेतून मार्ग काढेल-** मनोज जरांगे यांच्या टीकेच्या पार्श्वभूमीवर छगन भुजबळ यांनी केलेले वक्तव्यही महत्त्वाचे ठरत आहे. भुजबळ यांनी यापूर्वी मराठा आंदोलनाबाबत भूमिका स्पष्ट करताना, जरांगे यांची लढाई आपल्या विरोधात नसल्याचे म्हटले होते. सरकार या विषयावर चर्चा करून निर्णय घेईल, असे भुजबळ यांनी सांगितले होते. ओबीसी समाजातील जातींची संख्या आणि जातगणनेच्या मागणीवरही सरकार काम करत असल्याचे त्यांनी म्हटले होते.

## तमिळनाडूत वर्षाला ३ मोफत गॅस सिलिंडर

**चेन्नई :** तमिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी सोमवारी विधानसभेत राज्यातील नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजनांची घोषणा केली. यामध्ये पात्र लाभार्थ्यांना वर्षाला ३ मोफत स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरचा लाभ देण्याबरोबरच महिलांसाठी सुरू असलेल्या मोफत बस प्रवास योजनेचा विस्तार करण्याची घोषणा करण्यात आली आहे.गॅस सिलिंडर योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात वर्षाला ३ सिलिंडरची रक्कम थेट जमा केली जाणार आहे. या योजनेमुळे पात्र कुटुंबांना स्वयंपाकाच्या गॅसचा खर्च कमी करण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्री विजय यांनी वेत्री पयनम या नव्या योजनेचीही घोषणा केली. या योजनेद्वारे महिलांसाठी सध्या सुरू असलेल्या मोफत बस प्रवास योजनेचा संपूर्ण राज्यात विस्तार केला जाणार आहे. वेत्री पयनम योजनेअंतर्गत महानगर आणि शहरी भागांमध्ये धावणा-या एक्स्प्रेस, एलएसएस आणि डिलक्स सरकारी बसमधून महिलांना मोफत प्रवास करता येणार आहे. जिल्ह्यांतर्गत प्रवासासाठी ग्रामीण आणि डोंगराळ भागात धावणा-या साध्या दराच्या सरकारी बसमध्ये महिलांना मोफत प्रवासाची सुविधा मिळणार आहे.

ही योजना २ ऑक्टोबरपासून लागू होणार आहे. महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त या योजनेची सुरुवात केली जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी उत्पन्नाची कोणतीही मर्यादा असणार नाही. तसेच मोफत प्रवासासाठी प्रवासाच्या संख्येवरही कोणतेही बंधन राहणार नाही. तृतीयपंथीयांनाही या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री विजय यांनी यापूर्वी निवडणूक जाहीरनाम्यात अनेक कल्याणकारी योजनांची आश्वासने दिली होती. यामध्ये प्रत्येक कुटुंबाला वर्षाला ६ मोफत एलपीजी सिलिंडर देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. तसेच २०० युनिटपर्यंत मोफत वीज, ६० वर्षांखालील महिलांना दरमहा २,५०० रुपयांची आर्थिक मदत आणि प्रत्येक कुटुंबासाठी २५ लाख रुपयांपर्यंत आरोग्य विमा संरक्षण देण्याचाही समावेश होता.

## आता सुप्रीम कोर्टात होणार बंडखोर खासदारांचा फैसला; २० खासदारांवर अपात्रतेची टांगती तलवार

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठी घडामोड घडताना दिसत आहे. बंडखोरी करून दुस-या पक्षात विलीन होणा-या खासदारांविरुद्धात टीएमसीनं आक्रमक पवित्रा घेतलाय. टीएमसी आणि २० बंडखोर खासदार यांच्यातील वाद आता सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचलाय. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे प्रलंबित असलेल्या अपात्रतेच्या याचिकांवर त्वरित निर्णय घेण्याची मागणी करत पक्षाचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतलीय. न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ आज मंगळवारी टीएमसीच्या याचिकेवर सुनावणी केली जाणार आहे.पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील टीएमसीच्या (TMC) पराभवानंतर पक्षाच्या संसदीय गटामध्ये बंडखोरी झाली. २० खासदारांनी पक्ष सोडून 'नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया' (ग़क्ष्क्ष्) मध्ये विलीन होण्याचा निर्णय जाहीर केला होता. दरम्यान बंडखोर गटाने लोकसभेत स्वतंत्र गट म्हणून मान्यता मिळवण्याची मागणी केलीय. दुसरीकडे हे खासदार पक्षाच्या चिन्हावर निवडून आले होते. त्यानंतर दुस-या राजकीय पक्षात सामील होण्याचा त्यांचा निर्णय 'पक्ष-बदल विरोधी कायद्या'च्या (अँटी-डिफेक्शन ल?) तरतुदींच्या कक्षेत येतो, असा दावा करत टीएमसीनं त्यांच्यावर अपात्रेची कारवाई करण्यात यावी अशी मागणी केलीय.यापूर्वी अभिषेक बॅनर्जी यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे सदस्यत्व रद्द करण्याबाबतच्या स्वतंत्र याचिका सादर करून त्यांवर त्वरित निर्णय घेण्याची मागणी केली होती. पावसाळी अधिवेशनादरम्यान, लोकसभा अध्यक्षांनी बंडखोर टीएमसी खासदारांसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था केली होती. त्यानंतर, या बंडखोर टीएमसी खासदारांनी एनडीएला (NDA) पाठिंबा जाहीर केला आणि त्यांना एनडीएच्या बैठकीसाठी निमंत्रितही करण्यात आले होते.

## व्याकरणतज्ज्ञ प्राध्यापिका यास्मिन शेख यांचे निधन

**पुणे :** व्याकरणतज्ज्ञ प्राध्यापिका यास्मिन शेख यांचं २४ ऑगस्ट रोजी निधन झाले. वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पुण्यातील वृद्धाश्रमात यास्मिन शेख यांचं निधन झालं. यास्मिन शेख यांच्या पश्चात डॉ. शमा आणि प्रा.रुकसाना अशा दोन मुली आहेत. जेरुषा रुबेन असं यास्मिन शेख यांचं मूळ नाव, जन्माने ज्यू होत्या. अझीझ अहमद इब्राहिम शेख यांच्याशी विवाह झाला होता.



अझीझ अहमद इब्राहिम शेख यांच्याशी विवाह केल्यानंतरही यास्मिन यांनी धर्म बदलला नाही. प्रा. यास्मिन शेख या मराठी भाषा, व्याकरण आणि भाषाशास्त्राच्या ज्येष्ठ अभ्यासक, लेखिका आणि शिक्षिका होत्या. त्यांचा जन्म २१ जून १९२५ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव जेरुशा रुबेन होते. त्यांच्या वडिलांच्या सरकारी नोकरीमुळे बालपणापासूनच त्यांना विविध ठिकाणी राहण्याची संधी मिळाली आणि शिक्षणाची गोडी निर्माण झाली. त्यांनी पुण्यातील एस.पी. कालेजमधून बी.ए. केले. मराठी विषयात त्यांची विशेष गुणवत्ता होती. प्रा. एस. एम. माटे आणि प्रा. के. एन. वातवे यांसारख्या शिक्षकांचा त्यांच्या भाषाविषयक जडणघडणीवर प्रभाव पडला. पुढे त्यांनी एम.ए.चे शिक्षण पूर्ण केले.

## सर्वच रुग्णालयांचे ऑडिट करा-पवार

**मुंबई :** अमरावती येथील रुग्णालयातील आग आणि बालकांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारवर तीव्र शब्दांत निशाणा साधला आहे. रुग्णालयांमध्ये आग लागून निष्पाप बालकांचे बळी जाणे ही अत्यंत दुर्दैवी आहे. गेल्या ३ वर्षांत महाराष्ट्रात ५ वर्षांखालील तब्बल ४० ते ४४ हजार बालकांचा कुपोषण, विषबाधा, सर्पदंश आणि उपचारांअभावी मृत्यू झाला आहे. हे सर्व मृत्यू गरीब कुटुंबांतील मुलांचे असून अंगणवाड्यांमध्ये जनावरांनाही न शोभेल असे निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते, असा गंभीर आरोप त्यांनी केला.आधी भंडारा आणि आता अमरावतीत घडलेल्या घटनांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी सरकारने पुढच्या ६ महिन्यांत सर्व रुग्णालयांचे ऑडिट पूर्ण करून त्रुटी दूर कराव्यात. एखाद्या कर्मचा-याला निलंबित करून प्रकरण दाबण्यापेक्षा निष्काळजीपणा करणा-या कंत्राटदारांवर थेट गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी लावून धरली. महाराष्ट्रात सुमारे २ कोटी ६ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली असल्याचा दावा करत पवार म्हणाले की, विशिष्ट साफ्टवेअरच्या माध्यमातून बीएलओ वर दबाव आणून हा टेबल सर्व्हे करण्यात आला आहे. ३० तारखेला अंतिम यादी आल्यावर यातील त्रुटी उघड केल्या जातील.

## राहुल गांधी यांचे CM देवेंद्र फडणवीसांना पत्र

### आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे वेधले लक्ष

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. पुण्यातील शासकीय आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहांमध्ये राहणारे विद्यार्थी गेल्या दहा दिवसांपासून आपल्या मागण्यांसाठी उपोषण करत असल्याचे राहुल गांधी यांनी पत्रात नमूद केले आहे. विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींशी प्रत्यक्ष भेट घेउन त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि त्यावर तातडीने तोडगा काढण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.



राहुल गांधी यांनी २४ ऑगस्ट रोजी लिहिलेल्या पत्रात म्हटलंय की, आदिवासी विद्यार्थी ग्रामीण आणि दुर्गम भागातून शहरांमध्ये शिक्षणासाठी येतात आणि शासकीय वसतिगृहांवर अवलंबून असतात. वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी ३० वर्षांची वयोमर्यादा लागू करण्यात आल्याने शिक्षण पूर्ण करणा-या किंवा विविध परीक्षांची तयारी करणा-या अनेक विद्यार्थ्यांना अडचणी येत आहेत. वसतिगृहांमधील अन्न, स्वच्छता आणि वैद्यकीय सुविधांबाबतही विद्यार्थ्यांनी प्रश्न उपस्थित केल्याचे राहुल गांधी यांनी पत्रात म्हटले आहे. काही ठिकाणी सर्पदंशासह अन्य घटनांमध्ये विद्यार्थ्यांना दुखापत झाल्याचे तसेच मृत्यू झाल्याचेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

तसेच दीर्घकाळ गैरहजेरीनंतर वसतिगृहात परतणा-या विद्यार्थिनींची गर्भधारणा तपासणी तसेच अन्य वैद्यकीय तपासण्या केल्या जात असल्याची माहिती विद्यार्थिनींनी दिली. या प्रकारामुळे विद्यार्थिनींच्या सन्मानाचा प्रश्न निर्माण होत आहे. मुलींच्या वसतिगृहांशी संबंधित नियमांबाबतही त्यांनी पत्रातून चिंता व्यक्त केली आहे. विद्यार्थ्यांनी राहुल गांधी यांच्याकडे दिलेल्या निवेदनात विविध शासकीय निर्णय रद्द किंवा सुधारणा करण्याची मागणी केली आहे. ५ ऑगस्ट आणि १४ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आलेले शासन निर्णय रद्द करावेत तसेच ११ नोव्हेंबर २०११ रोजीच्या शासन निर्णयातील आर्थिक तरतुदी सध्याच्या महागाईनुसार वाढवाव्यात अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

दरम्यान, शासकीय आदिवासी वसतिगृहातील प्रवेशासाठी असलेली ३० वर्षांची वयोमर्यादा पूर्णपणे हटवावी किंवा ती ३६ वर्षांपर्यंत वाढवावी अशीही विद्यार्थ्यांची प्रमुख मागणी आहे. विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून धोरणात्मक निर्णय घेताना त्यांच्या सूचना विचारात घ्याव्यात अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. या सर्व मागण्यांच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलक विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींशी प्रत्यक्ष भेट घ्यावी. त्यांच्या समस्या ऐकून घ्याव्यात आणि संबंधित प्रश्नांवर लवकरात लवकर तोडगा काढावा अशी विनंती केली आहे.

## रुपाली चाकणकर बदनामी प्रकरणी गुन्हा

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातून मोठी बातमी समोर आली आहे. राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष आणि राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली चाकणकर यांची बदनामी केल्याप्रकरणी १९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली ठोंबरे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे, अभिनेत्री दिपाली सय्यद, संगीता तिवारी, आशा मिरगे, हनुमंत गलगटे यांच्यासह इतरांचा समावेश आहे.भोंदू अशोक खरातच्या संपर्कात असलेल्या राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची बदनामी केल्याप्रकरणी १९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रुपाली चाकणकर यांच्याकडून काही दिवसांपूर्वी पुण्यातील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांकडून आज गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांमधे रुपाली ठोंबरे, सुषमा अंधारे, दिपाली सय्यद, संगीता तिवारी, आशा मिरगे, हनुमंत गलगटे, वर्षा कांबळे यांच्यासह राष्ट्रवादी क?ंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सोशल मीडियाचे पदाधिकारी योगेश सावंत, मोहसीन शेख आणि महादेव बालगुडे यांचा समावेश आहे. आता या सर्वांवर काय कारवाई होते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

**चाकणकर यांनी तक्रारीत काय म्हटले ?-** राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी आपल्या फिर्यादीत म्हटले होते की, अशोक एकनाथ खरात यांच्याशी त्यांची ९ वर्षांपूर्वी एका सामाजिक कार्यक्रमात ओळख झाली होती. मंदिराच्या धार्मिक कार्यक्रमानिमित्त मी तिथे जात होती. १८ मार्च २०२६ रोजी खरात यांना बलात्काराच्या गुन्ह्यात अटक झाल्याचे प्रसार माध्यमांमधून समजले. त्यानंतर खरात यांच्यासोबत सामाजिक कार्यक्रमातील फोटो वापरून माझ्यावर आरोप करण्यात आले. २० मार्च २०२६ रोजी सोशल मीडिया तपासताना १९ फेसबुक/इंस्टा/युट्यूब अकाउंटवरून बदनामीकारक, अश्लील आणि धमकीवजा पोस्ट टाकल्याचे आढळले. या सर्वांची नावे आणि पोस्टचे स्क्रीनशाट चाकणकर यांच्याकडून पोलिसांना देण्यात आले आहेत. आता पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून आगामी काळात कठोर कारवाई केली जाण्याची शक्यता आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## ...तरीही शेतकरी गरीब का?

ग्राहकांच्या खिशाला चटका,बाजारात साखरेची तेजी, पण ऊस उत्पादक बळीराजाच्या हाती नेमके काय? साखरेचा भाव अचानक ६५ ते ७० रुपये किलोवर पोहोचतो आणि सर्वसामान्य ग्राहकांच्या कपाळावर आठ्या पडतात. घरातील चहापासून मिठाई, बेकरी, शीतपेये आणि चॉकलेटपर्यंत अनेक वस्तूंच्या किमती वाढण्याची चिंता व्यक्त होते. सरकारही तत्काळ हालचाल करते.साखरेचा पुरवठा वाढविण्यासाठी आयातीचा निर्णय घेतला जातो, साठेबाजीवर निबंध आणले जातात आणि बाजारभाव नियंत्रणात ठेवण्याचे प्रयत्न सुरू होतात.पण या सगळ्या घडामोडीत एक प्रश्न मात्र पुन्हा एकदा दुर्लक्षित राहतो साखरेचा भाव वाढला,मग ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्याला त्याचा किती फायदा झाला ? हा प्रश्न केवळ ऊस उत्पादक शेतकऱ्याचा नाही, तो देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेच्या भवितव्याचा प्रश्न आहे. साखरेचा दर वाढल्याची बातमी ऐकून शेतकऱ्याला आनंद होणे स्वाभाविक आहे. कारण साखरेला चांगला भाव मिळाला म्हणजे कारखान्याला चांगले उत्पन्न मिळेल आणि त्यातून आगामी हंगामात ऊसाला चांगला दर मिळेल, अशी त्याची अपेक्षा असते. पण शेतीच्या अर्थकारणात एवढे सरळ गणित नसते.साखरेचा किरकोळ दर आणि शेतकऱ्याला मिळणारा ऊसाचा दर यामध्ये उत्पादन,प्रक्रिया, वाहतूक, व्यापारी व्यवस्था,पॅकिंग, वितरण आणि बाजारातील अनेक घटक असतात. त्यातच सरकार ग्राहकहितासाठी बाजारात हस्तक्षेप करते.आज साखरेचा भाव वाढतो आणि उद्या ग्राहकांच्या हितासाठी साखर आयात करण्याचा निर्णय घेतला जातो. परिणामी देशांतर्गत बाजारातील दरावर दबाव येण्याची शक्यता निर्माण होते. म्हणजेच शेतकऱ्याला साखरेच्या तेजीचा आनंद घेण्याची संधी मिळण्याआधीच ती तेजी नियंत्रणात आणली जाते. ग्राहक संघटित, व्यापारी संघटित, शेतकरी मात्र विखुरलेला महागाई वाढली की ग्राहक आवाज उठवतो. व्यापारी आपल्या हितासाठी संघटित असतो. प्रक्रिया उद्योग आपले हितसंबंध सरकारसमोर प्रभावीपणे मांडतो. कारखानदारांकडे तज्ज्ञ,संघटना आणि धोरणात्मक संवादाची साधने असतात.बारा महिने शेतात राबणारा शेतकरी? तो मात्र अनेकदा जातीच्या, धर्माच्या, पक्षाच्या आणि गटाच्या राजकारणात विभागला जातो. शेतकरी संघटना वेगवेगळ्या भूमिका घेतात. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप होतात. नेतृत्वातील मतभेद वाढतात. परिणामी सरकारसमोर शेतकऱ्याची सामूहिक सौदेबाजीची ताकद कमी होते. ज्याच्या हातात अन्नधान्याचे उत्पादन आहे, त्याच्याकडे आपल्या उत्पादनाच्या किमतीवर नियंत्रण मात्र नाही, हीच कृषी व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका आहे. ऊसाचा भाव वाढला,पण उत्पादन खर्च किती वाढला.२०१४ मध्ये ऊसाला मिळणारा दर आणि आजचा दर पाहिला तर वाढ झालेली दिसते, परंतु शेतकऱ्याचे संपूर्ण अर्थकारण केवळ ऊसाच्या दरावर ठरत नाही. खत महागले, मजुरी वाढली, डिझेल महागले, कीटकनाशके आणि तणनाशकांचे दर वाढले, यंत्रसामग्रीचा खर्च वाढला, पाण्याचा खर्च वाढला, वाहतूक खर्च वाढला, वीज आणि सिंचन व्यवस्थेचा खर्च वाढला आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शेतकऱ्याचे स्वतःचे श्रम आजही अनेकदा उत्पादन खर्चात योग्यप्रकारे मोजले जात नाही. शेतक-याने स्वतःच्या कुटुंबासह शेतात केलेल्या श्रमाला बाजारमूल्य दिले, तर शेतीच्या नफ्याचे गणित आणखी बदलून जाते. म्हणून ऊसाला ३,६५० रुपये टन मिळतात एवढे सांगून शेतकरी नफ्यात आहे असे म्हणणे म्हणजे त्याच्या संपूर्ण आर्थिक गणिताकडे डोळेझाक करणे होय. शेतकऱ्यांनी मांडलेल्या तुलनेनुसार, २०१४ च्या तुलनेत काही मिश्र खतांच्या किमतीत अनेक पटींनी वाढ झाली आहे. एका विशिष्ट मिश्र खतासाठी सुमारे ४५० रुपयांपासून आज सुमारे २,३०० रुपये, तर १९:१९:१९ सारख्या खतासाठी सुमारे ५०० रुपयांपासून २,४०० रुपयांपर्यंत खर्च वाढल्याचे उदाहरण दिले जाते. दुसरीकडे ऊसाचा दर २,२०० रुपयांपासून ३,६५० रुपयांपर्यंत पोहोचला. म्हणजेच शेतकऱ्याच्या उत्पन्नातील वाढ आणि उत्पादन खर्चातील वाढ यांची गती समान नाही. हीच बाब कृषी अर्थव्यवस्थेतील मूळ समस्या आहे. २०१४ मध्ये महिला मजुरांची मजुरी सुमारे १२० रुपये आणि पुरुष मजुरांची मजुरी सुमारे २५० रुपये होती. आज ती अनुक्रमे ३५० आणि ७५०रुपयांपर्यंत पोहोचल्याचे शेतकरी सांगतात. मजुरी वाढली याचे शेतकऱ्याला दुःख असण्याचे कारण नाही. मजुराला योग्य मोबदला मिळायलाच हवा. पण प्रश्न असा आहे मजुराची मजुरी वाढते, खताची किंमत वाढते,औषधाची किंमत वाढते, डिझेल महागते, मग शेतकऱ्याच्या उत्पादनाला मिळणाऱ्या दराची वाढ त्याच प्रमाणात का होत नाही? शेतकरी आणि मजूर हे एकमेकांचे विरोधक नाहीत. दोघेही ग्रामीण अर्थव्यवस्थेचे आधारस्तंभ आहेत. खरी समस्या अशी आहे, की उत्पादन साखळीतील सर्व घटकांना त्यांचा योग्य वाटा मिळेल अशी व्यवस्था अजून निर्माण झालेली नाही. ही वेळ शेतकऱ्यानेही स्वतःला एक प्रश्न विचारण्याची आहे. मी फक्त पिकवणार की माझ्या उत्पादनाचा बाजारही समजून घेणार?आजचा शेतकरी हवामानाचा अंदाज पाहतो, पण बाजाराचा अंदाज किती जण घेतात ? तो खताचा दर विचारतो, पण अंतिम उत्पादन कोणत्या दराने विकले जाते याचा अभ्यास किती जण करतात? तो उत्पादन वाढवतो,पण मूल्यवर्धनाचा विचार किती जण करतात?शेतीत विज्ञान आणि व्यवसाय आणण्याची वेळ आली आहे. शेती आता केवळ परंपरेवर चालणारा व्यवसाय राहिलेला नाही. माती परीक्षण, अचूक खत व्यवस्थापन, ठिबक सिंचन, यांत्रिकीकरण, ड्रोन तंत्रज्ञान, हवामान आधारित नियोजन, डिजिटल बाजारपेठ, पीक विमा, साठवणूक, प्रक्रिया उद्योग आणि मूल्यवर्धन या सगळ्यांचा एकत्रित वापर करण्याची वेळ आली आहे. सरकारने ग्राहकाला स्वस्त साखर मिळावी यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. पण ग्राहकहित आणि शेतकरीहित यांच्यात संघर्ष निर्माण होईल अशी धोरणे दीर्घकाळ टिकणारी नाहीत. साखरेचे दर वाढले की आयात आणि दर नियंत्रण, दर कमी झाले की शेतकऱ्याला मदत प्रतिक्रियात्मक धोरणे पुरेशी नाहीत.गरज आहे ती दीर्घकालीन आणि स्थिर साखर धोरणाची.त्यात उत्पादन, साखरेचा साठा, निर्यात, आयात, इथेनॉल, ऊस क्षेत्र,पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्याचे उत्पादन अर्थशास्त्र यांचा समतोल साधला पाहिजे. सर्वसामान्य ग्राहकाला स्वस्त साखर हवी आहे, हे योग्यच. पण स्वस्त साखरेसाठी शेतकऱ्याला कायम कमी दर द्यायचा असेल, तर उद्या ऊस कोण पिकवणार? शेतकऱ्याला उत्पादन खर्च भरून निघेल आणि सन्मानाने जगता येईल एवढा परतावा मिळाला नाही तर पुढील पिढी अशी शेतीकडे पाठ फिरवेल. म्हणूनच ग्राहक आणि शेतकरी यांना एकमेकांच्या विरोधात उभे करण्याऐवजी सरकारने उत्पादन साखळीतील अनावश्यक खर्च, मध्यस्थी आणि असमतोल कमी करण्यावर भर दिला पाहिजे. आता नवी हरितक्रांती हवी.

# साखर आयातीची नामुष्की का ओढविली ?

**चालू हंगामातील घडामोडींमुळे साखर निर्यातदार ते आयातदार अशी भारताची वाटचाल झाली आहे. बऱ्यापैकी नियंत्रण असतानाही साखरेचा ताळेबंद सरकारच्या आवाक्यात आला नाही. त्यामुळे साखरेचा भाव विक्रमी पातळीवर पोहोचला. या तेजीचा लाभ मात्र व्यापाऱ्यांपर्यंत सीमित असल्याचे दिसत आहे. सरकार भाव कमी करण्यासाठी आटापिटा करत आहे. पण 'एल निनो'मुळे पुढची दोन वर्षे साखर सरकारची झोप उडविण्याची शक्यता आहे.**



साखरेचा २०२५-२६ चा हंगाम उत्पादनवाढीच्या गोड अपेक्षेसह सुरू झाला होता. सरकारच्या अंदाजानुसार देशात उसाचे उत्पादन २०२४-२५ च्या तुलनेत ९ टक्क्यांनी वाढले होते. त्यामुळे साखर उत्पादनही मागील हंगामाच्या २९६ लाख टनांवरून ३४३ लाख टनांवर पोहोचेल, असे अंदाज होते. अर्थात, उत्पादन २०२१-२२ नंतर गेल्या दशकातील दुसरे उच्चांकी असेल, असा अंदाज सरकार आणि उद्योगांच्या पातळीवर व्यक्त होत होता. या अंदाजाच्या भरवशावर सरकारने आखलेल्या धोरणांनी साखर दरवाढीचे बीजे रोवली असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

आजही साखर उत्पादनाविषयी वेगवेगळे अंदाज आहेत. इस्मा या संघटनेने जुलैमध्ये जाहीर केलेल्या अहवालात एकूण ३४९ लाख टन उत्पादन झाल्याचे म्हटले आहे. तर ऑल इंडिया शुगर ट्रेड असोसिएशनच्या अंदाजानुसार इथेनॉल वगळता साखरेचे निव्वळ उत्पादन २८३ लाख टन झाले आहे. उद्योगातील जाणकारांच्या मते उत्पादन २८० लाख टनांच्या आसपास आहे. तर सरकारने २२ ऑगस्टला ३०६ लाख टन उत्पादन झाल्याचे म्हटले आहे. सरकारच्या मते, उद्दिष्टापेक्षा उत्पादन ११ टक्के कमी झाले. थोडक्यात, साखर उत्पादनाचे वेगवेगळ्या संस्थांचे अंदाज वेगवेगळे आहेत. बऱ्यापैकी संघटित असलेल्या साखर उद्योगातील उत्पादन, वापर, शिल्लक साठा आणि निर्यातीचा अचूक ताळेबंद मांडण्यात सरकार अपयशी ठरले. सरकारकडे कारखाना पातळीवर साखर निर्मितीचे आकडे येत असतात. उस लागवडीचीही माहिती कारखान्यांकडे असते. तसेच सरकार कारखान्यांना महिन्याला साखर विक्रीचा कोटा देते. साखर उद्योगावर सरकारचे बऱ्यापैकी नियंत्रण असतानाही अनपेक्षित भाववाढ दिसत आहे.

इथेनॉलसाठी साखर गेल्याने यंदा उत्पादन घटल्याचे सरकारचे अधिकारी सांगत आहेत. चांगल्या साखर उत्पादनाच्या आशेने सरकारने इथेनॉल निर्मितीसाठीही साखरेच्या वापरास परवानगी दिली. जवळपास ३० लाख टन साखर इथेनॉल निर्मितीसाठी वापरली गेली. इथेनॉलसाठी साखर गेली नसती तर साखरेचा पुरवठा वाढण्यास मदत झाली असती, असा युक्तिवाद आता केला जात आहे.त्यामुळे यंदा सरकार इथेनॉलसाठी साखर वळती करण्यास परवानगी देणार नाही. कारखानेही भाव पाहून साखर निर्मितीलाच प्राधान्य देतील. कारण सध्या इथेनॉलपेक्षा साखर निर्मिती करणे कारखान्यांसाठी फायद्याचे ठरत आहे.

**धरसोडीचे धोरण**

हंगामाच्या सुरुवातीलाच चांगल्या साखर उत्पादनाची गोड स्वप्न बघत सरकारने नोव्हेंबर २०२५ मध्ये १५ लाख टन आणि नंतर ५ लाख टन अशी २० लाख टन साखर निर्यातीत्य परवानगी दिली. पण देशातच साखरेचा भाव वाढल्यानंतर निर्यात कमी झाली. देशातील साखरेचा भाव आंतरराष्ट्रीय बाजारापेक्षा वाढला. त्यामुळे बेमतेम ८ लाख टन साखर निर्यात होऊ शक्लो. ऊस हंगाम जसजसा शेकटाकडे गेला आणि साखर उत्पादनाचे वास्तव पुढे आले तसे सरकौर खडबडून जागे झाले. सरकारने में २०२६ मध्ये साखर निर्यात बंद केली. निर्यातबंदी ३० सप्टेंबरपर्यंत आपणार आहे. पण तोपर्यंत ८ लाख टन या बाहेर गेली होती. उद्योगांच्या मते, देशात मागील हंगामातील ४७ लाख टन साखरेचा शिल्लक साठा होता. तर उत्पादन २८० लाख टन आहे. त्यामुळे साखरेचा एकूण पुरवठा ३२७ लाख टन झाला. तर देशात वर्षाला २८० लाख टन साखरेचा वापर होतो. निर्यात होऊनही साखरेचा पुरवठा मागणीपेक्षा जास्त दिसत असला तरी नव्या हंगामात राहणारा शिल्लक साठा कमी झाला. म्हणजेच साखरेची उपलब्धता गेल्या वर्षपिक्षा कमी असल्याचा संदेश बाजारात गेला. त्यातच नव्या हंगामावर 'एल निनो'चे सावट असल्याने उत्पादन कमी राहण्याची दाट शक्यता गृहीत धरून बाजारात साखरेचे व्यवहार सुरू झाले. त्यातच सणांची मागणी सुरू झालो. भाव वाढत असतानाही ऑगस्ट महिन्यात सणांसाठी साखरेची मागणी वाढली. त्यामुळे भावात मोठी वाढ झाली. ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यातच भाव २० टक्क्यांपर्यंत वाढले. एकाच दिवसात १७ ऑगस्ट रोजी विक्रमी ३०० ते ५०० रुपयांपर्यंत क्विंटलमागे वाढ झाली होती. साखरेच्या भावात मागील दोन महिन्यांतच ६० ते ७० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.

साखरेच्या भाववाढीचा आलेख पाहून सरकारने २० ऑगस्ट रोजी १० लाख टन कच्ची साखर आयातीला परवानगी दिली. नोव्हेंबर २०२५ मध्ये साखर निर्यात करणारा भारत ऑगस्ट २०२६ मध्ये आयातदार झाला. यावरून सरकार साखरेचा विश्वासार्ह ताळेबंद मांडण्यात अपयशी ठरले हे स्पष्ट होते.

**बाजारावरील कासरा घट्ट**

साखरेचा भाव वाढण्यामागे काही घटक कारणीभूत असल्याचे सरकारने म्हटले आहे. यात अपेक्षेपेक्षा साखरेचे कमी झालेले उत्पादन, सणांच्या तोंडावर साखरेची वाढलेलो मागणी, हवामानविषयक संकटांमुळे उत्स पिकाचे झालेले नुकसान, जागतिक पातळीवर साखमेचा कमी झालेला पुरवठा तसेच साठेबाजी आणि सट्टेबाजीमुळे साखरेचे भाव वाढल्याचा दावा सरकारने केला आहे. साखरेची साठेबाजी होत असल्याचे सांगत सरकारने साठा मर्यादा लागू केली. सरकारने १ ऑगस्ट ते ३० नोव्हेंबर या काळात साखरेच्या डिलर्सवर ४०० टनांची साठा मर्यादा लावली आहे. तर नुकतेच साखरेचा कच्चा माल म्हणून एका महिन्यात १० टनपिक्षा जास्त वापर करणाऱ्या मोठ्या ग्राहक कंपन्यांना १ सप्टेंबरपासून त्यांच्या १५ दिवसांच्या वापराएवढीच साखर ठेवता येणार आहे. म्हणजेच १५ दिवस लागेल एवळ्याच साखरेचा साठा या कंपनी किंवा ग्राहकांना ठेवता येणार आहे. ही मर्यादा १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर या काळासाठी लागू असेल. तसेच साखरेची प्रत्यक्ष खरेदी विक्री न करता केवळ कागदावरील व्यापार टाळण्यासाठी विक्री केल्यानंतर ७ दिवसांमध्येच खरेदीदारांना साखर पाठविण्याची सूचना कारखान्यांना करण्यात आल्याचे उद्योगांनी स्पष्ट केले. पण सरकारच्या या धोरणांमुळे बाजारात जास्तच पॅनिक निर्माण होत असल्याचे काही जाणकारांचे म्हणणे आहे. सणांची मागणी पूर्ण करण्यासाठी जास्तीत जास्त १५ दिवस आधो खरेदी होत होती. पण सरकारच्या धोरणांमुळे ऐनवेळी अडचणी नको म्हणून उद्योग आणि व्यापारी आत्तापासूनच साता करत असल्याचे उद्योगातील जाणकारांचे म्हणणे आहे. साखरेचा पुरवठा कमी असल्याची चर्चा बाजारात जोरात सुरू आहे. ही चर्चा रंगवण्यात सरकारनेही हातभार लावल्याची टिका काही व्यापारी करत आहेत.

**साखर नेमकी कुणाकडे?**

साखरेचे भाव वाढल्यानंतर साखर नेमकी कुणाकडे, असाही प्रश्न निर्माण होत आहे. हंगामाच्या शेवटी देशात ३३ ते ३४ लाख टन साखरेचा शिल्लक साठा राहील, असा अंदाज आहे. साखर विक्रीतून कारखान्यांना आता चांगला नफा होत असल्याने त्याचा वाटा ऊस उत्पादकांनाही द्या, अशी मागणी शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी केली. पण साखमेचा साठा सध्या व्यापा-यांकडेच जास्त असल्याचे कारखान्यांच्या वर्तनि सांगण्यात येत आहे. तसेच उसाचे गाळप किती होते, साखरेची निर्मिती किती होते याची माहिती माहिती कारखाने सरकारला देतात, असा दावा कारखान्यांच्या प्रतिनिधींना केला आहे. साखरेची साठेबाजी आणि भावाची सट्टेबाजी व्यापारी पातळीवर होते. त्यामुळे साखरेच्या भाववाढीच्या अनुषंगाने व्यापारी पातळीवर होणाऱ्या व्यवहारांची सरकारने चौकशी करावी. 'देशात साखरेचे भाव एवढ्या प्रमाणात वाढावे अशी टंवाई सध्या दिसत नाही. पण काही व्यापारी आणि संस्था टंचाईची चर्चा पेरून भाव अवास्तवपणे वाढवत आहेत. सरकारने अशा व्यवहारांवर आळा घालावा. प्रत्यक्ष साखरेची डिलेवरी न घेता केवळ नफा कमावण्यासाठी व्हर्च्युअल व्यवहार होत आहेत. यामुळे भाववाढ होण्यास जास्त मदत मिळाली. कारखान्यांपेक्षा या तेजीत व्यापाऱ्यांचाच जास्त फायदा होत आहे. त्यामुळे सरकारने या पातळीवर लक्ष ठेवावे,' अशीही मागणी काही कारखान्यांच्या प्रतिनिधीनी केली आहे.

**शेवट की सुरुवात?**

सध्याख्या साखरेच्या तेजीत सट्टेबाजी आगि साठेबाजीचा मोठा बाटा काही प्रमाणात असत्य तरो साखरेचा पुरवठा देशांतर्गत बाजारात कमीच आहे. पुढे मांसाठी मप्टेंबर ते नोव्हेंबर या काळात साखरेचा जास्त वापर होत असतो. या तीन महिन्यांमध्ये साधारण ७५ ते ८० लाख टन वापर होण्याची शक्यता आहे. असे शेतीमाल बाजार अभ्यासक राजेंद्र जाधव यांनी सांगितले. त्यामुळे साखरेचा हंगाम चंदा लवकर सुरु करण्याची मागणी होत आहे. पण सर्वच कारखाने ऑक्टोबरमध्ये सुरू होण्याची शक्यता धूसरच आहे. ऊस तोड मजूर खरिपाची कानी करूनच तोडीवर घेतात. यंदा खरिपाच्या पेरण्या किय झाल्या. त्यामुळे सुरुवातीला मजुरांच्या उपलब्धते निर्माण होऊ शकतो. परिणामी साखर दरवाढीचा सामन्य ऐन सणासुदीत सामान्यांना करावा करावा लागणार आहे.

गाळप हंगामाने वेग घेतल्यानंतर साखरेचा पुरवठा वाढेल, किमती कमी होण्यास मदत होईल. पण इथेच संकट संपणार नाही. कारण उस काहाँ ४-६ महिन्यांचे पोक नाही. ऊस १२ ते १४ महिन्यांचे पोक आहे. यंदाच्या हंगामासाठी लागवड करताना पिकासाठी पाणी उपलब्ध होते. कारण गेल्या मॉन्सून हंगामात चांगला पाऊस होता. तरीही पिकाला विविध कारणांनी फटका बसल्याचे शेतकरी सांगत आहे. पण खरी कसोटी पुढील हंगामासाठीच्या लागवडीची असणार आहे. कारण भारतीय हवामान विभागाने सप्टेंबर महिन्यात कमी पावसाचा अंदाज दिला आहे. राज्याचा विचार केला तर पुणे, सातारा, नाशिक, कोल्हापूर, पालघर, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यांतील चरणांमध्ये साठा वाचला असला तरी राज्यातील इतर भागांमध्ये परिस्थिती चिंताजनक आहे. पुढे कमी पाऊस आणि उष्णतेत वाढीचा अंदाज आहे. उन्हाळाही तापदायक ठरण्याचे संकेत आहेत. या परिस्थितीत २०२७-२८ च्या गाळप हंगामासाठी खरी कसोटी लागणार आहे, असेही राजेंद्र जाधव यांनी सांगितले. त्यामुळे सरकारी धोरणांचो टांगती तलवार पुढील दोन वर्षे साखर बाजारावर राहण्याची शक्यता आहे.

**अनिल जाधव**

## भान ठेवून केलेले सादरीकरण

'असे कार्यक्रम किंवा असे वैचारिक events आपल्याकडे फारसे का होत नाहीत?'हा प्रश्न कालच्या 'छात्रों की गूंज'बाबत एकाने विचारला आहे. त्याचे हे मला वाटत असलेले उत्तर..

'वैचारिक' या शब्दावर ही समस्या उभी आहे. 'काही शब्दांमध्ये, अक्षरांमध्ये, ६० सेकंदाच्या रील्समध्ये आपले म्हणणे मांडा' अशा पध्दतीत विकसित(!) होत समाजमाध्यमांनी आपले बस्तान बांधले. जितक्या जास्त क्लिक्स तितक्या जास्त जाहिराती वापरकर्त्याला दाखवता येणे, वापरकर्त्याचा तितका जास्त डेटा आपल्याला मिळणे असे टेक्नॉलॉजीमधल्या कंपन्यांचे केवळ भांडवलशाही हेतू होते आणि आहेत. त्यामुळे



विचारपूर्वक, सविस्तर म्हणणे मांडणे आणि ते ऐकणे याची प्रतिष्ठा संपत गेली.

यानंतर विचार करणे या माणसाच्या देकार्तने मांडलेल्या सहजप्रवृत्तीवर एआय घाला घालायला पहाते आहे.'एआय करेल की विचार.. तुम्ही कशाला त्यात मेंदू खपवता' अशा प्रकारे एआयचा विकास होऊन तो लोकांवर थोपवला जातो आहे.त्यामुळे वैचारिक इव्हेंटस ही संकल्पनाच लोप पावत चाललेली आहे. उदा. शास्त्रीय संगीतात रागविस्तार केलेले गाणे, विचारपूर्वक लिहिलेले पुस्तक वगैरे लोकांनाच आता नको असते.

या पार्श्वभूमीवर काल सादर झालेल्या 'छात्रों की गूंज' या कार्यक्रमात त्यातली प्रेझेंटेशनची 'तीन ते चार शब्दांत' सूत्र मांडून विषयविस्तार करण्याची पध्दत, एकच एक सादरकर्ता समोर न ठेवता छोट्या छोट्या संवादांमधून विषयसूत्र पुढे नेणे, समोरच्या स्क्रीनवरची नमुन्यादाखल सादर केलेली (आणि क्लिष्ट नसलेली) आकडेवारी हे format खूप महत्वाचे ठरले.

राज ठाकरे यांचे 'लाव रे तो व्हिडिओ' format यशस्वी होण्यामागे देखील विषयाला धरुन सादर केलेले छोटे किस्से, चित्रपट / साहित्यातले संदर्भ, थोरांसोबतच्या आठवणी, देशापरदेशातली चपखल उदाहरणे, आकडेवारी, कोटेबल कोटस आणि कार्यक्रमाची जेजेचा विद्यार्थी असल्याची साक्ष पटवणारी elegant मांडणी कारण ठरली होती.

भपकेबाज प्रेझेंटेशन आणि कोणता कार्यक्रम आहे याचे भान ठेवून केलेले सादरीकरण यातला फरक हे देखील कार्यक्रम यशस्वी होण्यामागचे एक महत्वाचे कारण आहे.

**नीलांबरी जोशी**

## साखर आणि ज्ञानाची आंस

२१ ऑगस्ट २०२५ रोजी किरकोळ बाजारात साखरेचा दर होता प्रती किलो ४५ रुपये. २१ ऑगस्ट २०२६ रोजी दर होता प्रती किलो ६९ रुपये. साखर उत्पादनात जगामध्ये भारताचा दुसरा क्रमांक आहे. साखरेची सर्वात मोठी बाजारपेठ भारत आहे. महाराष्ट्र राज्य साखर उत्पादनात अग्रेसर आहे. सहकारी आणि खाजगी साखर कारखाने महाराष्ट्रात आहेत. मात्र या विषयावर महाराष्ट्रातील वर्तमानपत्रांत जुजबी बातम्या आणि वृत्तांत आहेत.

साखरेच्या दरात वाढ का झाली यासाठी इंग्रजी वर्तमानपत्रे वाचावी लागतात. कोण, कोणास काय म्हणाले या बातम्यांमध्ये मराठी वाचकांना भीषण रुची असते. बहुसंख्य यूट्यूबर्स याच विषयावर बडबड करत असतात. साखर, इथेनॉल, पशुखाद्य हे सर्व विषय एकमेकांशी निगडीत आहेत ही बाब मराठी प्रसारमाध्यमं वाचत असाल तर कळत नाही. त्यासाठी रॉयटर्स, द मिंट, द इकॉनॉमिक टाइम्स इत्यादी वर्तमानपत्रातल्या बातम्या वाचाव्या लागतात.ऊस उत्पादक, साखर कारखान्यांचे व्यवस्थापन (सहकारी वा खाजगी), साखर कारखान्यातील कामगार आणि ग्राहक इत्यादी कोणत्याही स्टेक होल्डर्सना या विषयात रस नसतो. मराठी अस्मितेचा अभिमान, गर्व, छत्रपती शिवाजी महाराज, इत्यादींबद्दल महाराष्ट्र कमालीचा संवेदनशील आहे. मात्र साखरेचे भाव का वाढतात याबाबत महाराष्ट्राला म्हणजे महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमांना आणि वाचकांना काडीमात्र रस नाही. कारण ज्ञानाची आंस नाही मराठी भाषकांना.

**-सुनील तांबे,** मुंबई

## मनुस्मृतीवर टीका, पण 'तलाक-बुरख्या'वर मौन?

राजकारणात जेव्हा सामाजिक सुधारणा आणि धार्मिक कुप्रथांवर भाष्य केले जाते, तेव्हा निष्पक्षता हा सर्वात मोठा निकष असतो. नुकत्याच पुण्यात झालेल्या 'जेन-झी' च्या कार्यक्रमात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मनुस्मृतीतील विचारांवर टीका करत महिलांच्या स्वातंत्र्याचा आणि पितृसत्ताक मानसिकतेचा मुद्दा मांडला. स्त्री ही कोणाचीही मालमत्ता नसून ती स्वायत्त आहे, हा विचार निश्चितच आधुनिक आणि पुरोगामी आहे. परंतु, जेव्हा हाच न्याय इतर धर्म किंवा समाजातील अनिष्ट प्रथांना लावण्याचा प्रसंग येतो, तेव्हा राजकीय नेतृत्वाची सोयीची भूमिका स्पष्टपणे समोर येते.हिंदू धर्मातील प्राचीन ग्रंथांमधील त्रुटींवर बोट ठेवणाऱ्या राहुल गांधींना मुस्लिम समाजातील 'हलाला', 'ट्रिपल तलाक' किंवा 'बुरखा' यांसारख्या प्रथांवर मौन बाळगणे योग्य वाटते का, असा प्रश्न उपस्थित होतो. कर्नाटकातील काँग्रेस सरकारच्या शाळांमधील हिजाब आणि बुरख्याबाबत घेतलेली शिथिल भूमिका असो किंवा ऐतिहासिक शाह बानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय बदलून घेतलेली माघार असो; राजकीय फायद्यासाठी सुधारणावादी तत्त्वांना नेहमीच बगल दिली गेल्याचे दिसते.एका धर्मातील प्रथांना लक्ष्य करायचे आणि दुसऱ्या धर्मातील सामाजिक समस्यांकडे मतपेढीच्या गणितातून दुर्लक्ष करायचे, हा दुटप्पीपणा आहे.

**अविनाश देशपांडे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# मृत वनमजुराचा मृतदेह जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात..!

## हक्काच्या वेतनासाठी झगडणाऱ्या रमाशंकर शुक्लांचा उपचारादरम्यान मृत्यू, चार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** हक्काचे वेतन आणि कामावरून कमी केल्याच्या निषेधार्थ विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केलेले पुसद सामाजिक वनीकरण विभागातील रोजंदारी वनमजूर तथा वनमजूर संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमाशंकर शुक्ला यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर संतप्त नातेवाईक आणि वनमजुरांनी मृतदेह थेट जिल्हाधिकारी कार्यालयात आणून जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनासमोर ठेवत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. शुक्ला यांच्या मृत्यूस जबाबदार असल्याचा आरोप असलेल्या चार अधिकाऱ्यांवर कारवाई झाल्याशिवाय मृतदेह हलविणार नाही, अशी ठाम भूमिका कुटुंबीयांनी घेतल्याने जिल्हाधिकारी कार्यालय





परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. रमाशंकर शुक्ला यांनी २० ऑगस्ट रोजी यवतमाळातील संविधान चौक परिसरातील एका लॉजमध्ये विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्यापूर्वी त्यांनी ११ पानी सुसाईड नोट लिहिल्याची माहिती नातेवाईकांनी दिली. विष प्राशन केल्यानंतर त्यांना तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असतानाच उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.थकीत वेतन आणि सेवेतून कमी केल्याचा मुद्दा ऐरणीवर होता. कुटुंबीय आणि वनमजूर संघटनेच्या म्हणण्यानुसार, योजना संपल्याचे कारण देत शुक्ला यांना कामावरून कमी करण्यात आले होते. तसेच त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला व थकीत वेतन मिळाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. आपल्या हक्काच्या पैशांसाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा केला. मात्र मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. शुक्ला यांच्या पत्नी आणि मुलीने वनविभागातील चार अधिकाऱ्यांना त्यांच्या मृत्यूस जबाबदार धरत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. दोषी आढळणाऱ्यांवर सेवेतून बडतर्फीची कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी विकास मीना हे बाहेरगावी असल्याने निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी नातेवाईक व वनमजूर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. वरिष्ठ स्तरावर संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन देत मृतदेह अंत्यसंस्कारासाठी हलविण्याची विनंती प्रशासनाकडून करण्यात आली. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई झाल्याशिवाय मृतदेह हलविणार नसल्याची भूमिका कुटुंबीयांनी कायम ठेवली. दरम्यान, एचडीपीएफ अमोल कोळी, यवतमाळ शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक निलेश सुरडकर, लोहारा पोलिस ठाण्याचे निरीक्षक रोहित जाधव यांच्यासह पोलिसांचा मोठा बंदोबस्त जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात तैनात करण्यात आला. परिस्थिती चिघळू नये आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेण्यात आली.

### वनमजुरांच्या हक्कासाठी लढणारा आवाज कायमचा हरपला

**रमाशंकर शुक्ला हे अनेक वर्षांपासून पुसद वनविभागात रोजंदारी वनमजूर म्हणून कार्यरत होते. वनमजूर संघटनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी रोजंदारी व सूचीबद्ध वनमजुरांना नियमित सेवेत सामावून घेणे, प्रलंबित वेतन अदा करणे आणि अन्य हक्क मिळवून देण्यासाठी सातत्याने आंदोलने, निवेदने व उपोषणे केली होती. त्यांच्या मृत्यूनंतर वनमजुरांमध्ये संतापाची लाट पसरली असून, सामाजिक वनीकरण विभागातील कामकाज, रोजंदारी मजुरांचे प्रलंबित वेतन आणि कथित आर्थिक अनियमिततांची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.**

### ११ पानी सुसाईड नोट तपासाचा केंद्रबिंदू

**शुक्ला यांनी मृत्यूपूर्वी लिहिलेली ११ पानी सुसाईड नोट पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती नातेवाईकांनी दिली. या नोटमध्ये कोणते आरोप करण्यात आले आहेत, कोणत्या अधिकाऱ्यांची नावे नमूद आहेत आणि आत्महत्येपूर्वी नेमकी कोणती परिस्थिती निर्माण झाली होती, याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे. शुक्ला यांच्या मृत्यूमागील कारणांची सखोल चौकशी करून सुसाईड नोटमधील आरोपांची सत्यता तपासावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नातेवाईक, वनमजूर संघटना आणि उपस्थितांनी केली आहे. या घटनेमुळे सामाजिक वनीकरण विभागातील रोजंदारी वनमजुरांच्या प्रलंबित प्रश्नांवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

## सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जलसंधारण दिन उत्साहात साजरा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. २४ :** कला वाणिज्य महाविद्यालय, राळेगाव येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व जलसंधारणाचे प्रणेते स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जलसंधारण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना जलसाक्षरतेचे महत्त्व पटवून देणे व पाण्याच्या संवर्धनाबाबत जागृती निर्माण करणे हा होता.



कार्यक्रमाची सुरुवात स्व. सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थिनी मोहिनी नेहारे व नेहा भोयर यांनी जलसंधारणाचे महत्त्व, पाण्याचा तुटवडा आणि पावसाचे पाणी अडविण्याची गरज यावर आपले विचार मांडले. प्रा.गौरकर यांनी स्व. नाईक यांच्या जलसंधारण क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेतला. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.विशाल दौलतकर यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात पाण्याचा अपव्यय टाळण्याचे व वृक्षारोपण करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.बी. एम.सावरकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, "जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या गावात व परिसरात जलसाक्षरतेचा संदेश पोहोचवावा." या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती लाभली होती. शेवटी प्रा. विशाल वाघमारे यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

## ग्रामसभा रखडली, तुपटाकळी ग्रामस्थांचा पंचायत समितीवर एल्गार

### ट्रॅक्टरमधून ५५ ग्रामस्थांची धडक डफडी वाजवत ठिय्या, प्रशासनाला जाब

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. २४ :** ग्रामसभा घेण्याची वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून दिरंगाई होत असल्याच्या निषेधार्थ तुपटाकळी ग्रामस्थांनी सोमवारी दिग्रस पंचायत समितीवर धडक देत तीव्र आंदोलन केले. तब्बल ५५ ग्रामस्थ ट्रॅक्टरमधून पंचायत समितीत दाखल झाले.



डफडी वाजवत घोषणाबाजी केल्यानंतर ग्रामस्थांनी कार्यालयातच ठिय्या मांडल्याने प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली. गावातील विकासकामे, निधीचा वापर, सार्वजनिक प्रश्न आणि नागरिकांच्या मूलभूत समस्यांवर चर्चा करण्यासाठी ग्रामसभा घेण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी यापूर्वी लेखी निवेदनाद्वारे केली होती. मात्र, मागणी करूनही ग्रामसभा न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला. "ग्रामसभाच होत नसेल तर गावातील प्रश्न मांडायचे कुठे?", असा सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, गटविकास अधिकारी पंजाब रणमले हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगमध्ये व्यस्त असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र, त्यानंतरही ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेण्यास नकार दिला. ग्रामसेवक अनिल उंबरकर पंचायत समितीत दाखल होताच आंदोलनकर्त्यांनी टाळ्या वाजवून निषेध नोंदविला. ग्रामसभा न घेण्यामागील कारणाची चौकशी, सरपंच व ग्रामसेवकांच्या अनुपस्थितीची चौकशी तसेच नियमानुसार कारवाईची मागणी ग्रामस्थांनी केली. अखेर प्रशासनाने ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रशासकांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनाची सांगता झाली. मात्र, आता आश्वासनाची अंमलबजावणी होते की पुन्हा ग्रामस्थांच्या पदरी केवळ आश्वासनच पडते, याकडे तुपटाकळीचे लक्ष लागले आहे. या आंदोलनात बजरंग गावडे, विशाल चव्हाण, राहुल साबळे, कृष्णा चव्हाण यांच्यासह ५५ ग्रामस्थ सहभागी झाले.

## थोडक्यात




### माणिकराव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त काँग्रेस कार्यकर्त्यांचे रक्तदान

**दारव्हा :** माजी गृहराज्यमंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त दारव्हा तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयात गरजू रुग्णांना फळवाटप करण्यात आले, तर काँग्रेस भवन येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात काँग्रेसचे आजी-माजी पदाधिकारी, युवक काँग्रेस, सेवादल तसेच निष्ठावंत कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मोठ्या संख्येने रक्तदान केले. या उपक्रमातून केवळ वाढदिवस साजरा न करता सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल ठाकरे, दिग्रस विधानसभा प्रभारी प्रकाश नवरंगे, तालुकाध्यक्ष गजानन बिबेकर, सय्यद फारुख, ज्ञानेश्वर बोरकर, मनमोहनसिंग चव्हाण, अतुल राऊत यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. 'सेवेतूनच नेतृत्वाची खरी ओळख' या भावनेतून उपक्रम राबविण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### जन्माष्टमी उत्सव समितीच्या अध्यक्षपदी ॲड,कूणाल चोरडिया..

**समितीची नवी कार्यकारिणी जाहिर,रंगणार तीन दिवसीय भव्य महोत्सव**

**वणी :** 'जय श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव समिती'ची महत्वपूर्ण



बैठक पार पडली, ॲड,कूणाल चोरडिया यांच्या नेतृत्वावर पून्हा विश्र्वास व्यक्त करत त्यांची अध्यक्षपदी सर्वानुमते फेरनिवड करण्यात आली,नवनियूक्त अध्यक्षांच्या अनूमतीने समितीची नूतन कार्यकारणी व वरिष्ठ सल्हागार समिती जाहिर करण्यात आली, यामध्ये शूभम मदान,श्याम लाहारिया,राहूल मूंडजेकर,अभय नागपूरे,उमेश पोद्दार,सूधिर तलसे,जयंत पांडे,राजू रिंगोले,अमोल धानोरकर,आशिष सिसोदिया,दीपक पाऊनकर,पार्थ त्रिवेदी आणि सौरभ राजूरकर यांचा समावेश आहे, सल्लागार समितीत विजय चोरडिया,आशिष गूप्ता,निकेश गूप्ता,विजय पूण्यांनी,राजाभाऊ बिलोरिया,महाविर कटारिया,नारायन गोडे,सूरेश मांडवकर,संतोष मार्कंडे,अनिल रेभे,विशाल दूधबडे.गजानन बत्तूलवार,पिंकि बत्रा,प्रा,दिलिप अलोणे,मयूर गेडाम यांचा समावेश करण्यात आला.

## जिल्हा बँकेच्या निवडणुकीत महागाव चे समीकरण तापले..!

### स्वप्नील नाईकांच्या नावाची जोरदार चर्चा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ मनीष ढाले

**फुलसावंगी, दि. २४ :** यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महागाव तालुक्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय समीकरणे चांगलीच तापू लागली आहेत. फुलसावंगी येथील युवा सहकार नेते स्वप्नील नाईक यांचे नाव जिल्हा गटातून उमेदवारीसाठी चर्चेत आले असून, त्यांच्या संभाव्य एन्ट्रीमुळे महागाव तालुक्यातील राजकीय गणिताला नवी दिशा मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



महागाव तालुका गटातील २८ प्रतिनिधी निवडणुकीत निर्णायक भूमिका बजावणार असल्याने इच्छुकांकडून संपर्क व मोर्चेबांधणीला वेग आला आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपसह स्वतंत्र विचारसरणीचे प्रतिनिधी या गटात असल्याने पक्षीय समीकरणांपेक्षा वैयक्तिक संपर्क आणि सहकार क्षेत्रातील प्रभाव महत्त्वाचा ठरणार असल्याची चर्चा आहे. स्वप्नील नाईक यांचा विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, फुलसावंगी येथे सलग तीन टर्मपासून प्रभाव असून, खरेदी-विक्री संस्था, जिनिंग-प्रेसिंग तसेच मार्केट कमिटीशी संबंधित सहकार क्षेत्रात त्यांचा चांगला संपर्क असल्याचे सांगितले जाते. बाबासाहेब नाईक सूतगिरणीचे संचालक म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. दरम्यान, फुलसावंगी सोसायटीकडून जिल्हा बँकेच्या प्रतिनिधीपदासाठी त्यांच्या पत्नी सुषमा स्वप्नील नाईक यांचे नाव देण्यात आल्याने नाईक कुटुंबाची राजकीय-सहकारी वाटचाल चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. आगामी काळात त्यांना VJ-NT किंवा महिला मतदारसंघातून संधी मिळू शकते, अशीही राजकीय वर्तुळात चर्चा आहे.आता नाईक प्रत्यक्ष निवडणूक रिंगणात उतरतात का आणि कोणत्या पॅनेलकडून त्यांना संधी मिळते, याकडे महागावसह जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## महागाव येथील माउंट लिट्रा झी स्कूलमध्ये आजी-आजोबा दिन साजरा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २४ :** माउंट लिट्रा झी स्कूल येथे आजी-आजोबा दिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. नर्सरी ते इयत्ता दुसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे सगे आजी-आजोबा मोठ्या संख्येने या विशेष कार्यक्रमात सहभागी झाले.



नातवंडांसोबतचा आनंदाचा क्षण अनुभवताना आजी-आजोबांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि मुलांच्या उत्साहाने संपूर्ण शाळेचे वातावरणच आनंदमय झाले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे आजी-आजोबांनी आपल्या नातवंडांसोबत केलेला रॅम्प वॉक! नातवंडांसोबत आत्मविश्वासाने रॅम्पवर चालत आजी-आजोबांनी आपल्या बालपणातील उत्साह पुन्हा अनुभवला. यासोबतच त्यांनी गाणी गायली, नातवंडांसोबत मनमुराद नृत्य केले आणि विविध मनोरंजक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमातील आणखी एक हृदयस्पर्शी क्षण म्हणजे "एक घास आजीच्या हातचा". आजी-आजोबांनी आपल्या नातवंडांसोबत डबा खात जुन्या आठवणींना उजाळा दिला. नातवंडांना आपल्या हाताने घास भरवताना आजींच्या मायेचा स्पर्श आणि आजोबांचे प्रेम पाहून उपस्थितांच्या डोळ्यांतही आनंदाश्रू तरळले. मुलांनीही आपल्या आजी-आजोबांसोबत मनसोक्त वेळ घालवत या दिवसाचा मनापासून आनंद लुटला. यावेळी शाळेच्या प्राचार्या मंजू जोशी यांनी आजी-आजोबांच्या महत्त्वावर प्रकाश टाकताना सांगितले की, "ज्या मुलांना आजी-आजोबांचे प्रेम, माया आणि संस्कार लाभतात, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण अधिक समृद्ध होते. आजी-आजोबांच्या सहवासातून मुलांना जीवनाचे मौल्यवान धडे मिळतात आणि ती मुले भविष्यात अधिक संवेदनशील, संस्कारी आणि उत्कृष्ट व्यक्ती म्हणून घडतात." या उपक्रमामुळे आजी-आजोबा आणि नातवंडांमधील भावनिक बंध अधिक दृढ झाले.

## 'त्या' स्वीट मार्टचा परवाना होणार रद्द ..

### मुकुटबनमध्ये कारवाई,अन्न व औषध प्रशासनाचा प्रशासनाला निर्देश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. २४ :** मुकुटबन बाजारपेठेतील एका स्वीट मार्टमध्ये अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने अचानक तपासणी केली. यावेळी मिठाई तयार करण्याच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आढळून आली. तसेच मुदत संपलेल्या मैद्याचे पाकीट आणि इतर खाद्यपदार्थ आढळल्याने प्रशासनाने गंभीर दखल घेतली. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित दुकानाची पाहणी करून मिठाई, दूध व तुपाचे नमुने तपासणीसाठी घेतले.



स्वयंपाकघरात अस्वच्छता आढळल्याने संबंधितांकडून समाधानकारक खुलासा घेण्यात आला. तपासणीदरम्यान दुकानातील खाद्यपदार्थ तयार करण्याची जागा, कचरा व मुदत संपलेल्या साहित्याबाबतही अनियमितता निदर्शनास आली. या सर्व बाबींची नोंद करून अधिकाऱ्यांनी संबंधितांवर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू केली. दरम्यान, 'सुरक्षित अन्न, सुरक्षित औषध, सुरक्षित महाराष्ट्र' या मोहिमेअंतर्गत अशा प्रकारच्या तपासण्या सातत्याने सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित स्वीट मार्टचा परवाना रद्द करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आल्याची माहिती अन्न व औषधी अधिकारी डॉ. सचिन नरवाडे यांनी दिली. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडूनही होत आहे.

## झरी-जामणी तालुक्यात पावसाची दमदार हजेरी..! शेतकऱ्यांना दिलासा, मात्र जोरदार पावसाची प्रतीक्षा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. २४ :** गेल्या काही दिवसांपासून पावसाचा लपंडाव सुरू असल्याने झरी-जामणी तालुक्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. तब्बल पंधरा दिवस पावसाने दडी मारल्याने पिकांना पाण्याची गरज भासत होती. काही भागांत तुरळक पाऊस झाला असला, तरी दमदार पावसाची प्रतीक्षा कायम होती.



दरम्यान, शनिवारच्या रात्रीपासून तालुक्यातील बहुतांश भागात पावसाने दमदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. या पावसामुळे सोयाबीन, कापूस तसेच इतर पिकांना तात्पुरता आधार मिळाला असला, तरी जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण होण्यासाठी आणखी चांगल्या पावसाची आवश्यकता असल्याचे शेतकरी सांगत आहेत. तालुक्यातील अनेक शेतांमध्ये सोयाबीन व कापूस पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. काही शेतकऱ्यांनी पहिली खत मात्रा दिली असून, दुसरी खत मात्रा देण्याची तयारी सुरू आहे. तर काही शेतकऱ्यांच्या दोन खत मात्रा पूर्ण झाल्या आहेत. मात्र पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची प्रतीक्षा होती. शनिवारपासून झालेल्या पावसामुळे पिकांना मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. मात्र पावसाचे पाणी जमिनीत खोलवर मुरून पुरेसा ओलावा निर्माण होण्यासाठी पुन्हा जोरदार पावसाची गरज आहे. "पाऊस पडल्याने दिलासा मिळाला आहे; मात्र जमिनीत अजून पुरेसा साठा झालेला नाही. पुन्हा जोरदार पाऊस झाला तर पिकांना मोठा फायदा होईल," अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. पावसामुळे शेतीच्या कामांनाही पुन्हा वेग आला असून, शेतकरी खत व्यवस्थापनासह इतर कामांकडे वळले आहेत. आगामी काळात पावसाने अशीच साथ दिल्यास यंदाचे पीक चांगले येईल, अशी आशा शेतकऱ्यांना आहे.

## पाहिजेत

**संदर्भ:- मा.समाज कल्याण अधिकारी कार्यालय, समाज कल्याण विभाग जि.प. यवतमाळ यांचे पत्र जा.क्र.यजिप/सकव/वर्ग-पूर्व परवानगी/१७२० / यवतमाळ दि. २४/०८/२०२६**

**उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने संजय गांधी स्मारक संस्था दिग्रस व्दारा संचालित, स्व. बकारामजी धुर्वे मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह दिग्रस ता. दिग्रस जि. यवतमाळ येथे वसतीगृह अधिक्षक या पदावर कर्मचारी नियुक्त करावयाचे आहे.**

| अ.क्र. | पद | पदसंख्या | पद प्रकार | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | वसतीगृह अधिक्षक | ०१ | पुर्णवेळ | B. A./B.Com./B.Sc कोणत्याही शाखेचा पदवीधर अथवा BSW | वेतन तथा मानधन शासन नियमाप्रमाणे राहील. |

**तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि. १३ सप्टेंबर २०२६ रोज रविवारला संस्थेचे कार्यालय महेश नगर दिग्रस येथे सकाळी ११ ते २ या वेळेत आपल्या मूळ शैक्षणिक कागदपत्र सह स्वखर्चाने आपण मुलाखतीस प्रत्यक्ष उपस्थित रहावे.**

**अध्यक्ष/सचिव**
**संजय गांधी स्मारक संस्था दिग्रस**

# श्री.छत्रपती संभाजीनगर पाठोपाठ अमरावती विभागात ४११ शेतकऱ्यांनी केल्या आत्महत्या

## राज्यात सहा महिन्यांत १२१६ शेतकरी आत्महत्या

**मुंबई**-महाराष्ट्रातील, विशेषतः मराठवाड्यातील शेतीची स्थिती शेतकरी आत्महत्या चिंताजनक आहे.जानेवारी ते जून या अवघ्या सहा महिन्यांत राज्यात १२१६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यापैकी ४५० शेतकऱ्यांच्या वारसांना सरकारी मदत मिळणार आहे. विशेष म्हणजे, ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर, म्हणजे मे आणि जून महिन्यांत सर्वाधिक आत्महत्या झाल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वाधिक ४६३ आत्महत्या झाल्या असून, एकट्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १०९ शेतकऱ्यांनी जीवन संपविले आहे. यापाठोपाठ अमरावती विभागात ४११ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, या विभागातील यवतमाळ जिल्ह्यातही गंभीर स्थिती आहे.जानेवारी ते जून अखेर यवतमाळमध्ये १४३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांना गेल्या काही वर्षांत हवामान बदल आणि सरकारी धोरणांचा मोठा फटका बसत आहे. गेली सलग दोन वर्षे अतिवृष्टीने शेतकऱ्यांना झोडपले असून, मागील खरीप हंगामात अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीपोटी ३२ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले होते. मात्र या पॅकेजचा किती लाभ शेतकऱ्यांना मिळाला, हा संशोधनाचा विषय आहे. शेतकऱ्यांना पीक नुकसानीची हमखास भरपाई मिळावी, यासाठी आणलेली पंतप्रधान पीकविमा योजना किती पोकळ आहे, हे मिळणाऱ्या भरपाईच्या आकडेवारीवरून समोर आले आहे. तसेच हमखास भरपाई मिळण्यास कारणीभूत ठरणारे निकष (ट्रिगर) काढून टाकत सरकारने कंपन्यांच्या सोईची पीकविमा योजना तयार केल्याने शेतकऱ्यांना भरपाई मिळणे दुरापास्त झाले आहे. परिणामी, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाइतकेही उत्पन्न मिळत नसल्याचे समोर आले आहे. बियाणे, खते आणि कीटकनाशकांमध्ये होणाऱ्या फसवणुकीमुळे, तसेच त्यापोटी भरपाईही मिळत नसल्याने शेतकरी हैराण आहेत. शेतकरी आत्महत्यांच्या सरकारी आकडेवारीवर नजर टाकल्यास खरीप हंगामातील मशागतीच्या आणि लागवडीच्या



काळात सर्वाधिक शेतकऱ्यांनी जीवन संपविल्याचे दिसते. पुणे विभागात ३७ आत्महत्या झाल्या असून, सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक ३३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. नाशिक विभागात १३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, जळगाव जिल्ह्यात ७५ शेतकऱ्यांनी जीवन संपविले आहे.छत्रपती संभाजीनगर विभागातील परिस्थिती गंभीर असून, राज्यातील सर्वाधिक आत्महत्या याच विभागात झाल्या आहेत. विभागात ४६३, तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १०९ शेतकऱ्यांनी सहा महिन्यांत आत्महत्या केल्या आहेत. यामध्ये जानेवारीत २०, फेब्रुवारीत १८, मार्चमध्ये १५, एप्रिलमध्ये १८, मेमध्ये १७, तर जूनमध्ये २१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यापाठोपाठ बीड जिल्ह्यात ९५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यामध्ये जानेवारीत २४, फेब्रुवारीत सहा, मार्चमध्ये १९, एप्रिलमध्ये २४, मेमध्ये १४, तर जूनमध्ये आठ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. धाराशिव जिल्ह्यात ६५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, मार्चमध्ये १६, मेमध्ये १०, तर जूनमध्ये १६ शेतकऱ्यांनी जीवन संपविले आहे. अमरावती विभागात यवतमाळ जिल्ह्यात १४३, अमरावतीत ७६, अकोल्यात ७०, तर बुलडाणा जिल्ह्यात ६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. नागपूर विभागात १६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात ६० शेतकऱ्यांनी जीवन संपविले आहे.

**का थांबत नाही आत्महत्यांचे लोण?**

हवामान बदलामुळे शेतीचे होणारे नुकसान, मातीचा बदललेला पोत, बियाणे, खते व कीटकनाशकांमधील फसवणूक, वाढता उत्पादन खर्च, मजुरांचा तुटवडा आणि वाढती मजुरी, उत्पादनात अपेक्षित वाढ न झाल्याने कर्जाचा वाढता बोजा, मुलांचा वाढता शैक्षणिक खर्च, सणसमारंभ आणि लम्मातील न परवडणारे खर्च तसेच व्यसनाधीनता यामुळे शेतकरी पोखरला जात आहे. सरकारी योजना खऱ्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात कृषी विभागाचे प्रशासन सपशेल अपयशी ठरले आहे. शेतकऱ्यांना लाभ मिळावा, यासाठी आणलेली डीबीटी योजना अधिकाऱ्यांनी आपल्या हातात घेतली आहे. परिणामी, ही योजना एजंटांच्या ताब्यात गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर खर्च होत असल्याचे दिसत असले, तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिती वेगळी आहे.

### पाच जिल्ह्यांतील आकडेवारीने समाधान

गडचिरोली, गडचिरोली, भंडारा, नंदुरबार, पुणे, कोल्हापूर आणि सातारा या जिल्ह्यांत एकाही शेतकऱ्याने आत्महत्या केलेली नाही. त्यामुळे राज्यातील आकडेवारी पाहता या जिल्ह्यांमध्ये आशेचा किरण दिसतो.

### विभागनिहाय शेतकरी आत्महत्या

| | |
|---|---|
| पुणे | ३७ |
| नाशिक | १३८ |
| छत्रपती संभाजीनगर | ४६३ |
| अमरावती | ४११ |
| नागपूर | १६७ |
| एकूण | १२१६ |

### संक्षिप्त

#### स्व.मदनगोपाल मुंधडा महाविद्यालयात आज संस्कृत दिनोत्सव-२०२६

**अमरावती**-संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्र, स्व. मदनगोपाल मुंधडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूर रेल्वे, संस्कृत विभाग व संशोधन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने उद्या २५ ऑगस्ट रोजी दुपारी १२.०० वाजता 'संस्कृत दिनोत्सव-२०२६' चे महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजन करण्यात आले आहे. महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर हे 'महानुभावीय संस्कृत वाङ्मयाचे स्वरूप' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत कारमारे भूषविणार असून अशोक शिक्षण संस्था, अशोकनगर येथील अध्यक्ष श्री सुधीर शेंडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संस्कृत विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी भांदककर तसेच संस्कृत विभाग व संशोधन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.



#### कास्ट्राईब शिक्षक संघटनेची सभा

**अमरावती**-कास्ट्राईब जिल्हा शिक्षक संघटनेची जिल्हास्तरीय सभा गर्ल्स हायस्कूल, अमरावती येथे जिल्हाध्यक्ष राजेश गाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.सभेत विविध तालुक्यांच्या कार्यकारिणी गठीत करणे व बदल, कर्मचारी कल्याण निधी सचिव निवड, नवीन सभासद नोंदणी, पदोन्नतीबाबत निवेदन, शिक्षकांच्या तक्रारींचे निवारण, आगामी शिक्षक मतदारसंघ निवडणुकीत संघटनेचा उमेदवार उभा करणे, रिक्त पदांवर नियुक्त्या तसेच तालुका व जिल्हा मेळावे आणि त्रैमासिक सभा आयोजित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. संघटनेच्या कार्यालयासाठी जागेची मागणी करण्यासह सभासद वाढीसाठी विशेष मोहीम राबविण्याचा निर्णयही घेण्यात आला.यावेळी जिल्हाध्यक्ष राजेश गाडे, सरचिटणीस प्रमोद कडू, एल.जे. वानखेडे, प्रकाश मोहोड, प.ब. इंगळे, कैलास इंगळे, दादाराव भोंगळे, प्रवीण मेहरे, जयकृष्ण खडसें, जितेंद्र फुलझेले, दिलीप गवई, अनिल सरदार, रवी मेश्राम, ओमप्रकाश रामटेके, अनेक जण उपस्थित होते.



#### कर्मयोगी बाप्पूसाहेब देशमुख यांना अभिनव उपक्रमाने अभिवादन

**दर्यापूर**-आपल्या अखंड सेवा व्रताने संपूर्ण देशभर परिचित असलेले नागरवाडी इंद्रभूवनाचे शिल्पकार उत्तमराव अच्युतराव उपाख्य बाप्पूसाहेब देशमुख यांना दर्यापूर तालुक्यातील माहुली (धांडे) येथील गोरक्षण स्थळावर गो पूजन करून भजन संध्या या अभिनव उपक्रमाने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .गोरक्षण संस्थेचे संस्थापकसंचालक प्रा.गजानन भारसाकळे यांनी सुचविलेल्या गो-पूजन भजन संध्या संकल्पनेला प्रतिसाद देत सुप्रसिद्ध जय भवानी भजन मंडळ माहुली (धांडे) यांनी सर्व समावेशक भजनांचे मध्यरात्री पर्यंत सलग सादरीकरण करीत या उपक्रमात भावरंग भरला. मुर्तिजापूर येथे गाडगेबाबांनी स्वतः स्थापन केलेल्या गोरक्षण संस्थेची ज्योत ठेवत ठेवणारे बाप्पूसाहेब तसेच असमर्थ -अनाथ बालकांना नागरवाडी स्थळावर सुशिक्षित व सक्षम घडविण्याची क्रांती करून दाखविणारे बाप्पूसाहेब या कर्मयोगी महापुरुषास अश्याच उपक्रमाने पवित्र अभिवादन होऊ शकते असे प्रतिपादन संस्थेचे सचिव महेश पाटील यांनी व्यक्त केले आहे.या उपक्रमात जय भवानी भजन मंडळ माहुली (धांडे) या मंडळाच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सोहळ्याच्या यशस्वितेसाठी गोरक्षण संस्थेच्या वतीने व्यवस्थापक बाळासाहेब भारसाकळे यांच्या मार्गदर्शनात आशिष ठाकरे, स्वराज इंगळे, विनोद भारसाकळे, वैभव ठाकरे, संतोष गवई, श्रीकृष्ण पोटे, अंकुश घरडे , रोहन फेरन, ज्ञानेश्वर गवई यांनी सहकार्य केले.

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत प्रगती राऊतची झेप

**अंजनसिंगी/ वार्ताहर**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ग्रुप 'बी' २०२५ परीक्षेच्या अंतिम निकालात येथील प्रगती मीरा प्रल्हाद राऊत या तरुणीची सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर या पदावर निवड झाली आहे. १४ ऑगस्टला या परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाला. प्रगतीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तिचे सर्व स्तरांतून मनःपूर्वक अभिनंदन होत आहे.

घरातील अठरा विश्वे दारिद्रय, आई पोलिओग्रस्त व अपंग, वडील विभक्त राहतात, अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत प्रगतीने आपल्या दोन बहिणी-भावासह आईसोबत अंजनसिंगी येथे मामांच्या घरी राहून शिक्षण घेतले. ग्रामीण भागातील वातावरण, स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शनाचा अभाव,कोणतेही खासगी क्लासेस नसणे आणि आर्थिक अडचणी या सर्व आव्हानांवर तिने आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी आणि स्व-अभ्यासाच्या जोरावर मात केली.

प्रगतीचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद कन्या हायस्कूल, चांदूर रेल्वे येथे झाले. त्यानंतर इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण कान्होजी बाबा विद्यालय, अंजनसिंगी येथे झाले. पुढे तिने शिवाजी सायन्स कॉलेज, अमरावती येथून बी.एस्सी.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षणानंतर स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून आपले शासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार केला होतो.

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी**

अंजनसिंगी येथील राष्ट्रपिता महात्मा फुले अभ्यासिकेत गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने अभ्यास करत तिने परीक्षेची तयारी केली. कोणतेही मोठे आर्थिक पाठबळ किंवा बाह्य मार्गदर्शन नसताना केवळ स्वतःच्या मेहनतीवर मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी



निश्चितच प्रेरणादायी आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द, मेहनत, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावर यश मिळवता येत असल्याचे तिने दाखवून केले आहे

## अचलपूर शहरात कावड यात्रेला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अचलपूर/ वार्ताहर**

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा श्री शीतला माता ग्रुप बुंदेलपुरा अचलपूरच्या वतीने शहराच्या मध्य भागातून भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते .कुरळ पूर्णा येथून पूर्णा नदीचे पाणी कावडमध्ये भरून ते अमीनाथ संस्थान जीवनपुरा येथील महादेवाच्या पिंडीवर अभिषेक करण्यात आले. अनेक शिवभक्त कुरळ (पूर्णा) येथून पायी चालत बुंदेलपुरा, देवडी, आकबरी चौक, बडी संगत, माळवेशपुरा, जीवनपुरा गेट होत अमिनाथ संस्थानपर्यंत भव्य



कावड यात्रा आयोजित करण्यात आली होती.यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणात महिला सुद्धा सहभागी झाल्या.यावेळी भाविक - भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अचलपूर तालुक्यात पावसाने फिरवली पाठ

**अचलपूर/ वार्ताहर**

मागील महिन्यात झालेल्या पावसामुळे पिकांना संजीवनी मिळाली आणि पिकांना उभारी आली. मात्र आता पुन्हा पावसाने खंड दिल्यामुळे अचलपूर तालुक्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सद्यास्थितीत कपासीसह, सोयाबीन, तुर आदी पिकांना पावसाची गरज असताना तब्बल १० ते १२ दिवसांपासून पावसाने दांडी मारली आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा लागली आहे.

मान्सूनच्या पावसात पिके उभी तर झाली, मात्र आता पावसाच्या खंडामुळे पिकांवर मान खाली घालण्याची वेळ आली आहे. सोबतच विविध संकटे पिकांवर येऊ लागली आहे. कापूस, सोयाबीन, तूर, मुंग पिकांवर उत्पादन खर्च महागलेला असतांना दुसरीकडे किडींचे अस्तित्व कायम राहत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.यावर्षीच्या खरीप हंगामात सर्वत्र पिकांवरील किडींचा प्राणघातक हमला वाढत असल्याने पिकांचे एकरी उत्पन्न घटण्याची शक्यता आहे. शिवाय सुरुवातीस एल निनोच्या संकटामुळे पावसाला तब्बल १२ दिवसांपासून खंड दिला आहे. सुरुवातीस खरीप हंगामातील पेरणी ही जून अखेर सुरू झाली. म्हणजे जवळपास मृग नक्षत्र संपवून आर्द्रा नक्षत्र वाहन गाढव मध्ये पेरणी करायला सुरुवात झाली. तसेच पेरणी करून नुकतेच १० दिवसांचा पावसाचा खंड हा १४ दिवसांचा झाला. त्यामुळे बीज उगवण क्षमता कमी झाली, अनेकांना दुबार पेरणी करावी लागली. पावसाचा खंड वाढत असल्याने पिकाची उंची वाढली नसून पिकांवर रसशोषक किडींचा, पाने खाणारी अळी यांच्या प्रादुर्भाव झाला. फवारणी करून सुद्धा पिकांवर रोगराई वाढतच गेली, त्यामुळे कमी दिवसात पीके ही रोगांना बळी पडायला लागली आहे. कपाशी २ फुटाची असताना त्याला पाती फुल झाली आहे. बोंड दिसायला लागली. पावसाने दांडी मारल्याने शेतकऱ्यांनी सुद्धा फवारणी नियोजन थांबविले आहे. सप्टेंबर महिन्यात सुद्धा अशीच स्थिती कायम राहली तर खरीपाला नुकसानीला सामोरे जावे लागले आणि येणाऱ्या रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना पुन्हा कर्जबाजारी व्हावे लागेल, अशी भीती निर्माण झाली आहे.

ढगाळ वातावरणामुळे किडींचा सर्वदूर हल्ला होत आहे. तणनाशक फार कमी प्रमाणात फवारणी केले गेले. यासह सर्वच उपाय केले असताना मात्र निसर्ग कोपलाय. त्यामुळे पिकांची अवस्था फार दयनीय दिसत आहे. पिकांची जैवविविधता टिकवणे फार मोठी जोखीम झालेली आहे.

**किशोर बद्रीये, शेतकरी, हरम**

कापूस पिकात फुलगळ होणे हे प्रामुख्याने पाण्याचा ताण, अन्नद्रव्यांची कमतरता, तापमानातील चढ-उतार, रसशोषक किडी आणि वाढीचा असमतोल यामुळे दिसून येते. माती परीक्षण, पिकाची अवस्था, पाण्याची उपलब्धता आणि किडींचा प्रादुर्भाव यानुसार उपाययोजना केल्यास अधिक चांगला परिणाम मिळतो.

**अक्षय क्षीरसागर, तालुका कृषी अधिकारी,अचलपूर.**

पावसाने अशीच यापुढे दांडी मारल्यास शेतकऱ्याला विविध समस्यांचा सामना करावा लागणार आहे.कोरडवाहू शेतकऱ्यांना पिकांच्या उत्पादनात घट होऊन आर्थिक फटका बसू शकतो .

**अंकुश घुलक्षे,** शेतकरी,खानापूर, तट्टेनगर

## हव्याप्र मंडळाच्या जलतरणपटूंनी पटकाविले दुहेरी सुवर्ण यश

### मुले व मुलींचे दुहेरी अजिंक्यपद; पुणे उपविजेते, रायगड तृतीय



**अमरावती/ का.प्र.**

तब्बल १४ वर्षांनी तीन दिवस रंगलेल्या ५२ व्या ज्युनिअर राज्यस्तरीय वॉटर पोलो चॅम्पियनशिप २०२६ मध्ये यजमान अमरावतीच्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरणपटूंनी दणदणीत कामगिरी करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. मंडळाच्या मुलांच्या तसेच मुलींच्या संघांनी उत्कृष्ट सांघिक खेळ, वेग आणि कौशल्याच्या बळावर प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करून दुहेरी अजिंक्यपद पटकावले. अंतिम सामन्यातील रोमहर्षक विजयासह जलतरण विभागात आणि उपस्थित प्रेक्षकांमध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले.

महाराष्ट्र जलतरण संघटना, अमरावती जलतरण संघटना आणि श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने २१ ते २३ ऑगस्टदरम्यान मंडळाच्या जलतरण विभागात या प्रतिष्ठेच्या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध भागांतील मुलांचे ९ आणि मुलींचे ७ संघ सहभागी झाले होते.श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरणपटूंनी आपल्या घरच्या तलावावर मंडळातून मिळालेल्या दर्जेदार प्रशिक्षणाचे दर्शन घडविले. पुणे आणि रायगडसारख्या बलाढ्य संघांशी झालेल्या लढतींमध्ये मंडळाच्या खेळाडूंनी कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर मोहोर उमटविली. पुणे संघाने द्वितीय, तर रायगड संघाने तृतीय क्रमांक पटकावला.

मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही संघांच्या विजयाने हा क्षण अमरावतीच्या क्रीडा इतिहासातील संस्मरणीय ठरला.अंतिम सामन्यादरम्यान मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण समारंभ पार पडला. महाराष्ट्र जलतरण संघटनेचे सचिव राजेंद्र पालकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपवनसंरक्षक, प्रादेशिक, अमरावती अर्जुना के. आर, टाइम्स ऑफ इंडियाचे ज्येष्ठ जिल्हा प्रतिनिधी अनिल जाधव, किशोर वैद्य, टॉमी जोशी, डॉ. लक्ष्मीकांत खंडागडे तसेच जलतरण विभागाचे प्रमुख डॉ. योगेश निर्मळ आदी मान्यवर उपस्थित होते.

### 'माझा प्रभाग, माझी जबाबदारी!'

## नगरसेविकेने हातात घेतली स्वच्छतेचा धुरा

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

प्रभागातील वाढलेले झाडे-झुडपे आणि गाजर गवतामुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन स्थानिक नगरपरिषद आरोग्य विभागाला वारंवार सूचना करूनही अपेक्षित कार्यवाही न झाल्याने 'माझा प्रभाग, माझी जबाबदारी' या भावनेतून नगरसेविका ॲड. कीर्ती राहुल इमले यांनी स्वतः पुढाकार घेतला आहे.



प्रभाग क्रमांक ३ मध्ये स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या झाडे-झुडपे तसेच गाजर गवत कापण्याची विशेष मोहीम नगरसेविका ॲड. कीर्ती इमले आणि त्यांच्या मित्रपरिवाराच्या सहकार्याने सुरू करण्यात आली. नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देत परिसर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नगरपरिषद प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कामाला विलंब होत असल्याचे लक्षात आल्यानंतर केवळ तक्रारी न करता 'स्वच्छता हीच सेवा' या विचारातून स्वतः मैदानात उतरून काम करण्याचा निर्णय ॲड. कीर्ती इमले यांनी घेतला. त्यांच्या या उपक्रमाचे प्रभागातील नागरिकांकडून कौतुक होत असून, लोकप्रतिनिधीने नागरिकांच्या प्रश्नांसाठी प्रत्यक्ष कृतीतून पुढाकार घेण्याचा आदर्श त्यांनी निर्माण केला आहे. प्रभागातील नागरिकांना स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण मिळणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. प्रशासनाने आपले काम करावेच; मात्र त्यासाठी नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड होऊ नये, म्हणून आपणही पुढाकार घेतला पाहिजे,' अशी भावना नगरसेविका ॲड. कीर्ती राहुल इमले यांनी व्यक्त केली. या मोहिमेमुळे प्रभाग क्रमांक ३ मधील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, स्वच्छतेचा संदेश कृतीतून देणाऱ्या या उपक्रमाची शहरात चर्चा होत आहे.



प्रभाग क्रमांक ३ मध्ये झाडे-झुडपे कापण्याची विशेष मोहीम

# शासनाने जागे व्हावे



अमरावतीचे जिल्हा स्त्री रुग्णालय, त्यातला अतिदक्षता विभाग आणि त्याच्याही आत असलेल्या व्हेंटिलेटरचा स्फोट होऊन आग लागते व त्या आगीत तीन नवजात शिशु होरपळून मरतात. हा एक अपघात नसून गंभीर स्वरूपाचा निष्काळजीपणाचा फौजदारी गुन्हा आहे. या प्रकरणाची चौकशी होऊन अधिक माहिती प्रकाशात येईलच. परंतु तशी माहिती उघड होण्यासाठी शासनाने अधिक गंभीर होणे आवश्यक आहे. जिल्हा स्त्री रुग्णालयातील अनेक गैरप्रकारांची व त्यामुळे होणाऱ्या रुग्णांच्या गैरसोयीची व कधी कधी जीवहानीची देखील माहिती मिळत असते. एकूणच सरकारी आरोग्य व्यवस्था चिंताजनक वाटते.

व्हेंटिलेटरची खरेदी कोणाच्या आदेशाने, कुठून झाली व त्याचा दर्जा काय होता, हे देखील तपासात निष्पन्न व्हावे.

२०२९ पूर्वीच संसदेत २/३ बहुमत व्हावे म्हणून पक्षफोडीसाठी रात्र रात्र हुडी घालून फिरावे लागल्यामुळे मुख्यमंत्र्यांना फायलींवर सह्या करताना दिवसा थोडी गुंगी येऊन काही सह्या अनवधानाने होत असाव्या. शिवाय राहुल गांधींना प्रत्युत्तर देण्यासाठी वेगळाच व्यायाम करावा लागतो. त्या नादात राज्याच्या शिक्षण व आरोग्य व्यवस्थांकडे लक्ष पुरविण्यासाठी त्यांना वेळ मिळत नसावा. परंतु आतातरी शासनाने खडबडून जागे होणे आवश्यक आहे.

जनतेच्या मुलभूत सोयी व सुविधांकडे शासन प्रशासनाने प्रामाणिकपणे लक्ष देऊन आपले कर्तव्य पार पाडले तर २/३ बहुमत तसेही मिळू शकते. त्यासाठी फोडाफोडीच्या कसरती करण्याची गरज नसते. शिवाय राहुल गांधींकडे पूर्ण दुर्लक्षही करता येते. पण जनहिताची प्रामाणिक तळमळ असेल तरच हे शक्य आहे. अजूनही वेळ गेलेली नाही.देवाभाऊ म्हणून स्वतःची प्रतिमा ठसविण्याचा प्रयत्न करण्याचीही गरज नाही. बहुजन समाज ब्राम्हणांना नेता म्हणून स्वीकारत नाही, अश्या गैरसमजातून जर हा प्रयत्न होत असेल तर ते चूक आहे. १९४८ साली गांधीजींची हत्या झाल्यानंतर अवघ्या काही वर्षातच महाराष्ट्रातल्या बहुजन समाजाने एस.एम.जोशी आणि कॉमरेड डांगे यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्राचा लढा दिला. त्या नेत्यांना ब्राम्हण म्हणून हिणवले गेले नाही. १९८० च्या दशकात इथल्याच बहुजन समाजाने शरद जोशींना शेतकरी नेता म्हणून डोक्यावर घेतले. नि:स्वार्थ बुद्धीने समाजासाठी काम करणाऱ्याची जात समाज पाहत नसतो. कधीकाळी काही ब्राम्हणांनी इतरांचा छळ केला म्हणून आता तशी परिस्थिती नसताना ब्राम्हणांचा का छळ व्हावा, असे अनेक हिंदुत्ववादी तळमळीने विचारतात. त्याच क्षणी ते हे विसरतात की कधीकाळी हिंदूंचा छळ करणाऱ्या मुसलमानांच्या वंशजांना आपण आता का शिक्षा देऊ इच्छितो ?

प्रश्न विचारणाऱ्या लोकांच्या हेतूवर शंका घेणे आणि त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविणे बंद करून भाजप व त्यांच्या पाठीराख्यांनी प्रश्नांना विचारपूर्वक उत्तर देणे देखील गरजेचे आहे. उदाहरणार्थ प्राचीन धर्मग्रंथांबद्दल खरोखर मनातून श्रद्धा असेल तर त्या धर्मग्रंथांचे समर्थन वैचारिक ताकदीने करता आले पाहिजे. मुसलमानांच्या धर्मग्रंथांबद्दल तुम्ही का बोलत नाही, असा प्रश्न हिंदूंनाच विचारून उपयोग नसतो. मनुस्मृतीतील स्त्री शूद्रांविषयी असलेल्या उपदेशाचे आपण समर्थन करू शकतो का, निदान ज्या काळी तो ग्रंथ लिहिल्या गेला त्याकाळी तरी तो उपदेश समर्थनीय होता का, यावर विचार करून स्पष्टपणे धर्मग्रंथांमधला कोणता भाग आता त्याज्य वाटतो आणि कोणता भाग आजही समर्थनीय वाटतो यावर प्रगट विमर्श होणे आवश्यक आहे. कोणाचे म्हणणे मतदारांना पटते ते निवडणुकीत दिसेलच. परंतु मनुस्मृती जाळणे ही डॉ. आंबेडकरांची चूक होती असे जर मनोमन वाटत असेल तर सकारण तसे स्पष्ट करावे. हिंदू-मुस्लीम राजकारणाचे दिवस लवकरच संपणार आहेत. त्यामुळे आपापली विचारसरणी पारदर्शकपणे व प्रामाणिकपणे मांडणे आणि त्यानुसार आचरण करणे भाग पडणार आहे. बदलत्या काळाची दखल दिल्लीश्वर घेतील की नाही ते ठाऊक नाही. परंतु आपले मुख्यमंत्री जेव्हा विरोधी पक्षनेता होते, तेव्हा त्यांना एक अभ्यासू व बुद्धिमान पुढारी म्हणून महाराष्ट्र ओळखत असे. त्याच पदावर परतण्याची इच्छा नसेल तर मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातल्या शिक्षण, आरोग्य, आदिवासी वनजमिनी, पर्यावरण, शहरी नियोजन व वाहतूक, सिंचन, शेती अश्या विभागांकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रशासनाकडून जनतेची कामे (फक्त बिल्डरांची नव्हे) केली जातील याची दक्षता घ्यावी.

**किशोर देशपांडे**




# माझी अमरावती

'खरंच, आज माझी अमरावती माझी राहिली आहे का?' असा प्रश्न आज पडतो. अमरावती शहरावर असलेल्या अपार प्रेमापोटी लाखो रुपयांच्या नोकऱ्या सोडून, काहीही करून अमरावतीमध्येच राहण्याची जिद्द बाळगणारे माझ्यासारखे तरुण आज खूप मोठ्या संभ्रमाचे शिकार होत आहेत. एकेकाळी सुसंस्कृत, स्वच्छ आणि सुंदर असलेले माझे शहर आज का बरे असे झाले असावे? आम्ही लहानपणी जी अमरावती अनुभवली आणि जगली, ती आता येणाऱ्या पिढ्यांना बघायला मिळणार का? तो मोकळा श्वास आम्हाला परत घेता येईल का? हा गंभीर प्रश्न कुणालाच पडू नये का?

लिहायला गेलो तर अनेक गोष्टी आहेत, पण या लेखातून मोजके ५ मुद्दे मांडावेसे वाटतात:

**१. रस्त्यांचे रुंदीकरण की अतिक्रमणाला आमंत्रण?**

आधी अमरावतीचे रस्ते रुंदीने कमी होते, पण ते मोठ्या हिरव्यागार झाडांनी झाकलेले होते. आज ती झाडे तोडून आपल्याला मोठमोठाले रस्ते मिळाले, जेणेकरून भविष्यात ट्रॅफिकची समस्या होऊ नये. पण खरोखर ते रस्ते किंवा फुटपाथ लोकोपयोगी आहेत का, हा प्रश्न कोणत्याच नागरिकाला पडू नये म्हणजे नवलच! प्रशासन असो किंवा लोकप्रतिनिधी वाढलेल्या अतिक्रमणाला नेमका पाठिंबा तरी कुणाचा असावा, हा प्रश्न आमच्यासारख्या सामान्य नागरिकांना पडू नये का?

छोटेसे उदाहरण द्यायचे तर, आधी पंचवटी ते नवसारी असा एक सुंदर रस्ता होता. संपूर्ण रस्ता कडुनिंबाच्या झाडांनी झाकलेला आणि छान सावली देणारा होता. पण विकासकामांकरिता ही सर्व झाडे तोडण्यात आली. तिथे छान मोठा रस्ता आणि फुटपाथ बांधण्यात आले. परंतु, या फुटपाथचा आज १००% उपयोग फक्त अतिक्रमण करून अपघाताला निमंत्रण देणाऱ्या लोकांनीच केला आहे. फुटपाथवर हॉटेल्स थाटली गेली आहेत, अर्ध्या रस्त्यावर बसण्याची व्यवस्था केली आहे आणि ग्राहकांच्या गाड्यांच्या पार्किंगसाठी पूर्ण एक लेन वापरली जाते. शेवटी झाले असे की, झाडे असताना जितका रस्ता शिल्लक होता, आजसुद्धा तितकाच रस्ता वापरात आहे. म्हणजेच, शासनाने झाडे तोडून उष्णतेला आमंत्रण दिले, रस्ता मोठा करून अतिक्रमणाला आमंत्रण दिले आणि अतिक्रमण करणाऱ्यांनी अपघाताला आमंत्रण दिले. नेमके यातून साध्य तरी काय झाले, हेच कुणाला समजलेले नाही.

**२. मध्यवर्ती भागातील अस्वच्छता आणि प्रशासनाचे दुर्लक्ष**


इतकेच काय कमी होते, तर दुसरे उदाहरण देतो. चक्क महानगरपालिकेच्या मुख्य दरवाजासमोर आणि सिटी कोतवालीपुढील पुलाखाली गेल्या कित्येक वर्षांपासून काही लोकांचा



घाणेरडा प्रकार सुरू आहे, हे संपूर्ण शहरातील नागरिकांनी पाहिले आहे. महिन्यातून १-२ वेळा त्यांना तेथून हटवले जाते, पण कधीच यावर कायमस्वरूपी किंवा निर्णायक कारवाई होताना दिसत नाही. शहराच्या इतक्या महत्त्वाच्या मध्यवर्ती भागात जर अशी घाण करणाऱ्यांवर कारवाई होत नसेल, तर याला जबाबदार नेमके कोण? पुलाखाली चक्क काही लोकांनी संसार मांडला आहे; तिथेच झोपणे, जेवणे, स्वयंपाक करणे आणि शौचाससुद्धा तिथेच बसणे सुरू असते. एकाही लोकप्रतिनिधीने यावर तोडगा काढू नये म्हणजे नवलच! असा कारभार पाहून युवा वर्गाने शहरातून मेट्रो शहरांकडे स्थलांतरित का होऊ नये?

**३. कोलमडलेली वाहतूक व्यवस्था**

तिसरे उदाहरण घेऊया शहरातील ट्रॅफिक व्यवस्थेचे. मान्य आहे की रेल्वे पूल बंद आहे, पण तरीही आज जी ट्रॅफिकची दुरवस्था झाली आहे, त्याकडे कुणाचेच लक्ष नाही. शेगाव नाक्यावर चक्क २-३ वेळा सिग्नल सुटेपर्यंत लोकांना थांबावे लागते. कारण



तिथे असलेल्या दारूच्या दुकानात येणारे लोक सर्रास गुंडागर्दी करत रॉंग साईडने येतात आणि अपघाताला निमंत्रण देतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात ५-१० ट्रॅफिक कर्मचारी फक्त चलनाचे फोटो काढण्यासाठी उभे असतात, पण थोडे पुढे गेले की कॉटन मार्केट चौकात दिवसातून कितीतरी वेळा ट्रॅफिक जाम होतो, याकडे मात्र कुणीच लक्ष देत नाही.

**४. स्वच्छतेचा वाजलेला 'तीन-तेरा'**

चौथा मुद्दा म्हणजे स्वच्छता! शहराच्या स्वच्छतेचा जो 'तीन-तेरा' वाजला आहे, त्यावर काय लिहावे!? शहरात प्रवेश करणारे कुठलेही मार्ग असोत किंवा शहरातील कुठलाही मुख्य रस्ता असो—जिथे आज कचऱ्याचे ढिगारे नाहीत, असे एकही ठिकाण उरलेले नाही. या सर्वांना जबाबदार नेमके कोण? लोकप्रतिनिधी आणि प्रशासन नेमके करत तरी काय आहेत? अतिक्रमण करणारेसुद्धा स्वच्छता खराब होण्याला फार मोठे कारणीभूत आहेत, हेही तितकेच खरे. 'माझे शहर स्वच्छ आणि सुंदर कधी होणार?' हा प्रश्न आपण सर्व नागरिक - प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना नेमके कधी विचारणार आहोत?

**५. अल्पवयीन मुलांमधील गुन्हेगारी आणि 'छपरी' टोळ्या**

पाचवा मुद्दा म्हणजे शहरात वाढत चाललेल्या 'छपरी' मुलांच्या टोळ्या! एकेकाळी सुसंस्कृतपणासाठी ओळखल्या जाणाऱ्या आपल्या अमरावती शहराला आज अल्पवयीन मुलांच्या खून-खराब्यासाठी ओळखले जाऊ लागले आहे, याहून अधिक दुर्भाग्य ते काय?

कुठून तयार होत आहेत या अशा अल्पवयीन मुलांच्या छपरी टोळ्या? यावर पोलीस प्रशासन, पालक आणि लोकप्रतिनिधी यांनी लक्ष देणे गरजेचे नाही का? अशा टोळ्यांना काही मूर्ख राजकीय लोक स्वतःच्या फायद्यासाठी पाठबळ देतात आणि शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढवून ठेवतात. शहरामध्ये 'मी या कंपनीचा आहे, त्या कंपनीचा आहे' असे सांगणाऱ्या अल्पवयीन मुलांची संख्या आज प्रचंड वाढली आहे. ही 'कंपनी' म्हणजे कुठली कॉर्पोरेट कंपनी नसून, यांची छपरी गँग आहे! आपले मूल कुठे जाते, काय करते, यावर पालकांचे लक्ष असणे ही आज काळाची गरज दिसतात; याला फक्त तो पानठेला चालक नाही, तर पालकवर्गही तितकाच जबाबदार आहे. अशा बेकायदेशीर अमली पदार्थ विकणाऱ्यांवर पोलीस प्रशासन कारवाई करत आहे, ही एक सकारात्मक गोष्ट शहरात नक्कीच घडत आहे. परंतु, ही अशी 'छपरीगिरी' आपल्या शहरात थांबण्यासाठी सर्व पालकवर्ग, मोठे राजकीय नेते आणि पोलीस प्रशासनाने पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे, असे माझे स्पष्ट मत आहे.

एक सामान्य नागरिक म्हणून आपण जबाबदारीने वागतोच, पण शहरात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी लोकप्रतिनिधींना पुढाकार घ्यायला लावणे ही आजच्या काळाची गरज आहे. आपण सर्वजण मिळून, आपापल्या प्रयत्नांनी



बनली आहे. पण सत्य परिस्थिती ही आहे की 'सॉफ्ट पॅरेंटिंग'च्या नावाखाली पूर्ण पिढी उद्ध्वस्त होत आहे. आजकाल उघड्यावर पानठेल्यावर बिड्या-सिगारेट पिताना अल्पवयीन मुले-मुली आपली तीच जुनी, सुसंस्कृत आणि स्वच्छ अमरावती पुन्हा नक्की घडवू, हीच आशा आणि अपेक्षा!

**- विराज विजयराव देशमुख**

## त-ड-का

### भाग्यवान?

धुम्रपान शौकीन
भाग्यवान असे
वार्धक्य त्याच्या
भौ,पदरी नसे..!

छातीचे खोके
खिळखिळ होई
तरुणपणातच -
तो वरती जाई..!



**प्रा. अशोक सारडा, मेहकर**
मो.९४२१३९४३३९

# शाळा टिकविण्यासाठी गावानेच घ्यावा पुढाकार

**सरकारी शाळा मृत होणे म्हणजे गावाच्या संस्कृतीचा एक भाग नष्ट होणे आहे. शाळा वाचविण्याची, टिकविण्याची आणि वाढविण्याची जबाबदारी गावाने घ्यायला हवी. गावातल्या प्रत्येक नागरिकाची शाळेकडे लक्ष देण्याची जबाबदारी आहे. गावाने शिक्षण ताब्यात घेण्याचे प्रयोग सुरू व्हायला हवेत. 'कर के देखो: नक्की बदल होईल. 'आमचे गाव आमची शाळा' हे गावाचे ब्रीद असायला हवे.**

कोट्यवधी रुपये खर्च करून सरकारी भव्य 'मॉडेल स्कूल' उभारली जातात. अशा स्कूल आणि इतर योजनांमधून शिक्षण खात्याने किती प्रगती केली आहे, याचे मनमोहक चित्र उभे केले जाते. मुले मात्र फी देऊन खासगी शाळेत शिकायला जातात. 'मॉडेल स्कूल गावाला मुले शिकायला दुसऱ्या गावाला' ही स्थिती बदलायला नको का?

काही स्वयं अर्थसाह्या शाळेविषयी मुलांनाच काय तर पालकांनाही भीती वाटावी, दबाव यावा अशी परिस्थिती असते. जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये जे पारिवारिक नाते असते ते या शाळांच्या मध्ये नसते. जिल्हा परिषद शाळा हीच खरी आपल्या गावची शाळा आहे. त्या शाळेवर आपला हक्क चालतो. ती जीवन शिक्षण देणारी शाळा असते. ती सर्व जातीधर्माच्या, गरीब-श्रीमंतांच्या मुलांना सामावून घेते. एकत्र जगायला शिकवते. भेदभाव विसरून समता निर्माण करते. खरे तर सर्व जातीधर्माच्या गरीब श्रीमंतांच्या अगदी राष्ट्रपती, पंतप्रधान असो मजूर असो की स्वच्छता कामगार असो सगळ्यांच्या मुलांसाठी एकच प्रकारची शाळा असायला हवी. ही सर्व स्तरातील मुले एकत्र बसून शिकायला हवीत. सर्वांना सारखे शिक्षण मिळायला हवे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता है फक्त म्हणण्यापुरते न राहता शाळेत मिळणाऱ्या शिक्षणातून दिसायला हवे. शाळांमध्येच भेदभाव आहेत. ते आपोआपच मुलांत, पालकांत रुजतात. प्रतिष्ठेचा प्रश्न येतो. एकमेकांना समजून घेणे, एकमेकांच्या बरोबर राहणे, एकमेकांना बरोबर घेऊन जाणे, एकमेकावर प्रेम करणे हे शाळांमध्ये घडायला हवे. सद्यःस्थितीत विविध प्रकारच्या शाळांत दिले जाणारे शिक्षण समाजातील विविध घटका नकळत दरी निर्माण करण्याचे काम करते.

बीड आणि धाराशिव जिल्ह्यांतल्या काही जिल्हा परिषद शाळांतील मुलांनी 'आम्हाला शिक्षक द्या' म्हणून आंदोलन केले. राजस्थान, उत्तर प्रदेशातही सरकारी शाळांमधील मुलांनी शिक्षक मागणीसाठी आंदोलन केले.'शिक्षण आमच्या हक्काचे आहे. आम्हाला शिक्षक का देत नाही?' म्हणून शाळकरी मुले जाब विचारू लागली आहेत. शाळेत शिकवायला शिक्षक नाहीत म्हणून विद्यार्थ्यांना आंदोलने करावी लागतात ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना आपल्या हक्काची जाणीव आहे, ही गोष्ट आशादायक आहे.

आपल्या गावच्या जिल्हा परिषदेच्या शाळेला आपण मरू द्यायचे का? आपल्या घरचा माणूस मरत असताना आपण उघड्या डोळ्यांनी बघत नाही. मृत्यू अटळ असला तरीही त्याला वाचवण्याची धडपड करतोच. आपल्या गावची शाळाही आजारी आहे. ही शाळा आपली मातृशाळा. मेलेली आई पुन्हा मागून मिळत नाही तसंच एकदा शाळा मेली, की मग पुन्हा गावाला शाळा नाही. पूर्वी खडूफळा योजने अंतर्गत प्रत्येक छोट्या शाळेला किमान दोन शिक्षक दिले जायचे. सध्या कित्येक शाळा एक शिक्षकी आहेत, तर एकही शिक्षक नसणाऱ्याही बाळा आहेत. या स्थितीत समूहशाळांचे वारे वाहू लागले आहे. सरकार म्हणतं आम्ही शाळा बंद करत नाही शाळा एकत्र करतोय. नुसते शब्दांचे खेळ आसपासच्या गावच्या शाळेतील



मुले एका शाळेत बसल्यानंतर इतर शाळा बंद होणार नाहीत तर काय? बंद पडलेल्या शाळांच्या भौतिक सुविधांसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले, त्याचे काय? तो पैसाही जनतेचाच होता ना? या शाळेच्या जागेवर होतील दुकान गाळे, नाहीतर जनावरांचे दवाखाने. किंवा खासगी शाळाच म्हणतील, इमारत रिकामीच पडली आहे. आमची शाळा भरवतो तिथे वाटल्यास भाडे देतो. मुंबईसारख्या शहरांमध्ये अशा शाळांच्या जागांवरती आणि इमारतीवरती डोळा ठेवला जातो.

हक्काची शाळा बंद पडली, तर उद्या खासगी शाळा म्हणतील तेवढी फी द्यावी लागेल. खासगीकरण झाले, की कशाचाच भरवसा देता येत नाही. म्हणून सरकारी शाळा सक्षम करणे हाच उपाय आहे. सरकारी शाळा असताना इतर शाळेत जाणे म्हणजे स्वतःचे घर असताना भाड्याच्या घरात राहण्यासारखा हा प्रकार नाही का? आपले घर स्वच्छ, नीटनेटके, देखणे ठेवून आपल्याच घरात राहूया.

काही खासगी शाळा लाखो रुपये फी घेतात. गावातील शंभर मुले अशी फी देत असतील तर वर्षभरासाठी पालक एक कोटी रुपये देतात. या शाळेतील शिक्षकांना पगारही तुटपुंजाच असतो. एवढ्या पैशांमध्ये गाव किती शिक्षकांना नेमू शकेल? गावात सरकारी शाळा असताना मुले पिवळ्या गाडीत बसून शेजारच्या गावी शाळेला जातात. गाडी गावभर फिरते. हे गाव, ते गाव करत शाळेत पोहोचते. शाळा सुटल्यावरही तोच गत असते. काय होत असेल लेकरांचे ?

**गाव करेल ते राव करेल काय।**

सरकारी शाळा चांगल्या नाहीत, असा अपप्रचार शाळा चांगली तर ती आपणच चांगली करायला हवी. करून त्यांना बदनाम केले गेले. आणि नसेलच एखादी काही शिक्षक काम न करणारे, शिकविण्याकडे दुर्लक्ष करणारे आहेत. त्यांना काम करायला लावणे ही नेमणूक देणाऱ्यांची जबाबदारी आहे. ते जर त्यांची जबाबदारी पेलत नसतील तर शाळा व्यवस्थापन समिती आणि गावाला ती जबाबदारी घ्यावी लागेल.

शिक्षकांना या गावात नाही तर दुसऱ्या गावात नोकरी मिळेल. या वर्षी शिकवणारे शिक्षक पुढच्या वर्षी नसतील. पण गावची मुले तर शिकत राहणारच आहेत. ज्या वेळी गाव शिक्षणाकडे गांभीयनि आणि जबाबदारीने बघेल त्यावेळी सरकारी शाळा चांगल्या चालतील. गाव म्हटले की राजकारण असते. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षाच्या निवडीपासून ते शाळेतील मुले खासगी शाळेत घालण्यापर्यंत एकमेकांवर कुरघोड्या केल्या जातात. मुलांच्या शिक्षणाच्या हिताचा विचार करून है सगळे बाजूला ठेवावे लागेल. गावातील नेते, युवक, तरुण मंडळे, बचत गट, महिला मंडळे यांनी बाकी सर्व मुद्दे बाजूला ठेवत जिल्हा परिषद शाळा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण या एका मुद्द्यावर एकजूट दाखवायला हवी त्यातूनही सरकार ऐकत नसेल, तर 'आपल्या गावामध्य आपण सरकार आहे. गाव करील ते राव करील काय?' हे ध्यानात घ्यावे लागेल. गावाने एकी दाखवून शिक्षण ताब्यात घ्यायला पाहिजे. अन्यथा स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतल्यासारखे आहे. शिक्षकांपुये अडचणींचा डोंगर आहे. त्यांना जिथे अडचण आहे तिथे ती सोडविण्यासाठी वाने पुढाकार घेतला पाहिजे.

या कामात शिक्षक संघटनांनी ही पुढाकार घ्यायला हवा. शिक्षक संघटना शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी जेक्व्या आक्रमक होतात तेवडे जिल्हा परिषदांच्या शाळांची गुणवत्ता वाढवण्यासाठी, शाळा टिकवण्यासाठी आक्रमक होताना दिसत नाहीत. शिक्षक संघटनांनी बँकेच्या निवडणुका, संघटनांची अधिवेशने आणि नोकरीत मिळणारे लाभ या पलीकडे जाऊन व्यापक दृष्टीने या गोष्टीचा विचार करायला हवा. शाळाच मृत झाल्या तर नजीकच्या काळात शिक्षकांची पदे जादा झाल्यामुळे शिक्षकांना इतर विभागात नोकरी करावी लागेल. भविष्यात शिक्षक एसटीत तिकीट फाडण्याचे, सरकारी दवाखान्यात केस पेपर तयार करण्याचे काम करताना दिसल्यास नवल वाटायला नको. आज अशैक्षणिक कामाच्या नावाने ओरड करणा-यांना भविष्यात शाळाच शिल्लक नसल्याने कामच उरणार नाही.

**कर के देखो**

म्हातारी मेल्याचे दुःख आहेच आणि काळही सोकावत चालला आहे. सरकारी शाळा मृत होणं म्हणजे गावाच्या संस्कृतीचा एक भाग नष्ट होणे आहे. गावातल्या प्रत्येक नागरिकाची शाळेकडे लक्ष देण्याची शाळेत घडणार आहे. जबाबदारी आहे. कारण उद्याचा सुजाण नागरिक याच शाळेत घडणार आहे.

आनंददायी शनिवार, माजी विद्यार्थी संघ आणि माता पालक संघ, निपुण यासारख्या शासन स्तरावरील चांगल्या गोष्टींची प्रभावी अंमलबजावणी करायला हवी. गुणवत्ता वाढीसाठी गावातील सेवानिवृत्त शिक्षक, डीएड, बीएड झालेले तरुण-तरुणी विशेष कौशल्य असणारे ग्रामस्थ, पालक यांचा सहल, सांस्कृतिक गल्ली अभ्यासिका, लेझीम, खो-खो, कबड्डी, कुस्ती कार्यक्रम, क्षेत्रभेटी यासारखे सहशालेय कार्यक्रम, यासारखे देशी खेळ शिकवणे यासाठी मदत घ्यायला हवी. वाचनालयाच्या माध्यमातून वाचनाची गोडी लावायला हवी. आणि महत्त्वाचे म्हणजे ज्या गोष्टीमुळे मुलांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होणाऱ्या गोष्टींना देणे अशा जबाबदाऱ्या घ्याव्या लागतील. अटकाव करणे आणि शासनाच्या निदर्शनास आणून देणे अशा जबाबदा-या घ्याव्या लागतील.

गावाने शिक्षण ताब्यात घेण्याचे प्रयोग सुरू व्हायला हवेत. 'कर के देखो.' नक्की बदल होईल. 'आमचे गाव आमची शाळा' हे गावाचे ब्रीद असायला हवे. सरकारी शाळा वाचवण्याची, वाढवण्याची चळवळ सुरू व्हायला हवी.(उत्तरार्ध)

**नामदेव माळी**
मो.०९४२३८६९४०४

# प्रेमसंबंधाचा वाद ठरला जीवघेणा; उर्दू हायस्कूलसमोर तरुणाची हत्या

## ● चाकू-तलवारीने हल्ला करून २२ वर्षीय नितेश जाधवचा खून
## ● सिव्हील लाईन पोलिसांची तासाभरात 'ऑपरेशन अरेस्ट'

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात अ०

प्रेमसंबंधाचा वाद ठरला जीवघेणा; उर्दू हायस्कूलसमोर तरुणाची हत्या

चाकू-तलवारीने हल्ला करून २२ वर्षीय नितेश जाधवचा खून; सिव्हील लाईन पोलिसांची तासाभरात 'ऑपरेशन अरेस्ट'

अकोला : जुन्या प्रेमसंबंधातून निर्माण झालेला वाद विकोपाला गेल्यानंतर तीन तरुणांनी धारदार शस्त्रांनी केलेल्या हल्ल्यात २२ वर्षीय तरुणाचा बळी गेला. उर्दू हायस्कूल मैदानासमोर रविवारी रात्री घडलेल्या या थरारक घटनेने शहर हादरले. नितेश उर्फ मायकल श्रीराम जाधव याच्यावर चाकू व तलवारीने वार करून आरोपी पसार झाले; मात्र सिव्हील लाईन पोलिसांनी घटनेनंतर तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या एका तासात तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले.

२३ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास नितेश जाधव हा मित्रांसोबत उर्दू हायस्कूलच्या मैदानात बसला होता. याचवेळी रोहन उर्फ अनिकेत संतोष दामोदर, अंश प्रदिप सिरसात आणि ऋषभ उर्फ सागर विजय कृष्णपल्लोवार हे तेथे आले. जुन्या प्रेमसंबंधाच्या कारणावरून त्यांच्यात वाद झाला. वादाचे रूपांतर काही क्षणांतच हिंसक हल्ल्यात झाले. तिघांनी नितेशवर चाकू व तलवारीने हल्ला चढविला. गंभीर जखमी झालेल्या नितेशचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच



सिव्हील लाईन पोलिसांनी घटनास्थळ गाठून तपासाची सूत्रे हातात घेतली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व अपर पोलीस अधीक्षक रेड्डी यांनी आरोपींचा तातडीने शोध घेण्याच्या सूचना दिल्या. उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांनी घटनास्थळी भेट देत तपास पथकाला आवश्यक मार्गदर्शन केले. पोलीस निरीक्षक श्रीमती मालती कायटे यांनी तातडीने विशेष पथके तयार केली. एकीकडे घटनास्थळावरील माहिती संकलित करण्यात येत असतानाच दुसरीकडे गोपनीय बातमीदारांचे जाळे सक्रिय करण्यात आले. तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने आरोपींच्या संभाव्य हालचालींचा माग घेण्यात आला.

पोलिसांचा शोध सुरू असतानाच तिन्ही आरोपी परिसरातून पसार होण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी क्षणार्धात हालचाल करीत परिसरात सापळा रचला आणि रोहन उर्फ अनिकेत दामोदर, अंश सिरसात व ऋषभ उर्फ सागर कृष्णपल्लोवार या तिघांना शिताफीने ताब्यात घेतले. या प्रकरणी सिव्हील लाईन पोलीस ठाण्यात अप. क्र. ६०५/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), ३(५) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हल्ल्यामागील नेमके कारण, वापरण्यात आलेली शस्त्रे आणि घटनेशी संबंधित इतर बाबींचा तपास सुरू आहे.

### कारवाईत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती मालती कायटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्र शिंदे, पोलीस उपनिरीक्षक दिनेश पवार, पोलीस हेड कॉन्स्टेबल श्रीकांत आजलसांडे, पोलीस कॉन्स्टेबल शक्ती कांबळे, पवन सिरसात व एकनाथ त्रिकाळ यांनी ही कारवाई केली.

# लाखपुरीच्या कावड महोत्सवाला भक्तिमय परंपरेची साथ

## डीजेला फाटा देण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

अकोला जिल्ह्यासह विदर्भातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लाखपुरी येथील श्री लक्षेश्वर संस्थानच्या ऐतिहासिक व धार्मिक परंपरेला साजेसे यंदाचे कावड यात्रा महोत्सव भक्तिमय वातावरणात, शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरे करण्याचे आवाहन आमदार हरीश पिंपळे यांनी केले. कावड यात्रा हा केवळ धार्मिक सोहळा नसून भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याची दीर्घ परंपरा आहे. त्यामुळे उत्सवात डीजेचा वापर टाळून भजन, कीर्तन व पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून महादेवाची आराधना करावी, असे आवाहन त्यांनी केले.

श्रावण महिन्यात लाखपुरी येथील श्री लक्षेश्वर संस्थानमध्ये महादेवाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल होतात. कावड यात्रेनिमित्त अकोला जिल्ह्यासह अमरावती व इतर जिल्ह्यांतूनही हजारो कावडधारी पवित्र जल घेऊन लाखपुरीकडे येतात.

या पार्श्वभूमीवर भाविकांची सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, वीजपुरवठा आणि रस्ते व्यवस्थेकडे संबंधित विभागांनी विशेष लक्ष देण्याची गरज बैठकीत व्यक्त करण्यात आली.

उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी कावड यात्रेच्या पार्श्वभूमीवर पोलीस, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच अन्य संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या. यात्रेदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये, भाविकांना त्रास होऊ नये आणि वाहतूक सुरळीत राहावी यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. कावडधारी व भाविकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.



### तहसीलदार शिल्पा बोबडे यांचा सत्कार

दरम्यान, मूर्तिजापूरच्या तहसीलदार शिल्पा बोबडे यांची उपजिल्हाधिकारीपदी पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पत्रकारिता क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त अनवर खान यांचाही शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष हर्षल साबळे, ठाणेदार धर्मेश जोशी, अप्पर तहसीलदार गिरजादेवी, ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार दीपक महाडिक, वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र नेमाडे, महावितरणचे अभियंता अजय कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता बजाज, अभियंता जंजाळ, भाजप तालुकाध्यक्ष नंदकिशोर राऊत यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी, कावड यात्रा आयोजन समितीचे पदाधिकारी, पत्रकार, लक्षेश्वर संस्थानचे पदाधिकारी तसेच महिला-पुरुष सेवाधारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री लक्षेश्वर संस्थानचे अध्यक्ष राजू दहापुते यांनी केले.

### भक्ती, परंपरा अन् सामाजिक एकोप्याचा जागर

लाखपुरीचा कावड यात्रा महोत्सव हा परिसरातील भाविकांच्या श्रद्धेचे प्रमुख केंद्र मानला जातो. विविध ठिकाणांहून पवित्र जल घेऊन कावडधारी महादेवाच्या चरणी अर्पण करण्यासाठी लाखपुरीत दाखल होतात. त्यामुळे या यात्रेला धार्मिकतेसोबतच सामाजिक एकोप्याचेही महत्त्व प्राप्त झाले आहे. भक्ती, शिस्त, परंपरा आणि प्रशासनाला सहकार्य या माध्यमातून यंदाचा कावड महोत्सव आदर्श पद्धतीने साजरा करण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# लढवय्या गुलाबराव गावंडे उपचारासाठी मुंबईत

## कोकिलाबेन रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार

■ प्रतिनिधी | अकोला ■



गेल्या २५ दिवसांपासून अमरावती येथील रेनबो हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेले राज्याचे माजी क्रीडामंत्री तथा ज्येष्ठ लोकनेते गुलाबराव गावंडे यांना पुढील उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले आहे. मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले असून, तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्या उपचारांना सुरुवात होणार आहे.

अमरावती येथे उपचारादरम्यान त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत होती. मात्र, अधिक प्रभावी उपचार तसेच पुनर्वसनाची प्रक्रिया तज्ज्ञांच्या देखरेखीखाली व्हावी, या उद्देशाने त्यांना मुंबईला हलविण्यात आले. प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. अभिषेक श्रीवास्तव यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. मोहित भट्ट, डॉ. तुषार राऊत आणि डॉ. सुनीता अय्यर यांच्या सहकार्याने त्यांच्यावर उपचार करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

गावंडे यांच्यासाठी मुंबईतील न्यूरो-रोबोटिक रिहॅबिलिटेशन सेंटरमध्ये पुनर्वसनाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीत आणखी सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, गुलाबराव गावंडे यांच्या प्रकृतीची माहिती मिळताच अकोला, अमरावतीसह विविध भागांतील कार्यकर्ते, समर्थक आणि हितचिंतकांमध्ये चिंता व्यक्त झाली. मात्र, मुंबईत अत्याधुनिक उपचारांची सुविधा उपलब्ध झाल्याने त्यांच्या प्रकृतीबाबत आशावादी वातावरण निर्माण झाले आहे. गावंडे यांच्या उत्तम आरोग्यासाठी विविध ठिकाणी अभिषेक, महाआरती आणि प्रार्थनांचे आयोजन केले जात आहे. त्यांच्या लवकरात लवकर प्रकृतीत सुधारणा व्हावी, यासाठी नागरिकांकडून सदिच्छा व्यक्त होत आहेत. जनतेशी जुळलेली नाळ आणि संकटांशी दोन हात करण्याची जिद्द ही गुलाबराव गावंडे यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख आहे. वयाच्या ७४व्या वर्षीही सार्वजनिक, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या या लढवय्या नेत्याने अनेक संकटांवर मात केली आहे. त्यामुळे यावेळीही ते आजारावर मात करून पुन्हा जनतेच्या सेवेत परततील, असा विश्वास त्यांच्या समर्थकांना आहे.

## अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संघटनचे सुंदरकांड

**अकोला :** श्रावण मास निमित्त राजेश्वर मंदिरात अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संघटनच्या स्वर्णिम अध्यात्म समितीच्या वतीने सुंदरकांड पठन भक्तिभावात पार पडले.कमला जाजू यांच्या मधुर आवाजात आणि जिल्ह्यातील सख्यांच्या आयोजनात झालेल्या या पठनात कमला जाजू यांना शाल, श्रीफळ, दुपट्टा व माला परिधान करून जिल्हाध्यक्ष शारदा लखोटिया आदींनी स्वागत केले.

# पेन्शनसाठी निवृत्त कर्मचाऱ्याचा नगर परिषदेत ठिय्या

## तेल्हारात अधिकारीशाही विरोधात संताप

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

आयुष्याची उमेदीची वर्षे नगर परिषदेच्या सेवेत घालविल्यानंतर निवृत्तीचे आयुष्य सन्मानाने जगण्याची वेळ आली; मात्र हक्काची पेन्शन, ग्रॅज्युइटी आणि रजा रोखीकरणाची रक्कम मिळविण्यासाठी नगर परिषदेच्या दारातच ठिय्या आंदोलन करण्याची वेळ ज्येष्ठ कर्मचारी कृष्णाजी पोहरकार यांच्यावर आली आहे. या प्रकारामुळे तेल्हारा नगर परिषदेतील कारभाराचा भोंगळपणा आणि अधिकारीशाहीचा मनमानी कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

सेवाकाळात प्रशासनाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्याला निवृत्तीनंतर त्याच्या हक्काच्या पैशांसाठी कार्यालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागणे, ही बाब संतापजनक आहे. पेन्शन ही कोणाची दया किंवा उपकार नसून कर्मचाऱ्याच्या प्रदीर्घ सेवेतून निर्माण झालेला कायदेशीर हक्क आहे. तरीही हा हक्क मिळविण्यासाठी आंदोलनाचे हत्यार उपसावे लागल्याने नगर परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

निवृत्तीनंतर नियमित उत्पन्नाचा प्रमुख आधार असलेली पेन्शनच रखडली तर ज्येष्ठ कर्मचाऱ्याने दैनंदिन गरजा भागवायच्या कशा, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ग्रॅज्युइटी आणि रजा रोखीकरणाची रक्कमही प्रलंबित असल्याने पोहरकार यांची आर्थिक कोंडी होत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने कागदोपत्री प्रक्रिया आणि कार्यालयीन कारणांचा बाऊ न करता प्रकरण तातडीने निकाली काढावे, अशी मागणी होत आहे.

पोहरकार यांच्या निवृत्तीविषयक लाभांना विलंब नेमका कोणत्या कारणामुळे झाला, फाईल कुठे रखडली आणि त्यासाठी जबाबदार अधिकारी कोण, याची चौकशी होणे गरजेचे आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक अथवा निष्काळजीपणामुळे विलंब झाला असल्यास जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याची मागणीही होत आहे.

हक्काच्या पैशांसाठी नगर परिषद कार्यालयाच्या दारात बसलेल्या ज्येष्ठ कर्मचाऱ्याच्या आंदोलनाची प्रशासनाने संवेदनशीलतेने दखल घेणे अपेक्षित आहे. निवृत्त कर्मचाऱ्याला न्याय देण्यासाठी आणखी आंदोलनाची प्रतीक्षा करणार की तातडीने निर्णय घेणार? असा सवाल आता तेल्हारावासीयांकडून उपस्थित होत आहे.

सेवेत असताना कर्मचाऱ्यांकडून कर्तव्याची अपेक्षा करणाऱ्या प्रशासनाने निवृत्तीनंतर त्यांचे हक्क देण्याचे कर्तव्यही पार पाडले पाहिजे. अन्यथा कृष्णाजी पोहरकार यांचा ठिय्या हा केवळ एका कर्मचाऱ्याचा संघर्ष न राहता नगर परिषद प्रशासनाच्या कार्यशैलीविरोधातील जनक्षोभाचे केंद्र ठरण्याची शक्यता आहे.



### 'खुर्ची'चा माज की नियमांचा विसर?

नगर परिषद प्रशासनातील अधिकाऱ्यांनी नियमांच्या चौकटीत काम करणे अपेक्षित असताना एखाद्या निवृत्त कर्मचाऱ्याला आपल्या हक्कासाठी संघर्ष करावा लागतो, यामुळे अधिकारीशाहीच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अधिकाऱ्यांची खुर्ची कायमची नसते; मात्र त्या खुर्चीवरून घेतलेल्या निर्णयाचा परिणाम कर्मचाऱ्याच्या उर्वरित आयुष्यावर होतो, याचे भान प्रशासनाने ठेवणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# रसूलपूर फाट्याजवळ ट्रक-स्प्लेंडरची धडक; दुचाकीस्वार गंभीर जखमी



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

लाखपुरीकडून मूर्तिजापूरकडे येणाऱ्या स्प्लेंडर दुचाकीची दर्यापूरकडे जाणाऱ्या ट्रकला धडक होऊन दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना रसूलपूर फाट्याजवळ घडली. सोमवारी घडलेल्या या अपघातात दुचाकीस्वाराच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्याला पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, आदित्य बापूराव माहुरे (रा. गाजीपूर, ता. मूर्तिजापूर) हे स्प्लेंडर क्रमांक एमएच ३० बीजी ७९९१ वरून लाखपुरीकडून मूर्तिजापूरच्या दिशेने येत होते. दर्यापूरकडे जाणाऱ्या एमपी ४८ झेडएल ६५११ क्रमांकाच्या ट्रकला ओव्हरटेक करत असताना दोन्ही वाहनांची धडक झाली. या अपघातात आदित्य माहुरे यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. त्यांना तत्काळ रुग्णवाहिकेने लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर प्रकृतीची गंभीरता लक्षात घेऊन त्यांना पुढील उपचारासाठी अकोला येथे रेफर करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. ठाणेदार दीपक महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय चंदन वानखडे, संजय खंडारे, मंगेश घाटे, रितेश मद्दी, गजानन सयाम व शंकर खेडकर यांनी भेट देऊन पंचनामा व पुढील कारवाई सुरू केली.

## उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

**अकोला :** महाराष्ट्र शासनाकडून वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या गरजू व होतकरु विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना' आणि 'पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना' अंतर्गत अर्ज स्वीकारण्याची ऑनलाईन प्रक्रिया सुरू झाली.


## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२३६/२०२६ — प्रोसेस नं.९६८१/२०२६
चौ.ता. ०८/०९/२०२६ — दिनांक : २९/०७/२०२६

**अर्जदार :** १. सुनिता सुरेश अडबोल (लग्नानंतरचे नाव) सुनिता मधुकरराव ढोरे (लग्नाआधीचे नाव) रा. महात्मा फुले शाळेजवळ, स्नेह नगर, गुडधी रोड, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९८५०३४३२८४ २. मोहन मधुकरराव ढोरे रा. प्लॉट नं. १२७, राधाकृष्ण नगर, वाठोडा, नागपूर- ३४, ता. जि. नागपूर. मो. नं. ९४२३६३२२०१

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. संतोष मधुकरराव ढोरे रा. आशीर्वाद, सावंतवाडी, रणपिसे नगर, अकोला. ता. जि अकोला. मो. नं. ९१७२६७३९७२ २. सौ. पुष्पा सुरेश किरडे (लग्नानंतरचे नाव) पुष्पा मधुकरराव ढोरे (लग्नाआधीचे नाव) रा. ज्योती नगर, बर्फ कारखान्या जवळ, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९०२२४७५०९४ ३. सौ. संगिता सुरेंद्र आपोतीकर (लग्नानंतरचे नाव) संगिता मधुकरराव ढोरे (लग्नाआधीचे नाव) रा. -केदार अपार्टमेंट, पुंडलिक बाबा आश्रमा जवळ, राउतवाडी, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९५२७९०७३७२

**मयताचा पत्ता :-** मयत : ११. इंदिराबाई मधुकर ढोरे २. मधुकर नामदेव ढोरे
**पत्ता :-** रा. केदार अपार्टमेंट, पुंडलिक बाबा आश्रमाजवळ, राउतवाडी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत इंदिराबाई मधुकर ढोरे यांचे दि. ०३/०१/२०१९ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे व मयत मधुकर नामदेव ढोरे यांचे दि. ०६/०६/ २०२५ रोजी सावंतवाडी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०८/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी.आज दिनांक २९/०७/२०२६ रोजी माझे व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३५२/२०२६ — प्रोसेस नं.१०३५३/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : ११/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. मंगला रमेश वानखडे रा. शिवसेना वसाहत, अंबिका चौक, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. २. प्रशांत रमेश वानखडे रा. बाळापूर रोड, न्यु गुरूदेव नगर, अंबिका चौक, ओल्ड सिटी, अकोला. मु. पो. शिव मंदीराजवळ, अकोला. ता. जि. अकोला. ३. श्रीकांत रमेश वानखडे रा. शिवसेना वसाहत, अंबिका चौक, न्यु गुरूदेव नगर, ओल्ड सिटी, अकोला. ता. जि. अकोला. ४. सचिन रमेश वानखडे रा. अंबिका चौक, शिवसेना वसाहत, अकोला. ता. जि. अकोला. ५. प्रियंका रमेश वानखडे रा. बाळापूर नाका, शिवसेना वसाहत, अक्कलकोट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रमेश रामराव वानखडे
**पत्ता :-** रा. शिवसेना वसाहत, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रमेश रामराव वानखडे याचे दि. ०८/०६/२०२६ रोजी राहत्या घरी शिवसेना वसाहत, अंबिका चौक, बाळापूर नाका, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२४५/२०२६ — प्रोसेस नं.९५३९/२०२६
चौ.ता. ०४/०९/२०२६ — दिनांक : २७/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती मोहिनी अशोक वाघमारे रा. श्रीजी बेकरी जवळ, व्हीएचबी कॉलनी, तारफैल, अकोला, ता. जि. अकोला. मो. नं. ७८४१९६७८४६ २. सौ. भावना विनोद ढाले भावना अशोक वाघमारे रा. हिंगणा रोड, गायत्री नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९४२१७५५५१९ ३. सौ. रिता राजेश कमलाकर रिता अशोक वाघमारे रा. पुजा सभागृह, ६०७ मरारटोली, रामनगर, नागपूर, ता. जि. नागपूर. ४. सौ. वर्षा रूपेश शिरसाल वर्षा अशोक वाघमारे, रा. गायत्री नगर, हिंगणा रोड, चांदूर, अकोला. ता. जि. अकोला. ५. श्री. निखिल अशोक वाघमारे रा. श्रीजी बेकरी जवळ, व्हीएचबी कॉलनी, तारफैल, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अशोक शंकरराव वाघमारे
**पत्ता :-** रा. श्रीजी बेकरी जवळ, व्हीएचबी कॉलनी, तारफैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोक शंकरराव वाघमारे यांचे दि. ०३/०२/२०२१ रोजी समर्पण हॉस्पिटल, केडिया प्लॉट, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वत: अथवा अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल? हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३८२/२०२६ — प्रोसेस नं.१०४५७/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : १४/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती इंदूबाई तुळशीदास गावंडे २. श्रीमती अर्चना संदीप गावंडे ३. कु. कृष्णाली संदीप गावंडे ४. कु. ज्ञानेश्वरी संदीप गावंडे ५. कु. ईश्वरी संदीप गावंडे सर्व रा. जवळा (दोडकी), पो. कोळंबी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : संदीप तुळशीदास गावंडे
**पत्ता :-** रा. जवळा (दोडकी), पो. कोळंबी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संदीप तुळशीदास गावंडे यांचे दि. २४/०२/२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २५५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# वर्षभरात ६८३ लाचखोर एसीबीच्या जाळ्यात

## ५१ क्लास वन, ८५ क्लास टू अधिकाऱ्यांचा समावेश; वर्ध्यातही लाचखोरीचे सापळे

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यात लाचखोरीचा विळखा कायम असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईतून समोर आले आहे. १ जानेवारी ते १९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राज्यात लाचखोरीचे ४७५ गुन्हे दाखल झाले असून तब्बल ६८३ लाचखोर एसीबीच्या जाळ्यात अडकले आहेत. या कारवायांमध्ये २ कोटी ८१ लाख १० हजार ७९० रुपयांची लाच स्वीकारल्याचे उघड झाले आहे.

या कारवाईत ५१ क्लास वन आणि ८५ क्लास टू अधिकाऱ्यांचा समावेश आहे. राज्य सरकारच्या ४७ विभागांपैकी तब्बल ३६ विभागांमध्ये लाचखोरीची प्रकरणे समोर आली आहेत. महसूल, नगरविकास, ग्रामविकास, पोलीस, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, आरटीओसह विविध विभागांमध्ये लाचखोरीचे प्रकार उघडकीस आले आहेत.

**वर्धा येथे एसीबीची धडक कारवाई**

राज्यातील या धक्कादायक आकडेवारीच्या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्ह्यातही २०२६ मध्ये लाचखोरीविरोधात एसीबीने अनेक कारवाया केल्या आहेत. यामुळे जिल्ह्यातील शासकीय यंत्रणेत लाचखोरीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

जून २०२६ मध्ये वर्धा नगरपालिकेचे नगर अभियंता संदीप डोईजड यांच्यावर एसीबीने कारवाई केली. एका कंत्राटदाराच्या ९ लाख रुपयांच्या बिलाला मंजुरी देण्यासाठी अडीच लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप होता. त्यापैकी २ लाख रुपयांची लाच



स्वीकारताना एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले.

त्यानंतर ऑगस्ट २०२६ मध्ये देवळी पोलीस ठाण्यातील पोलीस कॉन्स्टेबल विकास देवतळे यालाही एसीबीने ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. या सलग कारवायांमुळे वर्धा जिल्ह्यातील शासकीय कार्यालये आणि पोलीस यंत्रणेतील लाचखोरीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

**४५६ प्रकरणांची चौकशी प्रलंबित**

लाचखोरीची प्रकरणे दाखल होऊनही चौकशीचा वेग संथ असल्याचे आकडेवारीतून दिसून येते. शासनाकडे १०८, तर सक्षम अधिकाऱ्यांकडे विभाग निहाय चौकशीची ३४८ अशी एकूण ४५६ प्रकरणे प्रलंबित आहेत. यापैकी ९६ प्रकरणे ९० दिवसांपेक्षा कमी कालावधीची असून तब्बल ३६० प्रकरणे ९० दिवसांपेक्षा अधिक काळापासून प्रलंबित आहेत.

**२१७ जणांवरील निलंबन रखडले**

२०१४ ते २०२६ या कालावधीत एसीबीने कारवाई केलेली २१७ प्रकरणे निलंबनासाठी पाठविण्यात आली आहेत. मात्र, संबंधितांवर अद्याप निलंबनाची कारवाई झालेली नसल्याचे समोर आले आहे. यामध्ये ३७ क्लास वन, ४४ क्लास टू, १२५ क्लास थ्री आणि इतर ११ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. निलंबनासाठी प्रलंबित प्रकरणांमध्ये मुंबई ४५, ठाणे ४४, पुणे २४, नाशिक २२, नागपूर १६ आणि अमरावती १९ जणांचा समावेश आहे.

**शिक्षा झाली तरी २८ लाचखोर बडतर्फ नाहीत**

२०१३ ते २०२६ या कालावधीत लाचखोरीच्या गुन्ह्यांत शिक्षा झाल्यानंतरही २८ लाचखोरांना सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले नाही. त्यामुळे केवळ एसीबीची कारवाई करून प्रश्न सुटणार नसून त्यानंतरची विभागीय चौकशी, निलंबन आणि बडतर्फीची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याची गरज आहे.

वर्ध्यात नगरपालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यापासून देवळी पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्या पर्यंत झालेल्या एसीबीच्या कारवायांमुळे जिल्ह्यात लाचखोरीचे प्रकार किती खोलवर रुजले आहेत, याची गंभीर चर्चा सुरू झाली आहे. लाच मागणाऱ्या आणि स्वीकारणाऱ्यांवर कठोर कारवाईसह दोषींना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# जलशुद्धीकरण केंद्राजवळ नसबंदी केंद्र नकोच; भाजपचा तीव्र विरोध

**आष्टी/जनमाध्यम**

आष्टी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्राजवळ प्रस्तावित करण्यात आलेल्या कुत्र्यांच्या नसबंदी केंद्राला भारतीय जनता पार्टीच्या आष्टी शाखेने तीव्र विरोध दर्शविला आहे. याबाबत नगरपंचायतीचे मुख्याधिकारी श्री. गडलिंग यांना निवेदन देऊन नसबंदी केंद्र अन्य सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याची मागणी करण्यात आली.

जलशुद्धीकरण केंद्राच्या परिसरात कुत्र्यांची वर्दळ, मलमूत्र, केस तसेच नसबंदी प्रक्रियेतून निर्माण होणारा जैविक आणि संसर्गजन्य कचरा यामुळे परिसरातील स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता भाजपने नविदनातून व्यक्त केली आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने जलशुद्धीकरण केंद्र संवेदनशील असल्याने या ठिकाणी असे केंद्र उभारणे योग्य नसल्याचे पदाधिकाऱ्यांनी म्हटले.



नसबंदी केंद्र जलशुद्धीकरण केंद्रापासून किमान ५०० मीटर अंतरावर किंवा अन्य सुरक्षित ठिकाणी हलवावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच केंद्र सुरू करण्यापूर्वी आरोग्य, पाणीपुरवठा विभाग आणि सक्षम प्राधिकरणांकडून तांत्रिक व आरोग्यविषयक अहवाल घेऊनच निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अशोक विजयकर, नगरसेवक ॲड. मनिष ठोंबरे, उत्तम बरगे, नरेंद्र भनेरकर, विजय खांडेकर, अतुल गुल्हाने, सागर सिनकर, नजीम अली, नीरज भार्गव, अनिल डोईफोडे, आवेज खान, सौरभ तायडे, मंगेश शिरभाते, सचिन नासरे, साबीर शेख, शाकीर भाई आदी उपस्थित होते.

# आमदारांच्या कथित हस्तक्षेपाने रस्ता 'खड्डयात'; कमिशनच्या आरोपांनी राजकारण तापले

## वायगाव–राळेगाव मार्गाची दुरवस्था; खोदून ठेवलेला रस्ता नागरिकांच्या जीवावर

**वर्धा/जनमाध्यम**

वायगाव–राळेगाव मार्गावरील रस्त्याचे काम अनेक महिन्यांपासून रखडल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ठेकेदाराने काम हाती घेतले. प्रत्यक्षात रस्त्याचे खोदकामही सुरू झाले. मात्र त्यानंतर कामाची गती अचानक मंदावली आणि आजही हा मार्ग अर्धवट अवस्थेत पडून आहे. त्यामुळे वाहनचालक, शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

या कामाला आ. राजेश बकाने यांचा हस्तक्षेप असल्याचे नागरिकांनी बोलून दाखवले आहे. काम का रखडले, खोदकाम करून रस्ता तसाच का सोडण्यात आला, याचे उत्तर आमदार आणि संबंधित प्रशासनाने जनतेसमोर द्यावे, अशी मागणी आता जोर धरत आहे.



कमिशनच्या कथित मागणीमुळे काम रोखले गेले का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. हा आरोप सत्य आहे की नाही, याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र जनतेच्या पैशातून मंजूर झालेले काम राजकीय हस्तक्षेपामुळे रखडत असेल तर त्याची जबाबदारी निश्चित कोणाची, असा प्रश्न ग्रामस्थांचा आहे.

रस्ता खोदून ठेवल्यामुळे पावसाळ्यात चिखल, खड्डे आणि घसरडेपणा वाढला असून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. रस्ता दुरुस्तीऐवजी नागरिकांच्या हालअपेष्टांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे.

कमिशनच्या आरोपांच्या सावटातून बाहेर या आणि रस्त्याची तातडीने वाट लावा, अशी मागणी नागरिकांनी आमदार राजेश बकाने यांच्याकडे केली आहे. अन्यथा रखडलेल्या कामाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी जनतेच्या रस्त्याला न्याय द्यायचा की राजकीय हस्तक्षेपाच्या आरोपांना सामोरे जायचे, याचा फैसला आता आमदार बकाने आणि प्रशासनानेच करायचा आहे.

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक निधीच्या वापराची उच्चस्तरीय चौकशी करा

## गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांपासून वंचित ठेवल्याचा आरोप

**वर्धा/जनमाध्यम**

गांधी-विनोबांच्या कर्मभूमी असलेल्या वर्धा जिल्ह्यात विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या शैक्षणिक निधी व सुविधांच्या वापराबाबत उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)चे विदर्भ तथा जिल्हाध्यक्ष महेंद्र मुनेश्वर यांनी केली आहे.

ग्रामीण व दुर्गम भागांसह आदिवासी पट्ट्यात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच आश्रमशाळा कार्यरत आहेत. या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध योजना व शैक्षणिक सुविधांचा लाभ अपेक्षित आहे. मात्र काही ठिकाणी या सुविधा विद्यार्थ्यांपर्यंत अपेक्षित प्रमाणात पोहोचत नसल्याचा आरोप मुनेश्वर यांनी केला आहे.

आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहांमध्ये भोजनाची गुणवत्ता, स्वच्छता तसेच विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या मूलभूत सुविधांची तपासणी करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. वसतिगृहांमध्ये स्वयंपाक गृहांचा पुरेसा वापर होत नसल्याचे तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले. शासनाकडून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधा व कल्याणासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध होतो. या निधीचा विनियोग नेमका कशाप्रकारे होतो, याची स्वतंत्र तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित शाळा, वसतिगृह व आश्रमशाळांमधील नोंदी, खर्चाचे अभिलेख आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मिळणाऱ्या सुविधांची पडताळणी करावी, असे मुनेश्वर यांनी म्हटले आहे. अधीक्षक, प्राचार्य, मुख्याध्यापक, व्यवस्थापन मंडळ तसेच संबंधित विभागीय अधिकाऱ्यांच्या कामकाजाचीही चौकशी करण्यात यावी. चौकशीत अनियमितता अथवा गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या विषयाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन शासकीय शाळा, वसतिगृहे आणि आश्रमशाळांमधील सुविधांची वस्तुनिष्ठ पाहणी करावी.

# संत बऱ्हानपुरे महाराजांच्या पुण्यतिथीत सेवाभावात मिसळले खासदार

**समुद्रपूर/जनमाध्यम**

संत बऱ्हानपुरे महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त मांडगाव येथे भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याला वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खा. अमर काळे यांनी उपस्थित राहून संत बऱ्हानपुरे महाराजांचे दर्शन घेतले.

धार्मिक श्रद्धेसोबतच ग्रामस्थांशी साधलेला मनमोकळा संवाद त्यांच्या भेटीचे वैशिष्ट्य ठरले.

मांडगाव येथे पोहोचल्यानंतर खा. काळे यांनी संत बऱ्हानपुरे महाराजांच्या मठात जाऊन दर्शन घेतले. त्यानंतर समाधीस्थळी चादर अर्पण करून महाराजांना अभिवादन केले. संतांच्या कार्याचे स्मरण करत त्यांनी भक्तिभाव व्यक्त केला.



**समाधीस्थळी चादर अर्पण; भंडाऱ्याच्या सेवेत सहभाग**

पुण्यतिथीनिमित्त आयोजित भंडाऱ्यातही खासदार काळे सहभागी झाले.

लोकप्रतिनिधी म्हणून केवळ व्यासपीठावर उपस्थित न राहता त्यांनी भंडाऱ्याच्या सेवेत प्रत्यक्ष सहभाग घेतला. यावेळी उपस्थित भाविकांमध्येही त्यांनी सहजपणे मिसळून संवाद साधला.

मठ परिसरातील दहीहंडी कार्यक्रमात सहभागी होत त्यांनी प्रसाद स्वीकारला. यावेळी ग्रामस्थ, भाविक आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

दरम्यान, खा. काळे यांनी श्री डांगरी यांच्या निवासस्थानी भेट देत स्थानिक नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

# टॉवर उभे, तरी कव्हरेज गायब; मोबाईल सेवा ग्राहकांसाठी डोकेदुखी

**साहूर/जनमाध्यम**

आधुनिक युगात मोबाईल हा केवळ संपर्काचे साधन राहिले नसून दैनंदिन जीवनाची अत्यावश्यक गरज बनला आहे. व्यापारी, कर्मचारी, विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर अशा सर्व स्तरातील नागरिकांची अनेक कामे मोबाईल आणि इंटरनेटवर अवलंबून आहेत. मात्र साहूर व परिसरातील नागरिकांना मोबाईल कंपन्यांच्या निकृष्ट सेवेमुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

साहूर परिसरात बीएसएनएल, वोडाफोन आयडिया, जिओ यांसह विविध कंपन्यांचे टॉवर गेल्या दहा-बारा वर्षांपासून उभे आहेत. मात्र प्रत्यक्षात मोबाईल सेवा वारंवार खंडित होत असल्याने हे टॉवर असून नसल्यासारखेच ठरत आहेत. विशेषतः वोडाफोन आयडिया आणि जिओची सेवा वारंवार ठप्प होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत.

टॉवर असतानाही अनेक भागांत योग्य कव्हरेज मिळत नसल्याने फोन कॉल करणे, कॉल रिसिव्ह करणे तसेच इंटरनेट वापरणे कठीण होत आहे. अनेक वेळा मोबाईलमधून कॉल न करताही काही रक्कम किंवा सेवा शुल्क कपात होत असल्याच्या तक्रारी ग्राहकांकडून करण्यात येत आहेत.

आज शिक्षणापासून शासकीय आणि निमशासकीय कामांपर्यंत बहुतांश व्यवहार ऑनलाइन झाले आहेत. त्यामुळे मोबाईल नेटवर्क बंद पडल्यास नागरिकांच्या दैनंदिन कामांवर थेट परिणाम होतो. विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण, ऑनलाइन अर्ज, बँकिंग, डिजिटल व्यवहार तसेच विविध



शासकीय सेवांचा लाभ घेण्यात अडथळे निर्माण होत आहेत.

खासगी मोबाईल कंपन्यांकडून विविध योजना आणि ऑफरचे संदेश ग्राहकांना पाठविले जातात. मात्र प्रत्यक्ष सेवेत सातत्य नसल्याने ग्राहकांमध्ये नाराजी वाढत आहे. अनावश्यक सेवा सक्रिय होऊन रक्कम कपात होणे किंवा ग्राहकांच्या परवानगीशिवाय काही सेवा सुरू झाल्याच्या तक्रारींचीही चौकशी होण्याची गरज आहे.

मोबाईल कंपन्यांनी केवळ ग्राहकसंख्या वाढविण्यावर भर न देता विद्यमान ग्राहकांना दर्जेदार आणि अखंडित सेवा देण्याची गरज आहे. साहूर परिसरातील नेटवर्क समस्या तातडीने दूर करून कव्हरेजची गुणवत्ता सुधारावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.




## बंद घरातून २५ हजारांचा ऐवज चोरी

**वर्धा -** शहरालगतच्या बोरगाव (मेघे) परिसरातील बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने रोख रकमेसह पितळी मूर्ती आणि समई असा २४ हजार ८०० रुपयांचा ऐवज लंपास केला. या प्रकरणी वर्धा शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणेशनगर येथील मनीषा शेंडे काही दिवसांसाठी गांधी नगर येथे भावाकडे गेल्या होत्या. घर बंद असल्याची संधी साधून चोरट्याने घराचे कुलूप तोडले. घरातील आलमारीत ठेवलेले २० हजार रुपये रोख तसेच देवघरातील पितळीच्या मूर्ती व समई असा चार हजार ८०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. घरी परतल्यानंतर चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ शहर पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## विळा मारून युवकाला केले जखमी

**सेलू -** जुन्या वादातून झालेल्या भांडणात युवकावर विळ्याने वार करून त्याला जखमी करण्यात आल्याची घटना महाबळा येथे घडली. चेतन गावंडे (१६) असे जखमी युवकाचे नाव आहे. या प्रकरणी सेलू पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. चेतन गावंडे हा घरी असताना गावातीलच रोहित तळवेकर तेथे आला. यावेळी जुन्या वादाच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर भांडणात झाल्यानंतर रोहितने चेतनला शिवीगाळ केली. त्यानंतर हातातील विळ्याने त्याच्यावर वार केला. या हल्ल्यात चेतन जखमी झाला. घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली. जखमी चेतनने पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून सेलू पोलिसांनी रोहित तळवेकर याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी सचिन सोनटक्के करीत आहेत.

## आर्थिक विवंचनेतून युवकाची आत्महत्या

**हिंगणघाट -** नवीन घर घेतल्याने निर्माण झालेल्या आर्थिक विवंचनेतून विवाहित युवकाने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना संत तुकडोजी वॉर्डात घडली. विजय जांबुतकार (४५) असे मृताचे नाव आहे. विजय जांबुतकार हे भाजी विक्रीचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. अलीकडेच त्यांनी नवीन घर घेतल्याने त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला होता. या आर्थिक विवंचनेतून ते काही दिवसांपासून तणावात असल्याचे सांगण्यात येते. कुटुंबीय झोपेत असताना त्यांनी घरात गळफास घेतला. सकाळी ही घटना लक्षात आल्यानंतर कुटुंबीयांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. याप्रकरणी राजेश जांबुतकार यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

## अतिमद्यप्राशनामुळे व्यक्तीचा मृत्यू

**हिंगणघाट -** दारूचे व्यसन असलेल्या व्यक्तीचा मृतदेह शासकीय रुग्णालयाच्या परिसरात आढळून आल्याने खळबळ उडाली. पंजाब गडलिंग (५५) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. यशवंत नगर येथील संजय गडलिंग हे सकाळी नेहमीप्रमाणे फिरायला गेले होते. यावेळी एका अनोळखी व्यक्तीने त्यांना पंजाब गडलिंग हे शासकीय रुग्णालयाच्या परिसरात पडले असल्याची माहिती दिली. माहिती मिळताच संजय यांनी रुग्णालयाच्या परिसरात जाऊन पाहणी केली असता पंजाब गडलिंग हे मृतावस्थेत आढळून आले. पंजाब यांना दारूचे व्यसन असल्याची माहिती कुटुंबीयांकडून देण्यात आली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. संजय गडलिंग यांच्या तक्रारीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून तपास सुरू आहे.

## महिलेने गळफास घेत जीवन संपविले

**हिंगणघाट -** शहरातील संत ज्ञानेश्वर वॉर्डात ५६ वर्षीय महिलेने घरातील स्वयंपाक खोलीत गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना घडली. मंदा व्यवहारे असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेची नोंद हिंगणघाट पोलिसांनी आकस्मिक मृत्यू म्हणून केली आहे. नीरज व्यवहारे हे संत ज्ञानेश्वर वॉर्डात आई-वडील, पत्नी आणि दोन मुलांसह राहतात. ते खासगी नोकरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. घटनेच्या वेळी नीरज हे कामावर गेले होते. त्याचदरम्यान त्यांची आई मंदा व्यवहारे यांनी घरातील स्वयंपाक खोलीत गळफास घेतला. ही बाब त्यांच्या पत्नीच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी नीरज यांना माहिती दिली. नीरज घरी आल्यानंतर घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली.

## जखमी मजुराचा उपचारादरम्यान मृत्यू

**वर्धा -** कॉटन जीनिंगमध्ये काम करताना सुमारे आठ फूट उंचीवरून खाली पडून गंभीर जखमी झालेल्या मजुराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अनिल त्यागी (५४) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी देवळी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. उत्तर प्रदेशातील सहारनपूर जिल्ह्यातील सरसो हेडी येथील रहिवासी अनिल त्यागी हे वायगाव परिसरातील कॉटन जीनिंगमध्ये मजूर म्हणून काम करीत होते. काम सुरू असताना ते अचानक सुमारे आठ फूट उंचीवरून खाली पडले.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - २६८

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८

**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# विद्यार्थ्यांच्या कौशल्याला बाजारपेठेची जोड

## जिप शाळा धानोरा म्हाली येथे राखी प्रदर्शन व विक्री उपक्रम





**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, व्यावसायिक कौशल्य आणि स्वावलंबनाची भावना विकसित व्हावी या उद्देशाने जि.प. पूर्व माध्यमिक शाळा, धानोरा म्हाली येथे स्काऊट गाईड युनिटच्या माध्यमातून व्यावसायिक शिक्षणांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक राख्यांचे प्रदर्शन व विक्री उपक्रम आयोजित करण्यात आला. सोमवार, दिनांक २४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता आयोजित या उपक्रमाचे उद्घाटन केंद्र समन्वयक सुभाष सहारे यांचे हस्ते करण्यात आले.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उमेश मारबदे यांचे अध्यक्षस्थानी झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी विषयतज्ज्ञ श्रीनाथ वानखडे, दीपाली कुमरे, शाळा व्यवस्थापन समितीचे हिना परवीन, अनिल मारबदे, पूजा श्रीरामे, कल्पना गाडे, नीता मारबदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून विविध रंग, मणी, धागे आणि सजावटीच्या साहित्याचा वापर करून सुंदर व आकर्षक राख्या तयार केल्या आहेत. केवळ वस्तू तयार करण्यापुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता त्यांचे प्रदर्शन, किंमत निश्चिती, ग्राहकांशी संवाद आणि प्रत्यक्ष विक्रीचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा, या दृष्टीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामुळे शालेय शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना 'कमवा आणि शिका', उद्योजकता व व्यवहारज्ञानाचे प्रत्यक्ष धडे मिळणार असल्याचे उद्घाटक सुभाष सहारे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या हातांनी तयार झालेल्या राख्यांना ग्रामस्थांनी पसंती देऊन त्या खरेदी कराव्यात, त्यांच्या मेहनतीला प्रोत्साहन द्यावे आणि विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेचा आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

या उपक्रमाचे नियोजन मुख्याध्यापिका मोहना चोखटकर यांचे मार्गदर्शनात वैशाली धाकुलकर, संगीता देशभ्रतार, प्रभा पाटणकर, प्रमोद घाटोळ, गायत्री गुजर स्काऊट, गाईड युनिट आदींनी परिश्रम घेतले.

# परतवाडा येथे 'पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात ६२८ उमेदवारांची प्राथमिक निवड

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडल करिअर सेंटर अमरावती यांनी २२ ऑगस्ट रोजी परतवाडा येथील कोर्ट रोड स्थित कल्याण मंडपम मध्ये आयोजित केलेल्या पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात विविध कंपन्यांनी प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे एकूण ६२८ उमेदवारांची प्राथमिक निवड केली आहे.

या रोजगार मेळाव्यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन माध्यमातून ८०६ उमेदवारांनी नोंदणी केली. यातील ७७७ उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती दिल्या. महिंद्रा अँड महिंद्रा प्रा.ली.नागपूर, जाधव गियर्स ली.अमरावती, वैभव एन्टरप्राईजेस प्रा.लि.नागपूर, जाबील सर्किट इंडिया प्रा.लि. पुणे, नवभारत फर्टिलायझर प्रा.लि. नागपूर, बीव्हीजी पुणे, कोअर प्रोजेक्ट इंजिनियर अमरावती, धूत ट्रान्समिशन प्रा.लि., श्रीराम फायनान्स, ब्लिंकिट, कृपा कन्सल्टनसी पुणे, प्रिसिजन मॅपिंग सोल्युशन अमरावती यांच्याकडून थेट मुलाखती घेण्यात येणार आहे.

तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत गट विकास अधिकारी ,पंचायत समिती अचलपूर, नगरपरिषद अचलपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग अचलपूर, शासकीय तंत्रनिकेतन अचलपूर आदी १६ कंपन्या व कार्यालयांच्या प्रतिनिधींनी या रोजगार मेळाव्यात सहभागी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेवून विविध पदांसाठी ६२८ उमेदवारांची प्राथमिक निवड केली आहे.

आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन झाले राज्य स्तरीय रोजगार मेळावा समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ. रणजीत पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर आमदार केवलराम काळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता राऊत यांनी केले तर जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी आभार मानले.

---

## जाहीर नोटीस

**मा.जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख, अमरावती**

क्रमांक/न.भू.-१/अपील अर्ज २५२६/२०२४ — अमरावती, दिनांक २०/०८/२०२६

प्रति,
१. श्री हरिभाऊ झोलाजी अमझरे
२. श्री अर्जुनराव झोलाजी अमझरे
दो.रा.वृंदावन कॉलनी, चांदूर बाजार, जि.अमरावती — **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. प्रविण पंजाबराव पारिसे, रा.मु.पो. हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. श्री अशोक रामचंद्र कसर,रा.मु.पो.हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. श्रीमती नर्मदाबाई रामचंद्र कसर,रा.मु.पो.हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. श्रीमती आशा रामचंद्र कसर, रा.मु.पो.हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
५. उषा रामचंद्र कसर, रा.मु.पो.हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
६. राजेंद्र रामचंद्र कसर, रा.मु.पो.हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
७. संजय रामचंद्र कसर, रा.मु.पो.हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
८. रोषण अरुण पारधी, रा.मु.पो.हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
९. आशिष अरुण पारधी, रा.मु.पो.हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
१०.उपअधिक्षक भूमि अभिलेख, चांदूर बाजार, जि.अमरावती — **उत्तरार्थी**

**विषय :-** मौजे हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील गट नं. ३४१ चे बाबत अपिल अर्ज
**संदर्भ :-** अपिलार्थीचा अर्ज दिनांक २८/०३/२०२४

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे हिरुरपुर्णा,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती, येथील गट नं.३४१चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरार्थी हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसलेमुळे उत्तरार्थी यांना याव्दारे कळविण्यात येते की, दिनांक ०१/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात आपण स्वतः किवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर राहावे. आपण वरील तारखेस सदर अपिल कामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २०/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्कयानिशी दिले.

शिक्का

सही/-
**महेशकुमार शिंदे**
**जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख,अमरावती**

---

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली शेतजमीन ही सदर जमिनीचे मालक जुबैर अली गजनफर अली यांच्या मालकी व ताब्यात असल्याचे सांगण्यात आले आहे. सदर शेतजमीन ही खरेदी/हस्तांतरण करण्याचा व्यवहार प्रस्तावित आहे. वरील वर्णनाची शेतजमीन सदर मालकाकडून माझे पक्षकार यांच्या नावे खरेदी/हस्तांतरण करण्याचा प्रस्तावित व्यवहार आहे. त्या स्थावर मालमत्तेचे (शेतजमीनीचे) वर्णन :- नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण कचेरीच्या व जिल्हा परिषद अमरावतीच्या हददीतील मौजे- बेलोरा, भाग-१, ता.जि.अमरावती येथील भुमापन व उपविभाग क्र.५२/१, भो.वर्ग-१, खाते क्र.१६४८ मधील क्षेत्रफळ ० हे.७२ आर. तसेच खाते क्र.१६७४ मधील क्षेत्रफळ ० हे. ७१ आर. असे दोन्ही मिळून एकुण क्षेत्रफळ १ हे ४३ आर, आकार रु. ८.२२ पैसे, असलेली शेतजमिन, त्यावरील सालीम शेतजमीन, झाडे -झुडपे व इतर सर्व तदंगभूत वस्तूंसह, सदर शेतजमिनीची चर्तुःसिमा - पुर्वेस- गुणवंत घरडे यांचे शेत, पश्चिमेस - बेलोरा-अमरावती रोड, उत्तरेस- गुणवंत घरडे यांचे शेत, दक्षिणेस - दंडाले यांचे शेत

सदर शेतजमिनीवर कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, सहमालकी हक्क, वारसाहक्क, ताबा, गहाण, बोजा, कर्ज, लीज, भाडेपटटा, करार, इसारपावती, विक्रीचा करार, हस्तांतरणाचा हक्क, न्यायालयीन वाद, जप्ती, मनाई आदेश किंवा अन्य कोणताही हक्क अथवा हितसबंध असल्याची त्यांनी त्याबाबतची लेखी हरकत व संबधित कागदपत्रांसह ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आंत खाली सही केलेल्या अधिवक्त्यांकडे सादर करावी. निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणताही हक्क, दावा, बोजा अथवा हितसंबंध नाही, असे समजून प्रस्तावित व्यवहार पुढे करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही व त्यासाठी संबंधित व्यक्ती स्वतः जबाबदार राहील.

करिता ही नोटीस जाहीर करत आहे.

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक १४/०८/२०२६**

सही /-
**ॲडव्होकेट निलेश ज.पुंड**
१०२, गजानन अपार्टमेंट, मोहन कॉलनी,
अर्जुन नगर, अमरावती
**मो.-८४२१७२२१११**

---

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

**कि.दि.अ.क्र. /२०२६** — **ने.ता.२१.०९.२०२६**

**अर्जदार :-**
१. **अब्दुल शब्बीर शेख हसन (पती),** वय ७९ वर्षे, व्यवसाय-शेती, रा.मुंडवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. **अस्मा परवीन सय्यद अफसर, (मुलगी),** वय ४६ वर्षे, व्यवसाय-गृहिणी रा.गणेश नगर सिंधी कॅम्प परतवाडा, ता.परतवाडा, जि.अमरावती
३. **शमा परवीन मोहम्मद रफीक (मुलगी),** वय ४४ वर्षे, व्यवसाय-गृहिणी रा.फॉरेस्ट कॉलनी, समाज मंदिर जवळ, चिखलदरा, ता.चिखलदरा, जि.अमरावती
४. **रेश्मा परवीन निसार खान (मुलगी),** वय ३० वर्षे, व्यवसाय-गृहिणी रा.सालोड कसबा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
५. **फराना आसिफ खान (मुलगी),** वय ३७ वर्षे, व्यवसाय-गृहिणी रा.दहिफळ, ता.बोरी अरब,जि.अमरावती
६. **हिना सय्यद आसिफ अली (मुलगी),** वय ३४ वर्षे, व्यवसाय-गृहिणी रा.मस्जिद जवळ सयामा कॉलनी, परतवाडा, ता.परतवाडा, जि.अमरावती
७. **शबनम मोहम्मद राजीक मोहम्मद सईद (मुलगी),** वय ३० वर्षे, व्यवसाय-गृहिणी रा.जव्हार मार्ग मोमीनपुरा, चिखलदरा, ता.चिखलदरा, जि.अमरावती

**// विरुध्द //**

**गैरअर्जदार :-** निरंक

ज्याअर्थी, वरील नमूद अर्जदारांनी या न्यायालयात मुंबई अधिनियम (०८) १८२७ चे कलम ०२ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ यांची पत्नी व २ ते ७ यांची आई फयमीदाबी अब्दुल सब्बीर रा.मुंड वाडा, तालुका ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती हया दिनांक १७/११/२०२६ रोजी खंडाळा येथे मरण पावल्या.

अर्जदारांनी नमूद केल्याप्रमाणे मृतकांच्या पश्चात वरील अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस असून त्यांना वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. म्हणून, या न्यायालयात जो कोणी व्यक्ती वरील वारस प्रमाणपत्र देण्यास हरकत घेऊ ईच्छित असेल, त्याने आपल्या हरकती दिनांक **२२/०९/२०२६रोजी सकाळी १०.३० वाजता** या न्यायालयात स्वतः हजर राहून किंवा योग्य वकिलामार्फत खी स्वरुपात सादर कराव्यात, अन्यथा, कोणतीही हरकत नसल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर जाहिरनामा दिनांक २०/०८/२०२६ रोजी दिला आहे.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर**
**नांदगाव खंडेश्वर**

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३४८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

**Change In Mother Name**
(MOTHER OLD NAME)
SHAMMI
(MOTHER NEW NAME)
SAMIUNNISA ABDUL SHAKIL
- Address -
BHARAT COMPLEX, NEAR BABA AUTO PARTS, HATHI PURA, WALGAON ROAD, AMRAVATI - 444601

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

**आर.एम.जे.सी.क्र.४०८/२०२६** — **ने.ता.०९.१०.२०२६**

**अर्जदार :**
१. **उषा श्रीधर वानखडे,** वय ६० वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.प्रल्हादपुर, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. **किशोर श्रीधर वानखडे,** वय ४० वर्षे, व्यवसाय - मजुरी रा.कृष्ण नगर, तपोवन, अमरावती कॅम्प, ता.जि.अमरावती
३. **जयश्री राहुल नितनवरे,** वय ३९ वर्षे, व्यवसाय- घरकाम रा.असदपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती
४. **आनंतराज श्रीधरराव वानखडे,** वय ३७ वर्षे, व्यवसाय- मजुरी रा.पंचशिल चौक, तपोवन, अमरावती कॅम्प, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक श्रीधर खुंटाजी वानखडे** यांचा **मृत्यू दि.२४/०७/२०२६** झेनिथ रुग्णालय, अमरावती, ता.जि.अमरावती येथे झालेला असुन ते कायमचे रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होते.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४०८/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२१.०८.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४०३/२०२६ — ने.ता.२९.०९.२०२६

**अर्जदार :**
**१.** ज्ञानेश्वर विठ्ठलराव अवसरमोल, वय ५४ धंदा - मजुरी रा.गुरुदेव नगर, शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. पंडीत विठ्ठलराव अवसरमोल, वय ४४ वर्षे, व्यवसाय - मजुरी रा.गुरुदेव नगर, शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक विठ्ठलराव सूर्यभान अवसरमोल** यांचा मृत्यू दिनांक **०९.१०.२०२०** रोजी रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला.तसेच **मृतक विमलबाई विठ्ठलराव अवसरमोल** ही दि.**२४.११.२०२५** रोजी रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४०३/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१९.०८.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१७२३/२०२६
**मणी व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२१.०९.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Mani Omprakash Agrawal, Age 80 Yrs. Occu.: Household
2. Amit Omprakash Agrawal, Age 57 Yrs. Occu.: Business
Both R/o Plot No.17, Near Commissioner Office, Ganediwal Layout Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत ओमप्रकाश नागरमल अग्रवाल** यांचे दिनांक **२३.११.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार मणी व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मणी व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२०.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**नगर परिषद कार्यालय, घाटंजी, जि.यवतमाळ**

**निविदा सूचना (दूसरी वेळ )**

घाटंजी नगर परिषद अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वस्ती सुधार योजना व न.प.निधी अंतर्गत कामाकरिता सीलबंद टक्केवारी बी-१ प्रपत्रात निविदा महाराष्ट्र शासनाच्या विद्युत विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग मधील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत अनुभवी कंत्राटदाराकडून ई-निविदा घाटंजी नगर परिषद मागवित आहे. निविदेचा विस्तृत नमुना www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २४/०८/२०२६ पासून पहावयास उपलब्ध आहे.

**श्री.राजु म.घोडके**
**मुख्याधिकारी न.प.घाटंजी**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.९५९/२०२६**
**सुनंदा व इतर विरुध्द निरंक**
**पुढील ता.२३.०९.२०२६**

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. **Smt. Sunanda Narayan Bedekar (Widow)** Age 72 years. Occu.: Household
2. **Sau.Supriya Uday Joshi (Married Daughter)** Age 42 years. Occu.: Household
Both R/o. Plot No. 3, Pooja Colony, Deep Nagar No.2 Near Farshi Stop, Amravati

विरुध्द

**गैरअर्जदार - निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत नारायण मोरेश्वर बेडेकर** हे दिनांक ०६.०४.२००६ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **सुनंदा व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनंदा व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३९९/२०२६ — ने.ता.२९.०९.२०२६

**अर्जदार :**
**१.** देवेंद्र हरीष भट्ट, वय ४७ धंदा - व्यापार
२. मेघना हरीष भट्ट, वय ४५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
३. दर्शन हरीष भट्ट, वय ३९ वर्षे, व्यवसाय - व्यापार
सर्व रा.भट्टपुरा, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक हरीष दामोदर भट्ट** यांचा मृत्यू दिनांक **२७.११.२०२५** रोजी रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला.तसेच **मृतक माधुरी हरीष भट्ट** ही दि.**३१.०७.२०२२** रोजी रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३९९/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२१.०८.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१५३६/२०२६
Yogini Sudhanva Babrekar - Vs - Nil
पुढील ता.०३.०९.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Yogini Sudhanva Babrekar, D/o Sudhanva Gajananrao Babrekar
Age 35 Yrs. Occu.: Housewife
Plot No.78, Flat No.201, Rajkalyan Apartment, Medical College Road, Near Bank of India, Hanuman Nagar, Nagpur, Hanuman Nagar, VTC Hanuman Nagar, Po.Hanuman Nagar, Sub-District Nagpur, Dist.Nagpur-440009

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Sudhanva Gajananrao Babrekar यांचे दिनांक **०२.०५.२०१४** रोजी Nagpur येथे निधन झाले. **अर्जदार** Yogini Sudhanva Babrekar यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Yogini Sudhanva Babrekar वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**११.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कट्टे २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१५३७/२०२६**
**सैयद व इतर व निरंक**
**पुढील ता.११.०९.२०२६**

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :-** **सैयद इस्माईल सैयद इब्राहीम**
वय ७६ वर्षे, व्यवसाय-मजुरी
रा.माता मंदिर जवळ, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत हाफिजाबी सैयद इब्राहीम** हे दिनांक **२२.०५.२००३** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार सैयद वि निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सैयद वि.निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे १९.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५५७/२०२६ — ने.ता.२१.०९.२०२६

**अर्जदार -**
१. **श्री दिपक हिरामण मोहने,** वय ५६ वर्षे, धंदा-मजुरी
२. **श्री कैलास हिरामण मोहने,**वय ५३ वर्षे, धंदा-मजुरी
३. **श्री विजय हिरामण मोहने,**वय ४७ वर्षे, धंदा-मजुरी
तिघेही रा.खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. **सौ.रंजना शालिकराम मेघरासे,** वय ६४ वर्षे, धंदा-घरकाम रा.उदखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. **सौ.उर्मिला ज्ञानेश्वर सवले,**वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम रा.कु-हा देशमुख, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे.अर्जदाराप्रमाणे अर्जदारांची आई **वच्छला हिरामण मोहने ही दिनांक २३/१२/२०२५ रोजी खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावलेली आहे.** त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदारा शिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक ३०.०८.२०२६**

शिक्का

आदेशान्वये,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय , मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.९३४/२०२६
**भाग्यश्री व ईतर - विरुध्द निरंक**
पुढील ता.३१.०८.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Smt.Bhagyashri Bhalchandra Deolikar, Age 66 Yrs. Occu.: Household
2. Smt.Manjiri Nishikant Kulkarni (Married Daughter), Aged 39 Yrs. Occu.: Service
Both R/o Swastik Nagar Near Water Tank Near Nawathe Plot, Amravati
3. Sau.Aarti Rahul Gawfale (Married Daughter), Aged 37 Yrs. Occu.: Legal Practitioner
R/o A/1007, Shivam Angan, Sinhgad Law College Road, Behind Ashok Layland Showroom Ambegaon Bk.Pune

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत भालचंद्र किष्णराव देवलीकर** यांचे दिनांक **३०.११.२००७** रोजी Amravati येथे निधन झाले. **अर्जदार भाग्यश्री व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **भाग्यश्री व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१७६५/२०२६
**राजकन्या अधिक दोन - विरुध्द निरंक**
पुढील ता.२४.०९.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Rajkanya Ganesh Chhapani, Age 68 Yrs. Occu.: Nil
2. Devraj Ganesh Chhapani, Aged 38 Yrs. Occu.: Labour
Both R/o Rahul Nagar, Bicchu Tekadi, Amravati.
3. Heena Avinash Wankhade, Aged 44 Yrs. Occu.: Household
R/o Ujwal Nagar, Masturi Bilaspur, Chhatisgarh

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Ganesh Raghupat Chhapani यांचे दिनांक **०९.०६.२०२६** रोजी Nagpur येथे निधन झाले. **अर्जदार** Rajkanya Ganesh Chhapani+2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Rajkanya Ganesh Chhapani+2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२१.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# जिल्हा स्त्री रुग्णालयाला आ.सुलभा खोडके यांची भेट



**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या एनआयसीयू मध्ये सोमवारी पहाटेच्या ४ च्या सुमारास आग लागून तीन नवजात बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची माहिती मिळताच आ.सुलभा संजय खोडके यांनी तात्काळ डफरीन मध्ये पोहोचवून परिस्थिती जाणून घेतली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता डफरीन प्रशासनासोबत चर्चा करण्यात आल्यानंतर एनआयसीयु मध्ये असलेल्या अन्य नवजात बालकांना नजिकच्या सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल मधील अतिदक्षता विभागात हलविण्यात आले आहे.दरम्यान आ.सुलभा खोडके यांनी डफरीनच्या नवजात शिशू अतिदक्षता विभागाची पाहणी करित वस्तुस्थितीचा आढावा घेतला. डॉक्टरांकडून सांगण्यात आले कि. जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर नवजात शिशू अतिदक्षता विभागातील व्हेंटिलेटरमध्ये अचानक स्फोट झाला. त्यानंतर आग लागली. ती झपाट्याने पसरली.या ठिकाणी एकूण तीन नवजात शिशू अतिदक्षता कक्ष आहे. या तीन कक्षांमध्ये एकूण प्रत्येकी १३ अशी मिळून ३९ नवजात बालकांवर उपचार करण्याची क्षमता आहे. त्यापैकी एका कक्षाला आग लागली. या कक्षात एकूण १२ बालके होती. त्यातील तीन बालकांचा बालकांचा धुरामुळे गुदमरून मृत्यू झाला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता आ.सुलभा खोडके यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री ना. प्रकाशजी आबिटकर यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत त्यांना घटनेसंदर्भात अवगत केले. अवघ्या वर्षभरापुर्वी नवीन इमारतीत हा नवजात शिशू अतिदक्षत विभाग सुरू करण्यात आला. मात्र रुग्णालयात आपात्कालीन सुरक्षा व्यवस्था नसल्याने ही दुदैवी घटना घडली असल्याबाबत त्यांनी मंत्री महोदयांना अवगत केले. यावर आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी आपण स्वतः दुपार पर्यंत अमरावती येथे पोहोचणार असून डफरीन रुग्णालयाला भेट देऊन घटनेची प्रत्यक्ष माहिती जाणून घेणार असल्याचे सांगितले. मंत्री ना. आबिटकर आज दुपारी एन ते दिड वाजेपर्यंत डफरीन रुग्णालयात पोहोचणार असल्याची माहिती सुद्धा देण्यात आली आहे.

### उपमुख्यमंत्र्यांनी जाणून घेतला घटनाक्रम

दरम्यान आ.सुलभा खोडके यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रा वहीनी पवार यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला व त्यांना डफरीन रुग्णालयातील आगजनीच्या घटनेची माहिती दिली. तीन नवजात बालकांचा धुरामुळे गुदमरून मृत्यू झाला असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रावहीनी पवार यांनी संवाद साधतांना सांगितले कि, नवजात बालकांच्या मृत्यूची घटना दुदैवी करून या संदर्भात सर्व दक्षता व खबरदारी घेण्यात यावी, आपत्तीव्यवस्था व बचाव यंत्रणा सज्ज करून अन्य नवजात बालक व महिला रुग्णांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्यात यावी. अमरावती शहरातील डफरीन, इर्विन व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मधील अग्निशमन व्यवस्था कार्यान्वित करण्यात यावी, अशा सुचना नामदार सुनेत्रावाहिनी पवार यांनी अरोग्य मंत्री व आरोग्य सचिवांना दिल्या आहे. त्यापार्श्वभूमीवर आज दुपारपर्यंत आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर हे आरोग्य यंत्रणेसह या तीनही रुग्णालयांना भेट देणार असल्याची माहिती आ. सुलभा खोडके यांनी दिली.

# हर हर महादेवाच्या जयघोषाने दुमदुमली जटाधारी कावड यात्रा

## कौंडण्यपूर पवित्र नदीच्या ३१ कलशाने शिवाचा जलाभिषेक

**कुऱ्हा/वार्ताहर**

दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील जटाधारी कावड यात्रा समितीकडून भक्तिमय वातावरणात कावड यात्रा झाली शेकडो युवकांनी कौंडण्यपूर या पवित्र नदी पात्रातून ३१ कलश जल आणून कुऱ्हा येथील शिवमंदिर येथे शिवलिंगाचे जला अभिषेक करण्यात आले. कौंडण्यपूर ते कुऱ्हा असा ११ किलोमीटरचा असा पायदळ प्रवास या कावड यात्रेत भरलेले कलश घेऊन पूर्ण करण्यात आला. विशेषतः जागोजागी फुलांच्या वर्षाव व फटाक्यांच्या आतिषबाजीने या कावड यात्रेचे स्वागत करण्यात आले. या कावड यात्रेसाठी मोठ्या संख्येने युवकांनी आपला सहभाग नोंदवला. रविवारी रात्रीच मोठ्या संख्येने युवक या कावड यात्रेसाठी कौंडण्यपूरला रवाना झाले होते.आज सोमवारी सकाळी ही कावड यात्रा कौंडण्यपूर नदी पात्रातील ३१ कलश पवित्र जल कुऱ्हा शिवमंदिर साठी निघाली. दरम्यान कावड यात्रा कुऱ्हा शिवमंदिर येथे पोहचली. डीजेच्या तालात भक्तिरसात शेकडो महिला व पुरुषांनी या भक्तिमय कावड यात्रेचा आनंद लुटला. हर महादेव च्या जयघोषाने ही कावड यात्रा दुमदुमली होती. दुपारीच्या सुमारास पवित्र कलशाचे कुऱ्हा येथील शिवमंदिरात शिवलिंगावर वैदिक मंत्राने जलाभिषेक करण्यात आले.या जटाधारी कावड यात्रेत परिसरातील शेकडो महिला पुरुष, युवक, मोठ्या संख्येने उपस्थित होते. कावड यात्रेच्या यशस्वीतेसाठी सहकार्य शिवभक्तांचे व उपस्थित सर्व नागरिकांचे यावेळी आभार जटाधारी कावड यात्रा समितीकडून आभार व्यक्त करण्यात आले आहे.




## संक्षिप्त

### शहीद अण्णासाहेब राऊत यांच्या स्मृतिदिनानिमित्त नेत्र तपासणी शिबिर

**शिराळा-**अमरावती तालुक्यातील ग्राम शिराळा येथील म्हस्के भवन दुर्गा इंग्लिश स्कूल येथे शहीद अण्णासाहेब राऊत यांच्या स्मृतिदिनानिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.शहिद अण्णासाहेब राऊत त्यांच्या सामाजिक कार्याची व समाजासाठी दिलेल्या योगदानाची यावेळी उपस्थितांनी आठवणीत नेत्र तपासणी शिबीर आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे संचालन मुख्यध्यापक प्रविण मोहरे यांनी केले, तसेच याप्रसंगी प्रमुख मान्यवर म्हणून डॉ.निलय ढोर,मयुर मुरकर,तन्वी ढोक, सोनाली मोरे,विशाल मेठानी,रामकृष्णदादा ठाकरे, दिक्षा मनवर राजेंद्रजी म्हस्के,राजुभाऊ गंधे,नरेंद्र भस्मे, अर्चना नागे,शालिनी कडु,अंकीता घोंगडे,साधना म्हस्के,निकीता उके,प्राची माकोडे,रुतुजा राहाटे,दुर्गा इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक प्रवीण मोहरे,तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षिका उपस्थित होत्या.'ॲडव्हान्स आय केअर सेंटर'चे प्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. निलय राजेंद्र ढोरे (एमबीबीएस,एमएस) यांच्या हस्ते शिबिरामध्ये शिराळा परिसरातील नागरिकांची मोफत डोळे तपासणी करण्यात आली.या शिबिराचा लाभ ग्राम शिराळा येथील दुर्गा इंग्लिश प्रायमरी स्कूलचे विद्यार्थी तसेच गावातील महिला व पुरुषांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नेत्र तपासणी शिबिराचा लाभ घेतला.

### बडनेरा-अंजनगाव बारी मार्गे हिंगणघाट बससेवा बंद; प्रवाशांची गैरसोय

**अंजनगाव बारी-**बडनेरा–अंजनगाव बारी मार्गे हिंगणघाट जाणारी बससेवा बंद झाल्याने या मार्गावरील नागरिक, विद्यार्थी, प्रवासी, व्यापारी तसेच नोकरदार वर्गाची मोठी गैरसोय होत आहे. ही बससेवा अंजनगाव बारीसह नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील नागरिकांसाठीही सोयीची ठरत होती. पालकमंत्र्यांच्या पुढाकारातून ही बससेवा सुरू झाल्यानंतर नागरिकांनी समाधान व्यक्त केले होते.विद्यार्थी, कर्मचारी, व्यापारी आणि नियमित प्रवाशांच्या दैनंदिन प्रवासावर याचा मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे संबंधित परिवहन विभागाने या समस्येची दखल घेऊन बडनेरा–अंजनगाव बारी मार्गे हिंगणघाट बससेवा तातडीने पूर्ववत करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पालकमंत्र्यांच्या निर्देशानंतर बडनेरा–अंजनगाव बारी–नांदगाव खंडेश्वर–पुलगाव–वर्धा–देवरी–हिंगणघाट वरील मार्गावरून एक बससेवा सुरू करण्यात मागणी केली होती. तसेच बडनेरा–मालखेड–चांदूर रेल्वे मार्गावर नियमित बससेवा सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. बससेवेअभावी विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी व प्रवाशांची मोठी गैरसोय होत असून, एसटी प्रशासनाने तातडीने या मार्गावर बससेवा सुरू करावी, अशी मागणी आहे



### टायटन्स पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी गाजवला युवा महोत्सव

**अंजनगाव बारी-**स्थानिक विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावतीद्वारा संचालित टायटन्स पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अमरावती येथील सायन्सकोर मैदानावर नवराष्ट्र युवा फाउंडेशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांची प्रभावी छाप पाडली. या युवा महोत्सवात शाळेच्या संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी देशभक्ती गीताचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची वाहवा मिळवली. या महोत्सवात रुचा होले, हैमी बोडे, हृदया बोडे, आकांक्षा लांडगे,प्रणाली सोळंके, ईश्वरी एस. पोकळे, नंदिनी सोळंके, पलक भाकरे, लावण्य वाकेकर, रांझणा केशवाणी, परिधी नवघरे, चिरांतरी सुतवणे, आराध्या लाहे, आर्या जैन, कनिष्का खांडरे, आरिया मोहोकार, इशिता खोडे, रिद्धी पालेकर, खुशी शिरसागर श्रीवास्तव,पार्थ बोंद्रे,युगंत राऊत व कौस्तुभ भुजडे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल शाळेचे प्राचार्य अजय चौबे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय सहभागाबद्दल बडनेरा परिसरातील नागरिकांकडूनही त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### दादारावजी मोपारी यांचे निधन



**खल्लार-**लांडी येथिल शेतकरी दादारावजी मोपारी यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ७९ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, मुली नातवंड व बराच मोठा आप्त परिवार असून त्यांच्यावर चंद्रभागा नदीकिनारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सणासुदीच्या तोंडावर साबुदाणा, शेंगदाणे महागले; घरखर्चाचे गणित कोलमडले

## खाद्यतेलाच्या दरालाही फुटली उकळी; उपवासाच्या पदार्थांवर महागाईची झळ

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

सणासुदीचा हंगाम सुरू होत असतानाच वाढत्या महागाईने सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागली आहे. किरकोळ बाजारात खाद्यतेलाच्या १५ लिटरच्या डब्यामागे सुमारे १०० रुपयांची वाढ झाली असून, साखर, साबुदाणा आणि शेंगदाण्याच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे गृहिणींचे महिन्याचे बजेट कोलमडले असून, आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर घरखर्च आणखी वाढण्याची चिंता व्यक्त होत आहे.

घाऊक बाजारात साखरेचा दर सुमारे ५१.५० रुपये किलो असताना किरकोळ बाजारात ती ५३ ते ५६ रुपये किलोपर्यंत विकली जात आहे. उपवासासाठी आवश्यक असलेल्या साबुदाण्याचा दर १०० ते ११० रुपये, तर शेंगदाण्याचा दर १६० ते १८० रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे. सोयाबीन तेलाचा किरकोळ दरही १३० ते १४० रुपये लिटरवर गेला असून, खाद्यतेलाच्या १५ लिटरच्या



डब्यामागे सुमारे १०० रुपयांची वाढ झाली आहे.

याशिवाय तांदळाच्या दरातही वाढ झाल्याने किराणा खर्चात भर पडत आहे.

**घाऊक-किरकोळ दरातील तफावतीने प्रश्नचिन्ह**

घाऊक आणि किरकोळ बाजारातील दरांमध्ये मोठी तफावत असल्याने ग्राहकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. साठेबाजी, कृत्रिम टंचाई किंवा व्यापाऱ्यांकडून मनमानी दरवाढ केली जात आहे का, याची प्रशासनाने तपासणी करावी,अशी मागणी नागरिकांनी केली आहे. बाजारातील साठ्याची तपासणी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणीही जोर धरत आहे.

**श्रावण सुरू होताच उपवासही महागला**

श्रावण महिन्याला सुरुवात झाल्यानंतर साबुदाणा, शेंगदाणे आणि साखरेच्या दरवाढीचा थेट परिणाम उपवास करणाऱ्या नागरिकांच्या खर्चावर झाला आहे. गणेशोत्सव,नवरात्र आणि त्यानंतर दिवाळीचा सण असल्याने आगामी काळात किराणा व उपवासाच्या पदार्थांची मागणी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने वेळीच बाजारपेठेवर नियंत्रण ठेवून दरवाढीमागील कारणांची चौकशी करावी,अशी अपेक्षा ग्राहकांकडून व्यक्त होत आहे.

# पी.आर.पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयात संस्कृतदिन

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्स आयुर्वेद, अमरावती येथील संहिता सिद्धांत एवं संस्कृत विभागा अंतर्गत पाणिनी संस्कृत क्लब तर्फे संस्कृत दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्कृत अधिव्याख्याता निलिमा जैन यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी संस्कृत नाटक, स्पर्धा, पहेली आणि संस्कृत गायन यांचे सादरीकरण केले.



कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्राचार्य डॉ. रणजीत देशमुख यांनी भूषविले. आपल्या भाषणातून त्यांनी'आधुनिक काळात आपण अनेक भाषा एकत्र करून बोलतो, परंतु संस्कृत भाषा बोलताना इतर भाषा मिसळली जात नाही, हे संस्कृत भाषेचे वैशिष्ट्य असल्याचे सांगितले. आयुर्वेद शिकत असताना मराठी, हिंदी आणि इंग्लिश या भाषांपेक्षा संस्कृत भाषा येणे अत्यंत गरजेचे आहे' असे त्यांनी आयुर्वेदातील उदाहरणे देऊन पटवून दिले. कार्यक्रमाला डॉ.भार्गव टप्पे, डॉ. हर्षवर्धन नवले, डॉ.स्वाती धामणीकर, डॉ. भारती बिरे, डॉ. अनुपमा काळे, डॉ.प्राची शहाणे, डॉ.भैरवी देशमुख, डॉ.अश्विनी वाणी, डॉ. रूपाली अंजनकर डॉ.पारुल नांदगावकर, आदी प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना पाणिनी संस्कृत क्लब सचिव नीलिमा जैन यांनी केली. संचालन प्राप्ती गवते आणि नेहा सुरुले या विद्यार्थिनींनी केले.आभार हर्षिका ब्रम्हे यांनी केले.या कार्यक्रमासाठी प्रथम वर्षाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. विविध सादरीकरणातून विद्यार्थ्यांची संस्कृत भाषेबद्दल असलेली आवड दिसून आली. शेवटी सर्वांनी संस्कृत भाषेचे जतन आणि संवर्धन करण्याचा संकल्प केला.



# सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी संकल्प यात्रा काढणार

**अमरावती/का.प्र.**

सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर त्यांच्या हक्कांपासून वंचित राहावे लागू नये तसेच वेतन निश्चिती, आर्थिक देयके आणि विविध प्रलंबित प्रश्नांबाबत त्यांच्यामध्ये जनजागृती करण्यासाठी जिल्हाभर 'संकल्प यात्रा' काढण्यात येणार असल्याची घोषणा सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रमुख मार्गदर्शक संभाजी रेवाळे यांनी केली.

सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचारी संघटना कृती समिती, जिल्हा अमरावतीची सभा जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा, अमरावती येथे नुकतीच पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी मकसुद अली होते. प्रमुख अतिथी सुनील केने व सुशील माडीवाले यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

सभेचे सूत्रसंचालन खुशाल गुल्हाणे यांनी केले, तर आभार भास्कर दाभाडे यांनी केले. सभेला विविध सेवानिवृत्त शिक्षक संघटनांचे पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते. यावेळी सुधीर खोडे, अनिल चहांदे,अशोक मसकी, मारुती देशमुख, हेमंत पाचघरे, रेखा लाखे, कीर्तीजन वानखडे, राहुल शेंडे, अरविंद नाहे, विजय तायडे, गीता निकोसे, श्रीकृष्णा चौधरी, गणेश रामेकर, दिनेश कनेरकर, सय्यद अखिल सय्यद बाबा, झाकीर अहमद अब्दुल खालिक, स्वाती चव्हाण, संजय वानखडे, रवींद्र खलोकर,छाया वानखडे, अशोक चाफले, दिलीप केने, रवींद्र कंगाले, मंदा खडतकर, हरिचंद्र गोहत्रे, प्रफुल्ल महल्ले,उमेश निकम, नारायण उमाळे, शरद देशमुख, सजन शिंदे, प्रदीप जाधव, किशोर नीचत, बाबुलाल जांभेकर, हिरा दहिकर, मोतीलाल भिलावेकर, वासुदेव भोंबे, जगदीश ससाने, गणेश भुजाडे, विनोद लेव्हरकर, वृंदा देशमुख व पुष्पा वावरे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व शेकडो शिक्षक उपस्थित होते.

# परतवाडा-शेगाव बस प्रवासात महिलेची पर्स लंपास

**अचलपूर -** परतवाडा-शेगाव बसने प्रवास करणाऱ्या महिलेच्या पिशवीतील पर्स अज्ञात चोराने लंपास केली. पर्समध्ये सोन्याचे दागिने, रोख व मोबाइल असा मुद्देमाल होता. या प्रकरणी परतवाडा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिरजगाव कसबा येथील सविता धनंजय लांडे (५०) या अंजनगाव सुर्जी येथे जाण्यासाठी परतवाडा-शेगाव बसमध्ये बसल्या होत्या. प्रवासादरम्यान त्यांच्या पिशवीची चेन उघडी असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संशय आल्याने त्यांनी पिशवी तपासली असता त्यामध्ये ठेवलेली दागिन्यांची पर्स गायब असल्याचे आढळून आले. लांडे यांनी बसमध्ये तसेच आजूबाजूला पर्सचा शोध घेतला. मात्र, ती मिळून आली नाही. या पर्समध्ये ४ ग्रॅम ५० मिली वजनाचे सोन्याचे दोन कानातले, २ हजार ५०० रुपयांची रोख, आधार कार्ड आणि अंदाजे १५ हजार रुपये किमतीचा मोबाइल होता. अज्ञात व्यक्तीने



गर्दीचा फायदा घेत पिशवीची चेन उघडून पर्स लंपास केल्याचा संशय आहे. चोरीस गेलेल्या ऐवजाची एकूण किंमत ३२ हजार ५०० रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# विद्यापीठात एम.ए.जेंडर अँड वुमेन्स स्टडीज अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत एम.ए.जेंडर अँड वुमेन्स स्टडीज या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षांचा असून त्यात एकूण चार सत्र आहेत. अभ्यासक्रमासाठी मराठी/हिंदी/इंग्रजी तिन्ही भाषांचे माध्यम उपलब्ध आहेत. कुठल्याही शाखेतील पदवी प्राप्त विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतो.

लिंगभाव दृष्टीकोनातून समाजातील स्त्रीप्रश्नांचे पर्यायाने लिंगाधारित असमानतेच्या आंतरसंबंधांचे चिकित्सक अध्ययन करण्यावर या अभ्यासक्रमात भर दिला जातो. लिंगभेदाचे उच्चाटन करून लैंगिक समानता प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक असणारे सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक-राजकीय भान व कौशल्ये विकसित करण्यावर या अभ्यासक्रमात लक्ष देण्यात येते. जेंडर सेन्सटायझेशन,जेंडर पॉलिसी,जेंडर ऑडीट,जेंडर बजेटिंग,जेंडर ट्रेनिंग, महिला सक्षमीकरण, जेंडर मेनस्ट्रीमिंग, जेंडर ॲनलिसेस, कॅपिसिटी बिल्डींग, जेंडर जस्टीस, एलिमीनेशन ऑफ जेंडर बेस्ड व्हायलन्स, जेंडर कन्सल्टंसी, जेंडर इक्वालिटी ॲडव्होकसी, फेमिनायझेशन ऑफ पाव्हर्टी, जेंडर अँड कम्युनिटी डेव्हलपमेंट, जेंडर अँड डेव्हलपमेंट, एलजीबीटीक्यूआयए अँड इंक्ल्यूझीवनेस, जेंडर ब्लांइडनेस, मेन अँड मस्क्युलॅनिटीज्, जेंडर अँड एनजीओज् अशा अनेक महत्त्वाच्या विषयांचे आवश्यक ज्ञान, दृष्टीकोन आणि कौशल्य देणारा हा अभ्यासक्रम आहे.सोबतच नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमात रिसर्च प्रोजेक्ट,फिल्ड व्हिझीट, केस स्टडीज, इंटर्नशिप यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

युपीएससी, एमपीएससी यांसह विविध स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील घटक अतिशय पूरक आहेत. याशिवाय जेंडर ट्रेनर, प्रोग्राम मॅनेजर, रिसर्च असोसिएट/असिस्टंट यांसारख्या अनेक क्षेत्रातील पदांसाठी अभ्यासक्रमाची पदवी आवश्यक व उपयुक्त आहे. विद्यार्थीकेंद्री सुरक्षित व सुविधांयुक्त शैक्षणिक परिसर, वसतिगृह सुविधा व समृद्ध ग्रंथालय सेवा (पूर्ण वेळ वाचन कक्षासह), संगणक व इंटरनेट सुविधा, अनुभवी शिक्षकांचे पूर्णवेळ शैक्षणिक मार्गदर्शन व सहकार्य, क्रीडा सुविधा - स्टेडियम, स्विमिंग पूल इत्यादी अनेक सुविधा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपलब्ध आहेत.

वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत सातत्याने आयोजित होणाऱ्या कार्यशाळा, परिषदा, चर्चासत्र, परिसंवाद, प्रशिक्षण वर्ग, व्याख्याने, अभ्यास दौरे आदींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची जीवन दृष्टी घडण्यास, व्यक्तिमत्व विकासास पूरक पर्यावरण उपलब्ध आहे. शिवाय कार्यक्रम-उपक्रमांमध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तररांवरील मौलिक कार्य करणारे विषयतज्ज्ञ, अभ्यासक, संशोधक, प्रशिक्षक, बुद्धीजीवी, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच शासकीय अधिकारी यांचा विविध सहभाग होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा त्यांचे मार्गदर्शन सहज उपलब्ध होते. सेंटरद्वारा चालवण्यात जेंडर लेन्स (ब्लॉग) यांवर लेखनाची तसेच सेंटरद्वारा चालवण्यात येणाऱ्या युट्यूब चॅनेलवर लिंगभाव दृष्टीकोनातून मांडणी करण्यासाठी विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध आहे. प्रवेश इच्छुक पात्र व्यक्ती https://sgbauadm.samarth.edu.in/ विद्यापीठाच्या या संकेतस्थळावर जाऊन प्रवेश अर्ज भरू शकतात.

मात्र प्रवेश अर्ज यशस्वीरित्या भरल्यावर त्याची एक प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह वुमेन्स स्टडीज सेंटरमध्ये निहित वेळेत जमा करणे अनिवार्य आहे. प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासंदर्भात अधिक माहिती आवश्यक असल्यास त्यांनी वुमेन्स स्टडीज सेंटर, ज्ञान स्त्रोत केंद्र - दुसरा माळा, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती याठिकाणी भेट द्यावी किंवा मो. नं. ९६५७४४९५६५ या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे यांनी केले आहे.

# चिकनच्या भाजीमुळे झालेल्या वादात लिव्ह इन पार्टनरची हत्या

**बडनेरा मार्गावरील धक्कादायक घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा रोडवरील नेमानी गोडाऊनच्या समोर माऊली मंगल कार्यालयाच्या बांधकामाधीन इमारतीत रविवार रात्री ११.३० वाजता चिकनची भाजीला चव नसल्याच्या किरकोळ कारणावरून वादा झाला. या वादातच एका लिव्ह-इन पार्टनर महिलेच्या डोक्यात वीट मारून निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना समोर आली.ममता संजू येडपाचे (वय३५ ) मृतक महिलेचे नाव आहे. या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी आरोपी राजेश भोलाराम काकोडीया उर्फ अनिल, (वय ३२ वर्षे, रा. चिरा, ता. भैंसदेही, जि. बैतूल, मध्य प्रदेश) याच्या विरोधात कलम १०३(१) नुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

सहकारी मजूर रोहित रतनलाल भुसुम, (वय २४ वर्षे, रा. चौरकुंड, ता. धारणी) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.रोहितने सांगितले की, गेल्या १ महिन्यापासून ते सर्वजण बडनेरा रोडवरील माऊली मंगल कार्यालयाच्या बांधकामाच्या ठिकाणी कामासाठी आले होते. तेथेच टीनच्या झोपडीत राहत होते.

रोहित सोबत राजेश उर्फ अनिल भोलाराम काकोडीया राहत होता. राजेश सोबत ममता संजू येडपाचे (वय ३५ ) ही गेल्या ५ वर्षांपासून लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होती. राजेश ठेकेदार चंद्रकांत अंबाडे,





(वय ३९, रा. गौतम नगर) यांच्याकडे कामाला होता. रोहितने दिलेल्या माहितीनुसार, २३ ऑगस्टच्या रात्री ११.३० वाजता तो जेवण करून झोपडीत झोपला होता. अचानक त्याला राजेश आणि ममताच्या जोरात भांडणाचा आवाज आला. बाहेर येऊन पाहिले तर पलंगावर ममता रक्ताच्या थारोळ्यात पडली होती.विचारपूस केली असता राजेशने सांगितले की, ममताने बनवलेली चिकनची भाजीला चव नसल्याने त्यांच्यात वाद झाला. रागाच्या भरात राजेशने जवळच पडलेली वीट उचलून ममताच्या डोक्यात जोरात मारली. त्यामुळे ममताचे डोके फुटले आणि ती जागीच बेशुद्ध होऊन खाली पडली.

त्यानंतर रोहितने तातडीने ठेकेदार चंद्रकांत अंबाडे यांना कळवले. चौकीदार संजय रामदास इंगळे आणि प्रेमदास लोणारे हे देखील मदतीला आले. जखमी ममताला टाटा एस गाडी एमएच २७ बीक्स २४५९ मधून इरविन रुग्णालयात नेण्यात आले. वाटेत माथ्याला टाके देखील घालण्यात आले. परंतु रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच डॉक्टरांनी ममताला मृत घोषित केले.या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी ☞(पान २ वर)

जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनेच्या चौकशीसाठी

# सात सदस्यीय समिती गठीत

**सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांची माहिती**

**-आठ दिवसात ही समिती अहवाल देईल**

**-दोषींवर कठोर कारवाई करण्यात येणार**



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा स्त्री रुग्णालयातील अतिदक्षता विभागात आग लागून ३ नवजात बालके मृत्युमुखी पडल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेच्या चौकशीसाठी सात सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली आहे. येत्या आठ दिवसात ही समिती अहवाल सादर करणार आहे. यात दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, कोणाचीही गय केली जाणार नाही, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अमरावती येथे (दि.२५) दिली.

जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दुर्घटना घडलेल्या एनआयसीयूला भेट देऊन पाहणी केली. यावेळी आमदार सुलभा खोडके, महापौर श्रीचंद तेजवानी, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव



डॉ. निपुण विनायक, विभागीय आयुक्त नयना गुंडे, आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, जिल्हाधिकारी आशिष येरेकर उपस्थित होते.

आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले, आज प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी केली आहे. यातून घटनेची भीषणता दिसून आली. ही अतिशय दुर्दैवी घटना आहे. दोन वर्षापूर्वीच हे नवीन रुग्णालय सुरू करण्यात आले. तेथे संपूर्ण अद्ययावत सोयीसुविधा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकारची घटना घडायलाच नको होती. या घटनेचे नेमके कारण शोधून यापुढे अशी घटना घडू नये यासाठी आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे. या समितीत महाराष्ट्र विद्युत महामंडळाचे मुख्य अभियंते, एम्सचे वरिष्ठ अधिकारी, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश असणार आहे. येत्या आठ दिवसात घटनेचा सखोल तपास करून ☞(पान २ वर)

# कार डिवाइडरला धडकली, दाम्पत्याचा मृत्यू

**अमरावती-मुर्तीजापुर मार्गावर भीषण अपघात**

**मुर्तीजापुर/प्रतिनिधीः-** अमरावती-मूर्तिजापूर मार्गावरील खरबडी गावाजवळ कमळगंगा नदीच्या पुलावर रविवारी झालेल्या भीषण अपघातात नागपूर येथील दाम्पत्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. अमरावतीहून मूर्तिजापूरकडे जाणारी इनोव्हा कार पुलावरील डिव्हायडरला जोरदार धडकली. या अपघातात कारमधील तिघेही गंभीर जखमी झाले. उपचारा दरम्यान यशवंत जयस्वाल आणि त्यांच्या पत्नी संगीता जयस्वाल यांचा मृत्यू झाला, तर चालकावर अकोला येथील शासकीय




रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती डायल ११२ या आपत्कालीन क्रमांकावरून पोलिसांना मिळताच मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. तेथे एमएच ४९ एएस ०६७५ क्रमांकाची इनोव्हा कार पुलावरील डिव्हायडरला धडकलेल्या अवस्थेत आढळून आली. मिळालेल्या माहितीनुसार, यशवंत उत्तमलाल जयस्वाल (वय ५७), त्यांच्या पत्नी☞(पान २ वर)

# १२वीच्या विद्यार्थिनीची गळफास घेऊन आत्महत्या

**अचलपूर/प्रतिनिधीः-** तालुक्यातील बिलनपुरा बावसी परिसरात राहणाऱ्या १८ वर्षीय वेदिका संजय कपले या १२वीच्या विद्यार्थिनीने शनिवार, २ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५ वाजताच्या सुमारास घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबफ उडाली. माहिती नुसार वेदिका श्रीमती उषाबाई देशमुख कनिष्ठ महाविद्यालयात १२वी कला शाखेची विद्यार्थिनी होती. शनिवारी ही नेहमीप्रमाणे सकाळी कॉलेजला गेली होती आणि सायंकाळी पाच वाजता घरी परत आली. कॉलेजवरून घरी आल्यानंतर घरी कोणी नसताना तिने अज्ञात कारणांमुळे हे टोकाचे पाऊल उचलले.

सामान्य शेतकरी कुटुंबातील वेदिकाच्या या निर्णयाने संपूर्ण कुटुंब हादरले आहे. तिच्या पश्चात आई-वडील आणि एक लहान भाऊ आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकले नाही. वेदिकाच्या या निर्णयामुळे कुटुंबीयांवर दुःखाचे डोंगर कोसळले आहे.

# गुटखा बंदीवर कडक अंमलबजावणी करा



**-पत्रकार परिषदेत मागणी**

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यात तंबाखू, निकोटीनयुक्त फ्लेवर्स आणि सुपारीजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही शहरात त्यांची सर्रास विक्री आणि पुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषद घेऊन गुटखाबंदीची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी करण्याची मागणी आज सोमवार २४ ऑगस्ट रोजी करण्यात आली.

पत्रकार परिषदेमध्ये सांगण्यात आले की,राज्य सरकारने २० जुलै २०२५ रोजी महाराष्ट्रात तंबाखू आणि सुपारीजन्य पदार्थांचे उत्पादन, साठवण, वितरण, वाहतूक आणि विक्री यावर एका वर्षासाठी बंदी घातली होती. यात गुटखा आणि पानमसाल्याचाही समावेश आहे.मात्र बंदी असूनही हे पदार्थ उघडपणे विकले जात आहेत. त्यामुळे FDA, पोलीस प्रशासन, अन्न सुरक्षा विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकत्रितपणे काम करावे अशी मागणी यावेळी करण्यात आली.प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. अवैध पुरवठा करणाऱ्यांवर वचक बसवावा.

शहरात तपासणी मोहीम राबवून संशयित गोदामांची तपासणी करावी, असेही परिषदेत सांगण्यात आले. पत्रकार परिषदेमध्ये अंकित वारजूरकर, सचिन काकडे, नौशाद अली उपस्थित होते.

# आरोग्यमंत्र्यांना भेटण्यापूर्वीच प्रहारचे ७ कार्यकर्ते ताब्यात

**३ नवजातांच्या मृत्यू प्रकरणावरून आक्रोश**

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा स्त्री रुग्णालय अर्थात डफरीन रुग्णालयाच्या एनआयसीयू मध्ये सोमवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत ३ नवजात शिशूंचा होरपळून मृत्यू झाला होता. या घटने नंतर रुग्णालय प्रशासन, संबंधित ठेकेदार आणि वेंटिलेटर मशीन पुरवठा करणाऱ्या कंपनीच्या विरोधात संतापाची लाट उसळली आहे. याच प्रकरणात





आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना भेटून निवेदन देण्यासाठी गेलेल्या प्रहार जनशक्ती पक्षाच्या ७ कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यामुळे डफरीन रुग्णालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रहारचे महानगर प्रमुख बंटी रामटेके यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी रुग्णालय परिसरात जोरदार घोषणाबाजी केली. मृत्यूला जबाबदार असलेल्या ठेकेदार आणि कंपनीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी केली.मृत ३ नवजातांच्या☞(पान २ वर)

# सौंदळी ग्रामपंचायतच्या जागेवर पंचशिल ध्वज

**आक्षेपानंतर गावात तणावाचे वातावरण, -दोन गट आमनेसामने, मोठा पोलिस बंदोबस्त तैनात**

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील गोळेगाव सौंदळी येथे ग्रामपंचायतीच्या जागेवर पंचशिल ध्वज उभारण्यात आल्याने गावात वाद निर्माण झाला आहे. ध्वज उभारणीवर गावातील दुसऱ्या गटाने आक्षेप घेतला. सदर जागेवर यापूर्वी गजानन महाराजांचे फलक लावण्यात आले होते. आता रातोरात पंचशिल ध्वज उभारून संबंधित जागेवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप या गटातील नागरिकांनी केला आहे.

माहितीनुसार गोळेगाव सौंदळी येथिल ग्रामपंचायतीच्या जागेवर बौद्ध बांधवांकडून पंचशिल ध्वज उभारण्यात आला. ध्वज उभारल्यानंतर दुसऱ्या गटातील नागरिकांनी याला विरोध केला. यापूर्वी याच ठिकाणी गजानन महाराजांचे फलक लावण्यात आले होते, असा दावा विरोध करणाऱ्या नागरिकांकडून



करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या जागेचा वापर नेमका कोणत्या पद्धतीने करायचा, यावरून वाद निर्माण झाला आहे.

दरम्यान, ग्रामपंचायत सचिव यांनी संबंधित जागा ही ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या जागेवर कोणत्याही धार्मिक अथवा सामाजिक स्वरूपाची रचना किंवा ध्वज उभारण्यासंदर्भात ग्रामपंचायतीची ☞(पान २ वर)

समाज मंदिरासमोर असलेली जागा ही ग्रामपंचायतीच्या मालकीची आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात घाण साचलेली असून नागरिकांकडून लघुशंका केली जाते. तसेच परिसरात कचरा टाकण्याचे प्रमाणही मोठे आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने सर्वप्रथम या जागेची पूर्णतः स्वच्छता करून घाण-कचरा हटवावा. परिसर स्वच्छ व सुरक्षित केल्यानंतरच या जागेबाबत पुढील कार्यवाही करावी. ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेवर स्वच्छतेकडे दुर्लक्ष होणे योग्य नाही. नागरिकांच्या आरोग्याचा आणि सार्वजनिक स्वच्छतेचा विचार करून ग्रामपंचायतीने तातडीने उपाययोजना करावी.
**- संजय चोरपगार,** जिल्हाध्यक्ष- वंचित बहुजन आघाडी अमरावती

समाज मंदिरासमोर असलेली संबंधित जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्यामुळे ग्रामपंचायतीकडून त्या जागेबाबत अधिकृत मागणी करण्यात आल्यास नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. **-अजित राठोड**, पोलीस निरीक्षक, दर्यापूर

# कंत्राटी सफाई कामगारांच्या आंदोलनाला अखेर यश

**-अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत थकित वेतनाचा प्रश्न मार्गी**



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी**

अंजनगाव सुर्जी शहराची संपूर्ण स्वच्छतेची जबाबदारी गेल्या आठ ते दहा वर्षांपासून आरोग्य विभागामार्फत कंत्राटी सफाई कामगारांवर आहे. हे कर्मचारी रोज सकाळी शहरातील घाण उचलून शहर स्वच्छ ठेवण्याचे काम प्रामाणिकपणे करत आहेत. मात्र गेल्या चार महिन्यांपासून त्यांचे वेतनच झाले नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती.पगार न झाल्यामुळे बाजारात त्यांना कोणीही उधार किराणा आणि जीवनावश्यक वस्तू देण्यास तयार नव्हते. अशा परिस्थितीत संसाराचा गाडा कसा चालवायचा? हा गंभीर प्रश्न कंत्राटी कामगारांसमोर उभा ठाकला होता.

नगरपरिषदेच्या ठेकेदाराकडून कंत्राटी सफाई कामगारांचे ३ महिने १९ दिवसांचे वेतन थकित होते. वारंवार मागणी करूनही वेतन मिळत नसल्याने अखेर संतप्त झालेल्या कामगारांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता.दि.२५ ऑगसट पासून कंत्राटा☞(पान २ वर)

# चार वर्षीय चिमुकलीच्या जबड्यात कात्री

**-डॉक्टरांची तत्परता, अवघड शस्त्रक्रिया यशस्वी**

**खल्लार/प्रतिनिधीः-** कोकर्डा येथील चार वर्षीय चिमुकलीच्या जबड्याजवळ कात्री घुसल्याची धक्कादायक घटना घडली. मुलांसोबत खेळताना अचानक बैलगाडीवरून पडल्याने हा अपघात झाला. या दुर्घटनेत टोकदार कात्री चुकून चिमुकलीच्या उजव्या जबड्याच्या सांध्याजवळील भागात घुसल्याने परिस्थिती गंभीर बनली होती.

अपघातानंतर चिमुकलीला तातडीने दर्यापूर येथे उपचाराकरिता आणण्यात आले. डॉ. नितीन सावरकर, डॉ. नविनकुमार राठी आणि डॉ. साहिल बुंदिले यांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ उपचार सुरू केले.



कात्री ज्या ठिकाणी घुसली होती तो भाग अत्यंत संवेदनशील असल्याने शस्त्रक्रियेदरम्यान विशेष काळजी घेणे आवश्यक होते. डॉक्टरांनी योग्य नियोजन, काळजीपूर्वक शस्त्रक्रिया आणि तज्ज्ञांच्या देखरेखीखाली कात्री यशस्वीरीत्या बाहेर काढली. सध्या चिमुकलीची प्रकृती स्थिर असून ती डॉक्टरांच्या देखरेखीखाली आहे. पुढील उपचार व आवश्यक निरीक्षण सुरू आहे. या यशस्वी उपचारानंतर चिमुकलीच्या पालकांनी व कोकर्डा येथील ग्रामस्थांनी ☞(पान २ वर)

डफरीनमध्ये ३ बालकांचा मृत्यू व इर्विनमधील समस्येमुळे आकमक

# आरोग्य मंत्र्यांना शिवसेना शहर प्रमुख प्रवीण हरमकर यांचा घेराव

**अमरावती/पतिनिधीः-** जिल्हा सामान्य स्त्री रुग्णालय (डफरीन) येथील व्हेंटिलेटर व इतर अत्यावश्यक मशिनरीच्या दुरुस्तीतील इंजिनियरच्या निष्काळजीपणामुळे तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या गंभीर घटनेप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच इर्विन रुग्णालयात साचलेल्या पाण्याच्या समस्येवर तात्काळ तोडगा काढावा, या मागण्यांसाठी शिवसेनेचे अमरावती शहर प्रमुख व माजी



विरोधी पक्षनेता प्रवीण हरमकर यांनी महायुती सरकारच्या आरोग्य मंत्र्यांसह विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना घेराव घालून निवेदन दिले.

डफरीन रुग्णालयातील व्हेंटिलेटर व जीवनरक्षक प्रणालीच्या देखभाल-दुरुस्तीत तांत्रिक अधिकारी आणि अभियंत्यांनी दाखवलेल्या हेलगर्जीपणामुळेच तीन बालकांना जीव गमवावा लागल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. 'केवळ खालच्या स्तरावरील कर्मचाऱ्यांवर कारवाई करून चालणार नाही, तर मूळ कारणापर्यंत ☞(पान २ वर)